जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार २१ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

इंदू मिलमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे काम रखडले

पूर्णत्वासाठी आणखी दोन वर्षांची प्रतीक्षा!

मुंबई/प्रतिनिधी- दादर येथील इंदू मिल परिसरात उभारण्यात येत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाच्या कामाला पुन्हा एकदा ब्रेक लागला आहे. यंदा पूर्ण होण्याची अपेक्षा असलेल्या या स्मारकाचे काम आता तब्बल दोन वर्षे लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम जागतिक बाजारपेठेतील तांबे आणि कांस्य धातूंच्या किमतीवर झाला असून, कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ झाल्याने स्मारकाच्या प्रकल्पाचा खर्च वाढला आहे. परिणामी, गेल्या सहा महिन्यांपासून स्मारकातील मुख्य पुतळ्याचे काम ठप्प असल्याची माहिती समोर आली आहे.

पुतळ्याच्या कामासाठी कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतीचा फरक मिळावा, अशी मागणी कंत्राटदाराकडून करण्यात आली आहे. त्यासाठी अंदाजे ३५० कोटी रुपयांचा वाढीव खर्चाचा प्रस्ताव राज्य सरकाराकडे सादर करण्यात आला आहे. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून या प्रस्तावावर सरकारकडून कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आलेला नसल्याने पुतळ्याचे काम रखडले आहे.



२०१८ मध्ये शापूरजी पालनजी समूहाला या स्मारकाचे बांधकाम करण्याचे कंत्राट देण्यात आले, तेव्हा प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे ७६३ ते ७८३ कोटी रुपये होता. सुरुवातीला पुतळ्याची उंची २५० फूट प्रस्तावित होती. त्यानंतर त्यामध्ये बदल करून पुतळ्याची उंची ३५० फूट, तर पादपीठाची उंची १०० फूट अशी एकूण ४५० फूट उंची निश्चित करण्यात आली. आराखड्यातील बदल आणि बांधकाम साहित्याच्या किमतीतील वाढ यामुळे प्रकल्पाचा खर्च सुमारे १,०८९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला. आता नव्या वाढीव प्रस्तावामुळे प्रकल्पाचा एकूण खर्च १,२०० कोटी रुपयांच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, स्मारकातील सहाय्यभूत इमारतींच्या कामाने समाधानकारक प्रगती केली आहे. लायब्ररी, सभागृह, संग्रहालय यांसारख्या इमारतींचे स्ट्रक्चरल काम जवळपास ९५ टक्के पूर्ण झाले आहे. मात्र, स्मारकाचे मुख्य आकर्षण असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याचे कामच आर्थिक आणि प्रशासकीय कारणांमुळे रखडल्याने संपूर्ण प्रकल्पाच्या पूर्णत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

२००७ पासूनचा स्मारकाचा प्रवास

इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. २००७ ते २०११ या काळात आंबेडकरी चळवळीतील नेते आणि कार्यकर्त्यांनी या मागणीसाठी सातत्याने आंदोलने केली. २०११ मध्ये या मागणीला मोठे आंदोलन आणि मोर्चांच्या माध्यमातून व्यापक स्वरूप प्राप्त झाले.डिसेंबर २०१२ मध्ये तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी संसदेत इंदू मिलची १२ एकर जागा स्मारकासाठी देण्यास केंद्र सरकारची सैद्धांतिक मान्यता असल्याची घोषणा केली. एप्रिल २०१५ मध्ये केंद्र सरकारचे वस्त्रोद्योग मंत्रालय, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ (ऊए) आणि महाराष्ट्र सरकार यांच्यात जमीन हस्तांतरणासाठी त्रिपक्षीय करार झाला. त्यानंतर ११ ऑक्टोबर २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्मारकाचे भूमिपूजन करण्यात आले.२०१७-२०१८ या कालावधीत स्मारकाचा अंतिम आराखडा निश्चित करण्यात आला. ➪(पान २ वर)

सांस्कृतिक संबंध हीच जागतिक शांततेची सर्वात मोठी हमी-पंतप्रधान

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- संपूर्ण जगभरात युद्ध आणि अशांततेच्या चर्चा सुरू असतानाच, येथे भारतात आम्ही सांस्कृतिक संबंधांवर चर्चा करत आहोत. हे यासाठीही महत्त्वाचे आहे, कारण सांस्कृतिक संबंध हीच जागतिक शांततेची सर्वात मोठी हमी आहे. यामुळे आजच्या कार्यक्रमाचे महत्त्व अधिकच वाढले आहे, असे पंतप्रधाननरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. ते शुक्रवारी शांघाय सहकार्य संघटनेच्या (SCO) पहिल्या सांस्कृतिक संवादाला संबोधित करत होते.

मोदी म्हणाले, 'काही महिन्यांपूर्वीच शांघाय सहकार्य संघटनेने (SCO) आपल्या स्थापनेची २५ वर्षे पूर्ण केली आहेत. गेल्या काही वर्षांत, एण्ड ने सुरक्षा, अर्थव्यवस्था आणि कनेक्टिव्हिटीमध्ये सहकार्य लक्षणीयरीत्या वाढवले आहे. अशा परिस्थितीत, सांस्कृतिक सहकार्यामुळे विविध देशांमधील संबंध अधिक दृढ होतील.' मोदी पुढे



म्हणाले, 'मला विश्वास आहे की, हे व्यासपीठ नवीन विचारांना चालना देईल, सांस्कृतिक सहकार्यासाठी नवीन संधी निर्माण करेल आणि आपले सामायिक सांस्कृतिक अनुभव जगाला एकत्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावतील.

पंतप्रधान मोदी दिल्लीच्या पुराणा किल्ल्याच्या इतिहासावर बोलले

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, 'आपण सध्या दिल्लीच्या 'पुराना किला' येथे आहोत. हा भारताचा एक अद्भुत सांस्कृतिक वारसा आहे. त्याचा इतिहास जेवढा आकर्षक आहे, तेवढाच तो सुविधादायीही आहे. तुम्ही याबद्दल येथे वाचले किंवा ऐकले असेल. विद्वानांच्या मते, या किल्ल्याचा इतिहास हजारो वर्षांपूर्वीच्या महाभारताच्या काळापर्यंत जातो. अशा प्राचीन स्थळी, भव्य सांस्कृतिक कार्यक्रम, वैदिक मंत्रांचे पठण, बौद्ध तत्त्वज्ञान आणि भगवान हनुमानाची यात्रा... या गोष्टी भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब होत्या आणि त्यातून मानवतेसाठी प्रेम व एकतेचा संदेश दिला जात होता.'तसेच, 'ही भावना, हा विचार, ही शिकवण जेवढी प्राचीन, तेवढेच वैश्विकही आहे. त्या भौगोलिक सीमा ओलांडून आपल्याला नैसर्गिकरित्या जोडतात.' हाच या शिखर परिषदेचे उद्दिष्ट आहे आणि हीच काळाची गरजही आहे,' असेही मोदी यावेळी म्हणाले.

राजस्थान जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेसची लाट

३७ पैकी २७ जिल्हा परिषदेत काँग्रेसची सत्ता

जयपूर/वृत्तसंस्था : राजस्थानमधील स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत भाजपचा मोठा पराभव झाला आहे. काँग्रेसच्या लाटेत भाजपचा दोन तृतियांशपेक्षा अधिक जागांवर पराभव झाला आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपचा पराभव झाला आहे. ३७ जिल्हा परिषदेच्या मतमोजणीत काँग्रेसनं २७ जिल्हा परिषदेत विजय मिळवला आहे. भाजपला ६ जिल्हा परिषदेत बहुमत मिळालं आहे.



राजधानी जयपूरमध्येही भाजपचा पराभव

जयपूरमध्ये भाजपचा पराभव- भाजपचा सर्वात मोठा पराभव राजधानी असलेल्या जयपूर जिल्हा परिषदेत झाला आहे. जयपूरच्या ५७ जागांपैकी भाजपला केवळ १२ जागांवर विजय मिळवता आला आहे. काँग्रेसनं ४१ जागांवर विजय मिळवला आहे. राजधानी जयपूरमधील २२ पंचायत समित्यांपैकी २ पंचायत समित्यांमध्ये भाजपला दोन ठिकाणी बहुमत मिळालं आहे. तर, काँग्रेसला १४ पंचायत समित्यात विजय मिळवला आहे. मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्या सांगानेर मतदारसंघात खासदार हनुमान बेनीवाल यांच्या राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टीनं बहुमत मिळवलं आहे. नागौर जिल्ह्यात असदुद्दीन ओवैसी यांच्या पाठिंब्यावर निवडूक लढवणाऱ्या खासदार हनुमान बेनीवाल यांच्या राष्ट्रीय लोकतांत्रिक पार्टीला बहुमत मिळालं आहे. ३ जिल्ह्यांमध्ये कोणत्याही पक्षाला बहुमत मिळालं नव्हतं. ४१९ पंचायत समित्यांच्या निकाल आणि कलांमध्ये काँग्रेस पक्षाला मोठा विजय मिळाला आहे.

२६९ पंचायत समित्यांमध्ये काँग्रेसला बहुमत - काँग्रेसला २६९ पंचायत समित्यांमध्ये बहुमत मिळालं आहे. भाजपला ७३ पंचायत समित्यांमध्ये विजय मिळाला आहे.

'आडनदी पंप स्टोरेज प्रकल्पा'ला पर्यावरणप्रेमी व अभ्यासकांकडून तीव्र विरोध

- आडनदी पंप स्टोरेज प्रकल्पासाठी २४ ठिकाणी रॉक टेस्टिंग
- अदाणीच्या मेळघाटातील प्रकल्पाबाबत प्रशासन अनभिज्ञ
- सर्वेक्षणाच्या हालचालींवर प्रश्नचिन्ह
- प्रत्यक्ष पाहणीत ड्रिलिंग मशीन्स कार्यरत असल्याचे स्पष्ट

अमरावती/प्रतिनिधी:- मेळघाटात चिखलदरा तालुक्यातील आडनदी येथे अदानी समूहाकडून प्रस्तावित असलेल्या ८,२५० कोटी रुपयांच्या 'आडनदी पंप स्टोरेज प्रकल्पा'ला पर्यावरणप्रेमी व अभ्यासकांकडून तीव्र विरोध दर्शवला जात आहे. स्वच्छ ऊर्जेच्या दाव्याखाली उभारल्या जाणाऱ्या या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या जंगलतोडीमुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची परिसंस्था आणि वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येण्याची चिंता व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर मेळघाटचे नंदनवन धोक्यात आल्याची भावना व्यक्त होत असून, हा प्रकल्प महाराष्ट्राबाहेर नेण्याची मागणी जोर धरत आहे.




आदिवासीबहुल मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात प्रस्तावित अदाणी समूहाच्या १,५०० मेगावॅट क्षमतेच्या आडनदी पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पाच्या प्राथमिक सर्वेक्षणाला वेग आला असताना, या प्रकल्पाबाबत अमरावती जिल्हा प्रशासनच अनभिज्ञ असल्याचे समोर आले आहे. वनविभागाकडून २४ ठिकाणी रॉक टेस्टिंगसाठी परवानगी देण्यात आली असून, जंगलात ड्रिलिंग यंत्रसामग्रीच्या माध्यमातून भूवैज्ञानिक तपासणी सुरू आहे. मात्र, जिल्हा परिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी कार्यालयात चौकशी केली असता या प्रकल्पासंदर्भातील माहिती उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे मेळघाटातील राखीव वनक्षेत्रात सुरू असलेल्या हालचाली आणि प्रशासकीय यंत्रणांमधील समन्वयाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

या संदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक सत्यम गांधी यांना विचारले असता, आपल्याकडे या प्रकल्पाबाबत कोणतीही माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयातही याबाबत चौकशी करण्यात आली. मात्र, संबंधित विभागाकडे माहिती उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. प्रस्तावित प्रकल्पाची जागा वनविभागाच्या अखत्यारीत येत असल्याने यासंदर्भात माहिती देण्यास संबंधित अधिकाऱ्यांनी असमर्थता दर्शविली.

२४ ठिकाणी रॉक टेस्टिंगला परवानगी: चिखलदरा तालुक्यातील आडनदी परिसरात अदाणी समूहाच्या अदाणी हायड्रो एनर्जी स्टोरेज प्रा. लि. कंपनीकडून सुमारे १,५०० मेगावॅट क्षमतेचा पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ८,२५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती आहे. प्रकल्पाच्या प्राथमिक सर्वेक्षणासाठी कंपनीने १९ डिसेंबर २०२५ रोजी वनविभागाकडे अर्ज केला होता. अर्जातील त्रुटी दूर केल्यानंतर २२ जानेवारी २०२६ रोजी सुधारित अर्ज सादर करण्यात आला. त्यानंतर प्रादेशिक वनविभाग, परतवाडा यांनी २ मार्च २०२६ रोजी २४ ठिकाणी बोअरहोल करून रॉक टेस्टिंग करण्यास अटींच्या अधीन राहून परवानगी दिल्याची माहिती आहे. कंपनीने २५ बोअरहोलची परवानगी मागितली होती; मात्र २४ बोअरहोलसाठीच मान्यता देण्यात आली. २१ ठिकाणी खोदकाम पूर्ण झाले असून, ड्रिलिंगच्या माध्यमातून खडकांचे नमुने घेतले जात आहेत. दुर्गम डोंगराळ भागात अवजड यंत्रसामग्री, डिझेल इंजिन आणि पाइप नेऊन तपासणी केली जात आहे.



वृक्षतोड आणि रस्त्याला मनाई: वनविभागाने दिलेली परवानगी ही केवळ प्राथमिक सर्वेक्षण आणि भूवैज्ञानिक चाचण्यांपुरती मर्यादित आहे. या आधारे प्रकल्प उभारणी किंवा वनजमीन हस्तांतरणास अंतिम मंजुरी मिळालेली नाही. तपासणीदरम्यान वृक्षतोड करण्यास तसेच वनक्षेत्रात नवीन रस्ता तयार करण्यास मनाई असल्याचे परवानगीतील अटींमध्ये नमूद आहे. दुसरीकडे, दुर्गम जंगलात ड्रिलिंग मशीन, डिझेल इंजिन आणि अन्य साहित्य वाहून नेण्यासाठी मजुरांचा वापर होत असल्याचे वृत्त आहे. या कामाच्या अनुषंगाने जंगलातील हालचाली वाढल्या असून, काही पर्यावरण संघटनांनी



साहित्य वाहतुकीसाठी किंवा कामाच्या सोयीसाठी वृक्षतोड झाल्याचा आरोप केला आहे. वनविभागाच्या परवानगीमध्ये वृक्षतोड आणि रस्ता तयार करण्यास स्पष्ट मनाई असताना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी या अटींचे पालन होत आहे का, याची तपासणी होणे आवश्यक आहे.

मानद वन्यजीव रक्षकांकडून प्रकल्पस्थळाची प्रत्यक्ष पाहणी: दरम्यान, मेळघाटचे मानद वन्यजीव रक्षक राकेश मोहनराव महल्ले यांनी शुक्रवारी (दि. २० नोव्हेंबर) सकाळी आपल्या टीमसोबत डोंगरदऱ्यांमधून सुमारे ८ ते १० किलोमीटरचा पायी प्रवास करत आडनदी पंप स्टोरेज प्रकल्पस्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परिसरात जमिनीचे ड्रिलिंग करणाऱ्या मशीन्स आणि कामगार प्रत्यक्ष कार्यरत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. पाहणीदरम्यान या परिसरातील विस्तीर्ण वनसंपदा, दाट वृक्षराजी आणि नैसर्गिक डोंगररांगांचे पर्यावरणीय महत्त्व प्रकर्षाने समोर आले असून, भविष्यातील प्रकल्पाच्या परिणामांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

सह्याद्रीसारखी स्थिती सातपुड्या पर्वतरांगेत होऊ नये: मेळघाट हा जैवविविधतेने समृद्ध आणि पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील परिसर आहे. सागवान, अर्जुन यांसारख्या दुर्मीळ वृक्षसंपदेबरोबरच वन्यजीवांचे अधिवास आणि आदिवासींचे जंगलाशी असलेले अतूट नाते लक्षात घेता, प्रस्तावित प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता आणि पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन होणार का, हा खरा प्रश्न आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये विकासकामांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या प्रचंड वृक्षतोडीची पुनरावृत्ती मेळघाट आणि सातपुडा पर्वतरांगांमध्ये होऊ नये, अशी तीव्र भावना पर्यावरणप्रेमी व्यक्त करत आहेत. मेळघाटासारख्या अतिदुर्गम आणि आदिवासीबहुल भागातील राखीव वनक्षेत्रात मोठ्या क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्पाच्या पूर्वतयारीचे काम सुरू असताना जिल्हा प्रशासनाला त्याची माहिती का नाही, तसेच प्रत्यक्ष कामावर देखरेख कोण ठेवत आहे, याबाबत स्पष्टता येणे आवश्यक आहे. मात्र, या प्रकल्पाबाबत कमालीची गुप्तता पाळली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे.

'विकास आवश्यक आहे; मात्र मेळघाटचा निसर्ग, वनसंपदा आणि वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येऊन विकास होऊ नये. २० नोव्हेंबर रोजी आम्ही टीमसोबत ८ ते १० कि.मी.चा डोंगरदऱ्यांतून प्रवास करत प्रकल्पस्थळाची पाहणी केली असता, तेथे ड्रिलिंग मशीन्स आणि कामगार कार्यरत असल्याचे दिसले. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे भविष्यात हजारो वृक्ष, वन्यजीवांचे अधिवास आणि स्थानिक जैवविविधतेवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रकल्पाच्या सर्व पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास होणे अत्यंत गरजेचे आहे.'

● **राकेश महल्ले** (मानद वन्यजीव रक्षक, मेळघाट,अमरावती)

'आडनदी येथील प्रस्तावित प्रकल्पासाठी वनसंरक्षण कायद्याच्या नियमांनुसार केवळ प्राथमिक सर्वेक्षण व २४ ठिकाणी भू-तांत्रिक तपासणीचीच परवानगी दिली आहे. यामध्ये एकाही झाडाची तोड करण्याची मुभा दिलेली नाही. तसेच प्रकल्पासाठी अद्याप कोणतीही वनजमीन वळती केलेली नाही किंवा तसा प्रस्तावही आलेला नाही. त्यामुळे नागरिकांनी कोणताही संभ्रम बाळगू नये.'

● **योगेश तापस,** सहायक वनसंरक्षक (कॅम्प व वन्यजीव) घटांग

मेळघाटचे नंदनवन उद्ध्वस्त करण्याचा घाट

विकासाच्या नावाखाली मेळघाटचे नंदनवन उद्ध्वस्त करण्याचा हा घाट आहे. रोजगारात उच्च व तांत्रिक पदे बाहेरच्या लोकांना दिली जातील आणि स्थानिकांच्या वाट्याला केवळ मजुरी येईल. हा परिसर वाघ, बिबट आणि अस्वलासारख्या वन्य प्राण्यांचा मुख्य अधिवास असल्याने येथे हा प्रकल्प उभारणे योग्य नाही. संविधानानुसार प्राणी-पक्ष्यांनाही जगण्याचा अधिकार असल्याने निसर्ग नष्ट करणारा हा प्रकल्प शासनाने तातडीने महाराष्ट्राबाहेर न्यावा.

● **निलेश कांचनपुरे**, अध्यक्ष- वाईल्ड लाईफ अवेअरनेस अँड रेस्क्यू वेल्फेअर सोसायटी ,अमरावती





सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा घसरण

मुंबई/नवी दिल्ली : सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण सुरू असून गुंतवणूकदारांसह ग्राहकांनाही



मोठा धक्का बसला आहे. गेल्या काही महिन्यांत विक्रमी उच्चांक गाठणा-या या दोन्ही मौल्यवान धातूंचे भाव आता झपाट्याने खाली येत आहेत. शुक्रवारी भारतीय बाजारातही सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये मोठी घसरण झाली. विशेष म्हणजे, चांदीचा भाव प्रतिकिलो १.५० लाख रुपयांच्या खाली आला आहे. तर २४ कॅरेट सोन्याचा दर १० ग्रॅममागे सुमारे १.२१ लाख रुपयांपर्यंत घसरला आहे. लग्नसराईचा हंगाम सुरू होत असताना सोन्या-चांदीच्या ➪(पान २ वर)

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आईचे निधन

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या



मातोश्री सावित्री देवी यांचे शुक्रवारी उत्तराखंडमध्ये निधन झाले. त्या ९१ वर्षांच्या होत्या. वयोमानानुसार होणाऱ्या आजारांनी त्या त्रस्त होत्या, अशी माहिती पौरी पोलिसांनी दिली आहे. योगी आदित्यनाथ यांचे कुटुंब उत्तराखंडमधील पौरी गढवाल जिल्ह्यातील पंचूर गावातील आहे. पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, हरीद्वार येथे शनिवारी ➪(पान २ वर)

मासिक पाळीमुळे पोलीस भरतीची संधी हुकणार नाही; ६ दिवसांची मुदतवाढ

मुंबई/प्रतिनिधी- पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणींसाठी राज्य सरकारने दिलासादायक निर्णय जाहीर केला आहे. पोलीस भरतीच्या शारीरिक चाचणीच्या दिवशी मासिक पाळी आल्यामुळे आता महिला उमेदवारांची संधी हुकणार नाही. अशा



उमेदवारांना आरोग्य तपासणीनंतर शारीरिक चाचणी पूर्ण करण्यासाठी पाच ते सहा दिवसांची अतिरिक्त मुदत दिली जाणार आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी २० नोव्हेंबर रोजी याबाबत माहिती दिली. पोलीस होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अनेक तरुणी महिनोन्महिने मैदानावर ➪(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

१ व १० वरिल उर्वरित

इंदू मिलमधील डॉ.बाबासाहेब....

सुरुवातीच्या २५० फुटांच्या पुतळ्याची उंची वाढवून ३५० फूट करण्यात आली. १०० फुटांच्या पादपीठासह स्मारकाची एकूण उंची ४५० फूट निश्चित करण्यात आली. २०१८ मध्ये शापूरजी पालनजी समूहाला प्रत्यक्ष बांधकामाचे कंत्राट देण्यात आले.

यावर आता राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. खासदार संजय राऊत यांनी आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की,'समितीवरिल जे लोक असतील डॉ. प्रकाश आंबेडकर आणि कुटुंबियांनी या बाबतीत पुढाकार घेतला पाहिजे. डॉक्टर बाबासाहेबांच स्मारक व्हावं ही आम्हा सगळ्यांची इच्छा आहे.' असे ते म्हणाले. त्याचबरोबर ते पुढे ते म्हणाले की,'डॉक्टर आंबेडकरांच्या स्मारकाच सुद्धा अशा प्रकारे मूल्यांकन वाढल असेल तर त्याच्यावर सरकारने किंवा जे ट्रस्टी आहेत त्यांना खुलासा करावा लागेल.'तर दुसरीकडे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार निशाना साधला.'सरकारला खिरापत वाटताना, कर्जमाफ करताना, करडोच्या जमिनी उद्योगपतींच्या घशात घालताना त्यांना तिथे ही महागाई दिसत नाही.संविधान निर्माते विश्वरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे काम करताना यांना तिकडे महागाई दिसते, वाढलेले दर दिसत आहेत. थोडीतरी लाज राहू द्या.'असे ते म्हणाले. त्याचबरोबर पुढे 'एकीकडे संविधानाच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे मात्र कारण दापून ते स्मारक होण्यापासून पळायचं किंवा लांब टाकायचं हा सरकारचा डाव आहे.'असा आरोप त्यांनी केला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी स्मारकाच्या कामासाठी निधी उपलब्ध होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. 'सरकारकडे कुठल्याही प्रकारचे पैसे नाहीत. निधीअभावीच या प्रकल्पाच्या कामाला अडचणी निर्माण होत आहेत. काम मंजूर झाल्यानंतर भाववाढ आणि दरवाढ झाली असून, सध्याची परिस्थिती भयानक आहे. शासनाकडे पैसे नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. इतर कामांना ज्याप्रमाणे गती दिली जात आहे, त्याचप्रमाणे महापुरुषांच्या स्मारकासाठीही निधी देणे अपेक्षित आहे. मात्र, तो मिळत नसल्याची खंत आहे,' अशी टीका शशिकांत शिंदे यांनी केली.दरम्यान, गेली अनेक वर्षे विविध कारणांमुळे रखडलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या या भव्य स्मारकाचे काम आता आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तरी पूर्ण होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सोन्या-चांदीच्या दरात

दरातील ही घसरण ग्राहकांसाठी दिलासादायक ठरू शकते. मात्र, बाजारातील या घसरणीमुळे गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शुक्रवारी चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली. चांदीचा भाव एका दिवसात ७ टक्क्यांहून अधिक घसरून प्रतिकिलो १,४६,८६८ रुपयांवर आला. म्हणजेच एका दिवसात चांदी सुमारे १० हजार रुपयांनी स्वस्त झाली. विशेष म्हणजे, जानेवारी २०२६ मध्ये चांदीचा भाव प्रतिकिलो ४.२१ लाख रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला होता. मात्र, त्यानंतर सातत्याने घसरण होत असून, सध्याचा भाव त्या उच्चांकापेक्षा जवळपास २.७५ लाख रुपयांनी कमी झाला आहे. काही आठवड्यांपूर्वी चांदीचा भाव पुन्हा १.५० लाख रुपयांच्या खाली येईल, अशी अपेक्षाही अनेकांना नव्हती. मात्र, जागतिक बाजारातील घडामोडींमुळे चांदीच्या किमतींवर मोठा दबाव निर्माण झाला आहे.

सोन्याचा भावही ७० हजार रुपयांनी घसरला

चांदीप्रमाणेच सोन्याच्या किमतीतही मोठी घसरण झाली आहे. शुक्रवारी सोन्याचा भाव जवळपास ५ टक्क्यांनी खाली आला. २४ कॅरेट सोन्याचा दर १० ग्रॅममागे सुमारे १.२१ लाख रुपयांपर्यंत घसरला. एका दिवसात सोन्याच्या किमतीत जवळपास ६ हजार रुपयांची घट झाली. जानेवारी २०२६ मध्ये सोन्याचा भाव १० ग्रॅममागे सुमारे १.९१ लाख रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचला होता. मात्र, आता त्यात जवळपास ७० हजार रुपयांची घसरण झाली आहे. शुक्रवारी बाजार सुरू होताच मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये मोठ्या प्रमाणात विक्री सुरू झाली. डिसेंबर वायदे चांदीचा भाव जवळपास ७ टक्क्यांनी घसरला. तर डिसेंबर वायदे सोन्याचा भाव ५ टक्क्यांनी खाली आला. या घसरणीमुळे गुंतवणूकदार आणि सराफा बाजारातील व्यापा-यांमध्ये चिंता वाढली आहे.

अमेरिकेच्या निर्णयाचा सोन्या-चांदीला फटका

सोन्या-चांदीच्या किमती घसरण्यामागे अमेरिकेतील आर्थिक घडामोडी हे महत्त्वाचे कारण मानले जात आहे. अमेरिकेतील महागाई अपेक्षेपेक्षा जास्त असल्याने तेथील केंद्रीय बँक म्हणजेच फेडरल रिझर्व्ह व्याजदर वाढवण्याचा विचार करू शकते. अमेरिकेत व्याजदर वाढण्याची शक्यता निर्माण झाल्याने गुंतवणूकदारांचा कल सोन्या-चांदीऐवजी डॉलरकडे वाढत आहे. डिसेंबरमधील फेडरल रिझर्व्हच्या बैठकीत व्याजदरात ०.२५ टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता बाजाराकडून व्यक्त केली जात आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ

त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. योगी आदित्यनाथ यांचे वडील आनंद बिष्ट यांचे सहा वर्षांपूर्वी २०२० मध्ये वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले होते.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी योगी आदित्यनाथ यांच्याशी संवाद साधत आईच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला. त्याचबरोबर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही एक्सवर पोस्ट शेअर करत योगी आदित्यनाथ यांचे सांत्वन करत शोक व्यक्त केला.पीटीआयने दिलेल्या बातमीनुसार, सावित्री देवी यांचे शुक्रवारी सकाळी १० वाजून ४५ मिनिटांनी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. त्यांच्या मृत्यूची बातमी समोर आली तेव्हा योगी आदित्यनाथ हे उत्तर प्रदेशमध्ये एका कार्यक्रमात होते.

मासिक पाळीमुळे पोलीस

सराव करतात. धावणे, गोळाफेक आणि लांब उडी यांसारख्या शारीरिक चाचण्यांसाठी विशेष मेहनत घेतली जाते. मात्र, ऐन चाचणीच्या दिवशी मासिक पाळी सुरू झाल्यास काही तरुणींना तीव्र पोटदुखी, कंबरदुखी, थकवा, अशक्तपणा आणि चक्कर येण्यासारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे त्यांच्या कामगिरीवर परिणाम होण्याची शक्यता असते.ही अडचण लक्षात घेऊन राज्य सरकारने महिला उमेदवारांना अतिरिक्त संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. संबंधित उमेदवाराची आरोग्य तपासणी केल्यानंतर तिची परिस्थिती लक्षात घेऊन मुदतवाढ दिली जाणार आहे. त्यामुळे मासिक पाळीच्या नैसर्गिक प्रक्रियेमुळे अनेक महिन्यांची मेहनत वाया जाण्याची भीती कमी होणार आहे. दरम्यान, या निर्णयामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या हजारो तरुणींना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. विशेषतः ग्रामीण भागातील महिला उमेदवारांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

बाळांच्या कथित खरेदी-विक्री

सहा बालकांची देवाणघेवाण झाल्याची माहिती समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. यापैकी आतापर्यंत चार बालकांना सुरक्षित ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले असून, उर्वरित दोन बालकांचा शोध सुरू आहे. या प्रकरणात पहिले बालक गुन्हा दाखल झाला त्याचवेळी १९ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलिसांच्या ताब्यात आले होते. त्यानंतर १८ नोव्हेंबरला वर्धा जिल्ह्यातून दुसरे, तर १९ नोव्हेंबरला अमरावती जिल्ह्यातून तिसरे बालक सुरक्षित ताब्यात घेण्यात आले. शुक्रवारी २० नोव्हेंबरला अकोला जिल्ह्यातून चौथे बालक शोधून काढण्यात आले.

भोजने दाम्पत्याच्या पोलीस कोठडीत वाढ- भोजने दाम्पत्याच्या पोलीस कोठडीची मुदत शुक्रवारी संपल्याने त्यांना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांच्या पोलीस कोठडीत २१ नोव्हेंबरपर्यंत वाढ केली आहे. दरम्यान, गुरुवारी जिल्ह्यातून अटक करण्यात आलेल्या दाम्पत्यासह राजुरा (अमरावती) येथील मेरी ऊर्फ प्रतिभा संजय नगराळे (वय ४५) आणि डफरीन रुग्णालयातील कंत्राटी महिला कर्मचारी संगीता अशोक गवळी (वय ४६, रा. महाजनपुरा) यांना न्यायालयाने २३ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. शुक्रवारी अटक करण्यात आलेल्या अकोल्यातील पालक दाम्पत्याला शनिवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे.

तीन जिल्ह्यांतील पालकांचाही सहभाग- या प्रकरणात आतापर्यंत डॉ. वैशाली भोजने, प्रफुल्ल भोजने, मयूर थांडगे, एक विधिसंघर्षग्रस्त बालक, निर्मल सरदार, मेरी ऊर्फ प्रतिभा नगराळे आणि संगीता गवळी यांच्यासह वर्धा, अमरावती आणि अकोला जिल्ह्यांतील प्रत्येकी तीन महिला-पुरुष पालकांना अटक करण्यात आली आहे. त्यामुळे या कथित बालविक्री प्रकरणाचे जाळे तीन जिल्ह्यांपर्यंत विस्तारल्याचे स्पष्ट होत आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त नयन आलुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत. उर्वरित दोन बालकांचा शोध आणि या प्रकरणातील अन्य सहभागींची माहिती मिळविण्यासाठी पोलिसांची तपासाची चक्रे वेगाने फिरत आहेत.

नवविवाहितेवर अनैसर्गिक

विवाहितेचा विवाह १३ जुलै २०२५ रोजी भातकुली तालुक्यातील एका गावातील ३२ वर्षीय तरुणासोबत पारंपरिक पद्धतीने झाला होता. लग्नापूर्वी पतीने तुला पूर्ण स्वातंत्र्याने जगू देईल, असे आश्वासन दिले होते. मात्र, लग्नाच्या अवघ्या पंधरा दिवसांनंतरच सासू-सासऱ्यांनी खासगी नोकरी करण्यासाठी तसेच मुलांच्या शिकवण्या घेण्यासाठी तिच्यावर दबाव टाकण्यास सुरुवात केली. नोकरी करण्यास नकार दिल्याने सासरच्यांकडून तिचा छळ सुरू झाल्याचे तिने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. तक्रारीनुसार, १३ जुलै ते २५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत आरोपींनी तिच्या खाण्या-पिण्यावर निर्बंध घातले. दागिने घालण्यास मज्जाव केला, तर मंगळसूत्र आणि पायातील पैंजणही तोडल्याचा आरोप आहे. पतीकडून शारीरिक अपमानास्पद वागणूक दिली जात होती. तसेच लठ्ठपणा आणि अपत्य होत नसल्याचे टोमणे मारून मानसिक त्रास दिला जात होता. २४ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री पतीने तिच्यासोबत अनैसर्गिक कृत्य करण्याचा प्रयत्न केला. तिने विरोध करताच पतीने केस ओढून गळा दाबला आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दुसऱ्या दिवशी सासू-सासऱ्यांनी वाद घालून तिला घराबाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर पतीने तिला अंगावरील कपड्यांनिशी दुचाकीवर बसवून इर्विन चौकात सोडून दिल्याचा आरोप आहे.

गर्भातील बाळाची वाढ थांबल्याने गर्भपात-६ ऑक्टोबर २०२५ रोजी रुग्णालयातून विवाहितेने पतीला फोन करून आपण गर्भवती असल्याची माहिती दिली. मात्र, पतीने कोणतीही जबाबदारी स्वीकारण्यास नकार देत फोन कट केल्याचे तिने तक्रारीत नमूद केले आहे. पतीच्या मारहाणीमुळे पोटात दुखणे, संसर्ग आणि रक्तस्रावाचा त्रास झाला. परिणामी गर्भातील बाळाची वाढ थांबल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार गर्भपात करावा लागल्याचेही तिने म्हटले आहे. अखेर या प्रकरणी पोलीस उपायुक्तांच्या आदेशानंतर राजापेठ पोलिसांनी १९ नोव्हेंबर रोजी पती, सासू, सासरे आणि मामासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शन

४५० नामांकित कंपन्या व कृषी संस्थांचा सहभाग अपेक्षित आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमी पाण्यात फळबागा, ऊस व कापसाची शेती कशी करता येईल, याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. याशिवाय शेतीपूरक व्यवसाय, आधुनिक कृषी उपकरणे व तंत्रज्ञानाची माहितीही शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. ॲग्रोव्हिजन २०२६ ला एमएसएमईची मान्यता मिळाली आहे. स्टार्टअप, एमएसएमई व नवोन्मेषकांसाठी स्वतंत्र पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहे. दुष्काळी परिस्थितीत चाऱ्याचे व्यवस्थापन व पशु संगोपन कसे करावे यावर मार्गदर्शन, नियमित उत्पन्नासाठी पूरक उद्योगांवर विशेष कार्यशाळा आहे. लघुउद्योजक, स्टार्टअप व पीएमएफएमईची स्वतंत्र दालने राहतील. राष्ट्रीय, स्थानिक कृषी क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्या, ग्रासरूट लेव्हल इनोव्हेटर्स, कृषी क्षेत्रातील डिलर्स / डिस्ट्रीब्युटर्स, चॅनल पार्टनर्सचा सहभाग आहे.

मोफत कार्यशाळा-अग्रोव्हिजनमध्ये ३० कार्यशाळांचे आयोजन आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन या परिस्थितीशी सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना विशेष मार्गदर्शन म्हणून दुष्काळी परिस्थितीत एआयचा वापर करून संत्रा बागांचे व्यवस्थापन, पशुसंगोपन व चाऱ्याचे नियोजन, पाण्याचा योग्य वापर व पाणी नियोजनाच्या यशोगाथा, दुष्काळातील पीक नियोजन यावर विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

एकाच रात्री चार दुकाने फोडली;

शटर उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी दुकानांमधील साहित्याची नासधूस करण्याऐवजी थेट काउंटर आणि गल्ल्यांना लक्ष्य केले. टॉमीच्या साहाय्याने काउंटरचे कुलूप तोडून आतील रोकड काढल्यानंतर त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. चोरट्यांनी सर्वप्रथम रचना कमर्शियल मार्केटच्या तळमजल्यावरील एकविरा व्हेटरनरी मेडिकल आणि अंकित व्हेटरनरी मेडिकल या दुकानांना लक्ष्य केले. याशिवाय मनपा मार्केटमधील दुकानांमध्येही चोरी करण्यात आली. चारही दुकानांमधून मिळून सुमारे दीड लाख रुपयांची रोकड चोरीला गेल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. चोरट्यांनी दुकानांचे कुलूप उघडण्याऐवजी थेट शटर उचकटण्याची पद्धत वापरली. त्यानंतर टॉमीच्या साहाय्याने काउंटरचे कुलूप तोडून गल्ल्यातील रोकड काढली. संपूर्ण कारवाई काही मिनिटांत उरकून टोळी पसार झाली. विशेष म्हणजे, दुकानातील इतर साहित्याला हात न लावता चोरट्यांनी केवळ रोकड लुटण्यावर भर दिल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून दिसून येत आहे.

परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये चारही चोरटे स्पष्टपणे दिसत आहेत. सर्वांनी पायात बूट, अंगात स्वेटर आणि चेहऱ्यावर मास्क घातले होते. ओळख लपविण्यासाठी दोघांनी डोक्यावर दुपट्टेही बांधले होते. दोघे बाहेर थांबून पहारा देत असताना अन्य दोघे दुकानांमध्ये चोरी करत असल्याचे फुटेजमध्ये दिसत आहे. या फुटेजच्या आधारे सिटी कोतवाली पोलिस आणि गुन्हे शाखेचे पथक चोरट्यांचा माग काढत असून, आरोपींची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे.

मेळघाटातील लाडक्या बहिणींना

आरोग्य उपसंचालक डॉ. आरती कुलवाल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.प्रवीण पारीसे उपस्थित होते.

राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगीतले, राज्य व केंद्र शासनाच्या महिला आणि बालकांसाठी विविध योजना राबविण्यात येते. या कल्याणकारी योजना आणि कार्यक्रमांमुळे मेळघाटातील महिला व बालमृत्यू दरात घट झाली आहे. या भागातील संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण उत्तमरित्या वाढले आहे. गरोदर महिलांना प्रसुतीपूर्व आणि पश्चात सकस आहार व उत्तम आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांसह आशा, अंगणवाडी सेविका दुर्गम भागातही घरोघरी जाऊन योजना प्रभावीपणे पोहचवित आहेत. या माध्यमातून गरोदर माता, स्तनदा माता आणि नवजात बालकांची काळजी घेण्यात येत आहे.

राज्यात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' आणि 'लेक लाडकी योजनां'ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. महिलांना शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्यात येत आहे. महिलांना वार्षिक १ ते ५ लाखांचे उत्पन्नाचे साधन मिळवून देत देशातील ३ कोटी महिलांना लखपती दिदी बनविण्याची महत्वाकांक्षी योजना हाती घेण्यात आली आहे.राज्यातही ५० लाख लखपती दिदी बनविण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या कार्याला अधिक गती देऊन प्रभावी अंमलबजावणीतून लखपती दिदी निर्माण करण्यावर भर देण्यात येईल.

यावेळी आमदार काळे, नगराध्यक्ष माथने, भिलावेकर यांनी मार्गदर्शन केले. काटकुंभ येथील साई महिला बचत गटाच्या प्रमुख सरोजनी नागले,काजलडोह येथील आशा गट प्रवर्तिका मालती ऊईके, चुरणी येथील अंगणवाडी सेविका शिला सुखदेवे यांनी मनोगत व्यक्त केले.

सुरूवातीला स्थानिक महिला व पुरुषांनी पारंपरिक आदिवासी नृत्याद्वारे राज्यमंत्री बोर्डीकर यांचे स्वागत केले. तत्पूर्वी राज्यमंत्री बोर्डीकर यांनी काटकुंभ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, चुरणी येथील ग्रामीण रुग्णालयाला भेट दिली. तसेच जारीदा येथील ३३ केव्ही क्षमतेच्या वीज उपकेंद्राला भेट दिली. चुरणी गावातील दोन अंगणवाड्या आणि आरोग्य वर्धिनी आशा उपकेंद्रालाही भेट देऊन पाहणी केली.

समृद्धी महामार्गावर लुटमारीच्या

अशोक भोगे, हेडकॉन्स्टेबल नितीन काकडे, पोलीस कर्मचारी गजानन देवकाते, सैनिक व एमएसएफ जवानांच्या पथकाने चेंज क्रमांक ५९/८०० परिसरात एमएच ०४ एडब्ल्यू ५८१८ क्रमांकाची ओमनी कार ताब्यात घेतली.

या कारमध्ये तकलीम बुंदा खा खान (वय २२), नसीम शमीम खान (वय १८), समीर पप्पान खान (वय १८) आणि नौशाद शमीम खान सर्व रा. शेखापूर, आग्रा, उत्तर प्रदेश) हे चौघे होते. ते अहमदनगर येथून भंडाऱ्याकडे जात असल्याचे सांगण्यात आले. वाहनाची तपासणी केली असता ते नादुरुस्त असल्याने चालकाला थांबत थांबत प्रवास करावा लागत असल्याचे समोर आले. चौघेही पेंटिंगचे काम करणारे असल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, समृद्धी महामार्गावर अमरावतीहून नागपूरकडे जाणाऱ्या वाहनांच्या मार्गावर तीन ते चार युवक खिळे टाकून वाहने पंक्चर करीत लूटमार करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे संशयावरून या तरुणांना चौकशीसाठी सावंगी पोलीस ठाण्यात आणण्यात आले.

मात्र, चौकशीत त्यांच्याविरुद्ध कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे आणि लूटमार किंवा खिळे टाकण्याच्या प्रकारात त्यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले नाही. त्यामुळे त्यांना सोडण्यात आल्याची माहिती सावंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विनोद गिरी यांनी दिली.

दर्यापूर तालुक्यातील ७४

आराळा, बोराळा, चंडिकापूर, नांदेड बु, सासन बु, पनोरा, म्हैसपूर मोचर्डा, नरसिंगपूर, रामतिर्थ, डोंगरगाव, लेहेगाव, रामगाव, उमरी ममदाबाद, पिंपळोद, लोतवाडा, जसापूर, पिंपळखुटा, या सर्वसाधारण राखीव झाल्या असून पेठ इतबारपूर, शिवर बु, तेलखेडा, कळमगव्हान, नाचोना, सांगळूद, लासूर, माटरगाव, बेबळा बु, या ग्रामपंचायत अनुसूचित महिलासाठी राखीव आहेत.तर कोळंबी, कान्होली, थिलोरी, टाकळी, करतखेडा, शिंगणावाडी, चंद्रपूर, गौरखेडा, या ग्रामपंचायत अनुसूचित जाती साठी राखीव आहेत. घडा, एरंडगाव अनुसूचित जमाती महिलासाठी तर टोगलाबाद, गायवाडी अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत. ही सोडत तहसिलदार डॉ. रविंद्रकुमार कानडजे, नायब तहसिलदार प्रविण जमदाळे, व प्रफुल्ल बोरखडे यांच्या उपस्थितीत पार पडली.

अंजनगाव तालुक्यातील ४९

असून, अनेक गावांमध्ये कही खुशी कही गम असे चित्र पाहायला मिळत आहे. दिनांक ८ जुलै २०२५ रोजी काढण्यात आलेले अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षणामध्ये दिनांक १३ जून २०२५ च्या अधिसूचनेन्वये कोणताही बदल होत नाही. केवळ नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण या प्रवर्गातील महिलांसह यांचे आरक्षणामध्ये जिल्हाधिकारी अमरावती यांचे पत्र क्र. कक्ष-८/म.स./प्रापनि/स.अ/कावि-१२३८/२०२६, दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ नुसार बदल करण्यात येत आहे, असे या यादीत नमूद करण्यात आले आहे. दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी व उपविभागीय अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी यांच्या स्वाक्षरीने ही अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. आरक्षण जाहीर होताच अनेक गावांमध्ये इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. ज्या गावात आपल्या प्रवर्गाला व महिलांना संधी मिळाली आहे, तिथे आनंदाचे वातावरण आहे. तर ज्या गावात अनेक वर्षांपासून तयारी करून ठेवलेल्या पुढाऱ्यांचे आरक्षण फिरले आहे, तिथे नाराजीचा सूर आहे. विशेषतः महिला आरक्षण आल्यामुळे अनेक गावांमध्ये महिला भगिनींना पहिल्यांदाच सरपंच होण्याची संधी मिळणार असून, त्यांच्या कुटुंबियांमध्ये उत्साह दिसून येत आहे.आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे आरक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत गाव पातळीवर बैठका, गट-तटाच्या चर्चा आणि उमेदवारीसाठी चाचपणी वाढण्याची शक्यता आहे.

अनुसूचित जाती - एकूण ११ ग्रामपंचायती-हिरापूर - खुला, कोतेगाव - खुला, पोही - महिला, मलकापूर बु. - महिला, शेलगाव - महिला, दहीगाव खुर्द - महिला, चिंचोली शिंगणे - खुला, पिंपळगव्हाण - महिला, वनोजा - खुला, एकलारा - खुला, खिराळा - महिला

अनुसूचित जमाती - एकूण १ ग्रामपंचायत-हंतोडा - महिला

नागरिकांचा मागास प्रवर्ग - एकूण १२ ग्रामपंचायती- साखरी - खुला, काळगव्हाण - खुला, अडगाव खाडे - महिला, खासपूर - महिला, कारला - खुला, टाकरखेडा मोरे - खुला, चौसाळा - महिला, सातेगाव - खुला, कमालपूर तरोडा - महिला, चिंचोली बु. - खुला, कोकर्डा - महिला, खानापूर पांढरी - महिला

सर्वसाधारण - एकूण २५ ग्रामपंचायती- पोटरगाव - महिला, लाखनवाडी - महिला, जवळा बु. - महिला, खिरगव्हाण - खुला, निंभारी - महिला, लखाड - खुला, वरुड खु. - महिला, हिंगणी - महिला, मुन्हा बु. - महिला, हुसेनपूर खोडगाव - खुला, जवर्डा - खुला, चिंचोली खुर्द - खुला, हसनापूर पाडी - महिला, बोराळा - महिला, भंडारज - महिला, निमखेड बाजार - खुला, विहीगाव बु. - खुला, कसबेगव्हाण - महिला, धनेगाव - खुला, हयापूर - महिला, कापूसतळणी - खुला, कुंभारगाव बु. - खुला, गावंडगाव बु. - महिला, तुरखेड - खुला, सोनगाव - खुला

ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

मिळत असल्याबद्दल तसेच उपकेंद्राच्या स्वच्छतेबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. अतिदुर्गम व जंगलव्याप्त मेळघाट परिसरासाठी ऑक्टोबर २०२५ मध्ये ३३ केव्ही जरीदा उपकेंद्र नव्याने उभारून कार्यान्वित करण्यात आले असून, या उपकेंद्रासाठी मध्य प्रदेशातून वीज पुरवठा घेतला जातो. सुरुवातीला ५ एमव्हीए क्षमतेच्या या उपकेंद्रात विजेची वाढती मागणी लक्षात घेऊन मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत ऑक्टोबर २०२६ मध्ये ५ एमव्हीए क्षमतेचा अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आला आहे. यामुळे परिसरातील ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठ्यासोबतच 'मागेल त्याला वीज जोडणी' देणे शक्य झाले आहे. या पाहणी दरम्यान राज्यमंत्री बोर्डीकर यांनी मेळघाटातील वीज पुरवठ्याच्या स्थितीबाबत मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्याशी सविस्तर चर्चा केली. तसेच यावेळी 'महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सौर योजना (स्मार्ट)' आणि 'पीएम सूर्यघर मोफत वीज योजने'चे अनुदान व फायदे ग्राहकांपर्यंत पोहोचवून मेळघाटातील अधिकाधिक नागरिकांना या योजनांत समाविष्ट करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. भेटीदरम्यान त्यांच्या हस्ते उपकेंद्र परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

या प्रसंगी आमदार केवलराम काळे, मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, कार्यकारी अभियंता विकास शहाडे, अचलपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष रूपाली माथने, प्रभुदास भिलावेकर, उपकार्यकारी अभियंता निलेश बोरीकर, कनिष्ठ अभियंता अजय टाले, तंत्रज्ञ भारत धुर्वे, प्रियंका मालठाने आदी मान्यवर उपस्थित होते.

मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच

वृद्धीसाठी बँक सातत्याने प्रयत्नशील असल्याचे नमूद केले.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रमुख पन्नम कुमार यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या विविध एमएसएमई कर्ज योजना, उद्योगवाढीसाठी उपलब्ध आर्थिक सुविधा, तसेच उद्योजकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. बँकेच्या माध्यमातून नवउद्योजकांना प्रोत्साहन देणे आणि विद्यमान उद्योगांना आर्थिक बळकटी प्रदान करण्यात येत असल्याचे सांगितले.

मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्पच्या माध्यमातून विविध व्यावसायिक, उद्योजकांना २२ कोटी रुपयांचे कर्ज वितरीत करण्यात आले. यामुळे जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना मिळून रोजगारनिर्मिती आणि स्थानिक आर्थिक विकासाला हातभार लागणार आहे. यावेळी बी. अनुषा यांनी बँकेच्या कर्ज योजनांचे सादरीकरण केले. नवनीत इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी आभार मानले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज

आणि कुटुंब कल्याण मंत्रालय प्रतापराव जाधव, मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे; मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव पाटील, कामगारमंत्री आकाश फुंडकर, आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि योगेश कदम उपस्थित राहणार आहेत.

तसेच खासदार डॉ.अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, आमदार प्रवीण पोटे पाटील, धीरज लिंगाडे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, किरण सरनाईक, संजय खोडके, सुलभा संजय खोडके, केवलराम काळे, राजेश वानखडे, रवि राणा, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, उमेश ऊर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे आणि अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी उपस्थित राहतील. ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावर तज्ज्ञ डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांचे मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमात मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अमरावती विभागातील विभागस्तरीय व जिल्ह्यातील जिल्हास्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान सन २०२५-२६ विभागस्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कार पटकविणाऱ्यात प्रथम - ग्रामपंचायत सावळी, ता. जि. बुलढाणा, रक्कम १कोटी रूपये, द्वितीय - ग्रामपंचायत पार्डी, ता. जि. बुलढाणा, रक्कम ८० लाख रूपये, तृतीय – एरंडगांव, ता. नांदगांव खंडेश्वर, जि. अमरावती, रक्कम ६० लाख रूपये यांचा समावेश आहे.

सन २०२५-२६ अमरावती जिल्हास्तरीय अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारात प्रथम - ग्रामपंचायत घोडसगाव. अंजनगांव सूजी, रक्कम ५० लाख, द्वितीय - ग्रामपंचायत बेलोरा, ता. चांदूर बाजार, रक्कम ३० लाख, तृतीय - ग्रामपंचायत देवगाव, ता. अचलपूर, रक्कम २० लाख रूपये यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमात अभियान सन २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय क

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

बाळासाहेबांच्या छायाचित्राचा अवमान ; उद्धवसेना आक्रमक

शायना एनसी यांच्या प्रतीकात्मक छायाचित्राला जोडेमारो

■ प्रतिनिधी | वाशिम ■

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र फाडल्याच्या घटनेचा निषेध करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने गुरुवारी पाटणी चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी शायना एनसी यांच्या प्रतीकात्मक छायाचित्राला जोडेमारो आंदोलन करून घटनेचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला.



बाळासाहेब ठाकरे हे महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील आदरणीय व्यक्तिमत्त्व होते. शिवसैनिकांच्या मनात त्यांच्याविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे. अशा व्यक्तिमत्त्वाच्या छायाचित्राचा अवमान करणे निषेधार्ह असून, यामुळे शिवसैनिकांच्या भावना दुखावल्याची नाराजी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या घटनेच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यातील शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक एकत्र आले. त्यांनी शायना एनसी यांच्या प्रतीकात्मक छायाचित्राला जोडेमारो आंदोलन करून आपला संताप व्यक्त केला.या आंदोलनात जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, जिल्हा समन्वयक डॉ. सिद्धार्थ देवळे, लोकसभा संघटक कॅप्टन प्रशांत सुर्वे, उपजिल्हाप्रमुख संतोष सुर्वे, विधानसभा संघटक पांडुरंग पांढरे, विधानसभा समन्वयक रवी पाटील, तालुकाप्रमुख गणेश इंगोले, तालुका संघटक आनंदा काळे, तालुका समन्वयक रमेश घुगे, शहर संपर्कप्रमुख गजानन भादुर्गे, शहरप्रमुख गजानन जोगदंड, क गणेश गाभणे, रोहिणी गोरे, कल्पना गोरे, नगरसेवक नामदेव हजारे, भावेश गोरे, नूर शेख, दीपक वानखेडे, दीपक इडोळे, शंकर सावके, दादाराव धनगर, गजानन मुसळे, पवन वाघ, विठ्ठल चौधरी उपस्थित होते.

कारवाईची मागणी

बाळासाहेब ठाकरे यांच्या छायाचित्राचा अवमान करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करावी. सार्वजनिक जीवनातील आदरणीय व्यक्तिमत्त्वांचा सन्मान राखला जावा, अशी मागणी शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी केली.

प्रस्तावित एमआयडीसीसाठी भाजप लोकप्रतिनिधींची २५० एकर शेतजमीन

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या नावाखाली बोरगाव मंजू येथे प्रस्तावित औद्योगिक क्षेत्र (एमआयडीसी) उभारण्यासाठी भाजपमधीलच काही प्रभावी लोकप्रतिनिधींच्या २५०एकर शेतजमीनीचे भूसंपादन केल्याचा घणाघाती आरोप शुक्रवारी (२० नोव्हेंबर) उद्धवसेनेचे जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकार यांनी केला आहे. कवडीमोल दराने विकत घेतलेल्या शेत जमिनीचा पाचपट आर्थिक मोबदला मिळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाजपमधील लोकप्रतिनिधींकडूनच राज्य शासनाची फसवणूक केली जात असल्याचे जिल्हाप्रमुख मुरूमकार यांनी नमूद केले आहे.

बोरगाव मंजू येथे अतिरिक्त अकोला औद्योगिक क्षेत्र (एमआयडीसी) उभारण्यासाठी ५१०.५२ हेक्टर क्षेत्र भूसंपादन करण्यास राज्य शासनाच्या उच्च अधिकार समितीने तत्वतः मान्यता दिली आहे. जिल्ह्याच्या राजकारणात विकास पर्वाचा गवगवा करणाऱ्या भाजपमधील काही लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संगणमत करून खासगी आणि शासकीय जमिनीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. यामध्ये सुमारे ७०० हेक्टर पैकी ५१०.५२ हेक्टर जमिनीवर औद्योगिक क्षेत्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे. भूसंपादन केलेल्या जमिनीपैकी तब्बल २५० एकर शेत जमीन भाजपमधील काही लोकप्रतिनिधींची असल्याचा आरोप उद्धवसेनेचे जिल्हाप्रमुख मुकेश मुरूमकार यांनी केला आहे. औद्योगिक क्षेत्राच्या विस्ताराची गरज असल्याचे ढोल वाजवणाऱ्या भाजपमधील काही लोकप्रतिनिधींच्या मालकीचे एमआयडीसीतील सहा कारखाने व लघु उद्योग का बंद पडले? याचाही खुलासा संबंधितांनी करण्याचे आव्हान जिल्हाप्रमुख

राज्य शासनाची दिशाभूल; उद्धवसेनेच्या जिल्हाप्रमुखांचा घणाघाती आरोप



प्रस्तावित एमआयडीसीसाठी स्वतःसह नातेवाईक व काही मर्जीतील शेतकऱ्यांच्या नावे असलेली २५० एकर शेत जमीन देऊन शासनाची कोट्यवधी रुपयांनी आर्थिक लुबाडणूक व फसवणूक करणाऱ्या संबंधित लोकप्रतिनिधींची मुख्यमंत्र्यांना भेटून तक्रार करणार आहे.

- मुकेश मुरूमकार,
जिल्हाप्रमुख उद्धवसेना

खडकाळ जमिन; कोट्यवधींचा मलिदा

अकोला एमआयडीसीपासून ते बोरगाव मंजूपर्यंत राष्ट्रीय महामार्गलगत सिसा-मासा, बोंदरखेड आदी भागातील खडकाळ जमीन शेतकऱ्यांकडून अत्यल्प दरात खरेदी करण्यात आली. या जमिनीपासून मोठा आर्थिक लाभ मिळविण्याच्या उद्देशातूनच बोरगाव मंजू परिसरात एमआयडीसीचा प्रस्ताव शासनाकडे रेटून धरण्यात आला. यातून स्वतःचे उखळ पांढरे केल्या जात असल्याचे जिल्हाप्रमुख मुरूमकार यांनी नमूद केले आहे.

प्रदेशाध्यक्ष, संघटन मंत्र्यांनी दखल घ्यावी!

उद्धवसेनेचे उपनेते, आमदार नितीन देशमुख हे चार कोटी रुपयांच्या आलिशान वाहनातून फिरतात, अशी टीका करणाऱ्या भाजपने प्रस्तावित एमआयडीसीच्या नावाखाली राज्य शासनाची कोट्यवधी रुपयांनी फसवणूक करण्याचा घाट घातला आहे. या गंभीर प्रकाराची भाजपचे प्रदेशाध्यक्ष तसेच संगठन मंत्र्यांनी दखल घ्यावी, अशी मागणी जिल्हाप्रमुख मुरूमकार यांनी केली आहे.

वीजबिल थकबाकीदारांना मोठा दिलासा ; अभय योजनेतून व्याज व विलंब आकार माफ!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

मानोरातील ९,५१२ कायमस्वरूपी वीजजोडणी खंडित ग्राहकांना लाभाची संधी; ७ कोटी २४ लाखांची थकबाकी

वीजबिलाच्या थकबाकीमुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ग्राहकांना दिलासा देण्यासाठी महावितरणने 'अभय योजना २०२६-२७' जाहीर केली आहे. या योजनेमुळे मानोरा तालुक्यातील तब्बल ९ हजार ५१२ ग्राहकांना थकबाकीमधून सवलत मिळविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या ग्राहकांकडील ७२४.७० लाख रुपये (७ कोटी २४ लाख ७० हजार रुपये) थकबाकीपैकी ९.०६ लाख रुपये विलंब आकार आणि ८७.३२ लाख रुपये व्याज माफ होणार आहे.

महावितरणकडून ही योजना ६ नोव्हेंबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत राबविण्यात येत आहे. आर्थिक अडचणीमुळे वीजबिल भरता न आल्याने ज्यांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला आहे, अशा पात्र ग्राहकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. पात्र ग्राहकांना व्याज आणि विलंब आकारातून १०० टक्के सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच तात्पुरता वीजपुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांनाही नियमानुसार सवलतीचा लाभ मिळणार आहे.

थकबाकीदार ग्राहकांना एकरकमी तसेच हप्त्यांमध्ये थकबाकी भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकरकमी रक्कम भरणाऱ्या पात्र ग्राहकांना एक रक्कमी भरणाऱ्यांना मूळ थकबाकी मध्ये २०३ सूट अतिरिक्त सवलतीची तरतूद असून, प्रीपेड स्मार्ट मीटरचा पर्याय स्वीकारणाऱ्या पात्र ग्राहकांना मूळ थकबाकीवर अतिरिक्त पाच टक्के सवलत मिळणार आहे. मानोरा तालुक्यात कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या ९,५१२ ग्राहकांकडे एकूण ७ कोटी २४ लाख ७० हजार रुपयांची थकबाकी आहे. त्यापैकी ९ लाख ६ हजार रुपयांचा विलंब आकार आणि ८७ लाख ३२ हजार रुपयांचे व्याज माफ होणार असल्याने ग्राहकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. थकबाकीची रक्कम भरून पात्र ग्राहकांना पुन्हा वीजजोडणी मिळविण्याची संधीही या योजनेतून उपलब्ध होऊ शकते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनी महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर किंवा महावितरण मोबाईल ॲपवर संपर्क साधावा. तसेच योजनेची पात्रता, थकबाकीचे विवरण आणि अर्ज प्रक्रियेबाबत जवळच्या महावितरण कार्यालयातून माहिती घ्यावी. १५ जानेवारी २०२७ ही योजनेची अंतिम मुदत असल्याने मानोरा तालुक्यातील जास्तीत जास्त थकबाकीदार ग्राहकांनी या अभय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे मानोरा उपकार्यकारी अभियंता रविंद्र गिरी यांनी केले आहे.

महात्मा फुले चौकातील अस्वच्छता, अतिक्रमणांमुळे नागरिक त्रस्त



■ प्रतिनिधी | कारंजा ■

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या पुण्यतिथीच्या पार्श्वभूमीवर शहरातील महात्मा फुले चौकातील स्मारकाच्या दुरवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्मारक परिसरातील अस्वच्छता, वाढती अनधिकृत अतिक्रमणे आणि सुरक्षिततेचा अभाव यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी आता आक्रमक भूमिका घेतली असून, प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे.

येत्या २८ नोव्हेंबर रोजी महात्मा जोतीराव फुले यांची पुण्यतिथी असून, या दिवशी अभिवादन करण्यासाठी कारंजा शहरासह परिसरातील हजारो नागरिक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि महात्मा फुले यांचे अनुयायी मोठ्या संख्येने चौकात उपस्थित राहतात. मात्र, ज्या महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी नागरिक एकत्र येतात, त्याच महात्मा फुले स्मारक परिसराची सध्या अत्यंत अस्वच्छ अवस्था असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

स्मारक परिसरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत अतिक्रमणे झाली असून, त्यामुळे अभिवादनासाठी येणाऱ्या नागरिकांना अडथळ्यांचा सामना करावा लागतो. महापुरुषांच्या स्मारक परिसरात अशी परिस्थिती असणे ही निश्चितच चिंतेची बाब असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

उद्या मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबीर

■ प्रतिनिधी | कारंजा ■



आ. सईताई डहाके यांचा पुढाकार

राज्यावरील कोरड्या दुष्काळाचे सावट पाहता कारंजा मानोरा विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना आरोग्यसेवेचा आधार मिळावा, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील उपचारांचा आर्थिक भार कमी व्हावा, या उद्देशाने कारंजा येथे २२ नोव्हेंबर रोजी मोफत सर्वरोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन भाजपा आमदार सईताई प्रकाशदादा डहाके यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आले असून या शिबिरात विविध आजारांची तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला, औषधोपचार, आवश्यक वैद्यकीय चाचण्या आणि गरजेनुसार शस्त्रक्रियाही मोफत करण्यात येणार आहेत.

२२ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता मंगरुळपिर रोडवरील शेतकरी निवास येथे आयोजित या शिबिराचे आयोजन स्व. प्रकाशदादा डहाके मित्र मंडळ,आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे), विदर्भ कॅन्सर रिलीफ सेंटर आणि भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या शिबिरात आ. सईताई डहाके यांच्या पुढाकारातून आयोजित रोग निदान व उपचार शिबीरात मेडिसीन, शस्त्रक्रिया, अस्थिरोग, नेत्ररोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, दंत व मुखरोग तसेच आयुर्वेद अशा विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी करण्यात येणार आहे.

सावरगाव कान्होबा वनबीटला अभयारण्याचा दर्जा द्या!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

'अरुणावती चंदन, मोर व नीलगाय संवर्धन राखीव क्षेत्र' घोषित करण्याची मागणी; पर्यावरणवादी जगदीश जाधव यांचे वन प्रशासनाला निवेदन

तालुक्यातील सावरगाव कान्होबा वनबीट हे नैसर्गिक चंदन वृक्ष, राष्ट्रीय पक्षी मोर आणि नीलगाय यांचे महत्त्वपूर्ण अधिवासस्थान म्हणून ओळखले जाते. या वनक्षेत्रातील समृद्ध जैवविविधतेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी या परिसराला अभयारण्याचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी पर्यावरणवादी जगदीश कमलाबाई धांदू जाधव यांनी वन प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी, मानोरा यांच्यामार्फत वन विभागाच्या अपर मुख्य सचिवांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

सावरगाव कान्होबा येथील शेकडो हेक्टर क्षेत्रात पसरलेल्या या वनबीटात महाराष्ट्रात दुर्मिळ मानल्या जाणाऱ्या नैसर्गिक चंदन वृक्षांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. मात्र, चंदन तस्करीमुळे या मौल्यवान वृक्षांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्याचबरोबर या परिसरात हजारोंच्या संख्येने मोरांचा अधिवास असून नीलगाय, बिबट, चितळ, रानडुक्कर, कोल्हा आणि ससे यांसारखे वन्यजीवही मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामुळे या वनक्षेत्राला संरक्षित दर्जा मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

चंदन तस्करी आणि मोरांच्या शिकारीला आळा घालण्याची गरज

सावरगाव कान्होबा वनबीटातील चंदन वृक्षांची तस्करी आणि राष्ट्रीय पक्षी मोराची शिकार रोखण्यासाठी स्वतंत्र विशेष वन सुरक्षा पथक तसेच वन्यजीव संरक्षण कक्ष स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अंतर्गत अनुसूची-१ मध्ये समावेश असलेल्या मोराच्या संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

धरणामुळे वन्यजीवांना बारमाही पाण्याची सुविधा

या वनबीटातील सावरगाव कान्होबा धरणामुळे वन्यप्राण्यांना वर्षभर पाण्याचा स्रोत उपलब्ध आहे. त्यामुळे हा परिसर वन्यजीवांच्या वास्तव्य, प्रजनन आणि संवर्धनासाठी अनुकूल ठरत आहे. मात्र, जंगलालगत शेती क्षेत्र असल्याने मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष वाढण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे. संरक्षित क्षेत्राचा दर्जा मिळाल्यास वन्यजीव व्यवस्थापनासह त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे शक्य होईल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

कोलामाकेच्या धर्तीवर निर्णय घेण्याची मागणी

गडचिरोली जिल्ह्यातील कोलामाके संवर्धन राखीव क्षेत्राला अभयारण्याचा दर्जा देण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाचा संदर्भ देत सावरगाव कान्होबा वनबीटलाही त्याच धर्तीवर संरक्षण मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी वनक्षेत्राचे तातडीने शास्त्रीय सर्वेक्षण करून 'अरुणावती चंदन, राष्ट्रीय पक्षी मोर व नीलगाय संवर्धन राखीव क्षेत्र' (Arunavati Chandan, Peacock & Nilgai Conservation Reserve) म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळाच्या २७ व्या बैठकीत मांडण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती राज्याचे वनमंत्री, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर, जिल्हाधिकारी वाशिम आणि उपवनसंरक्षक, वाशिम वनविभाग यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. सावरगाव कान्होबा हे केवळ वनक्षेत्र नसून दुर्मिळ चंदन वृक्ष, मोर आणि विविध वन्यजीवांचा नैसर्गिक ठेवा आहे. हा ठेवा भावी पिढ्यांसाठी जतन करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा जगदीश जाधव यांच्यासह परिसरातील पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे.

शिवाई इलेक्ट्रिक बसमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना प्रवास सवलत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार!

■ प्रतिनिधी | रिसोड ■



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) 'शिवाई' वातानुकूलित इलेक्ट्रिक बस सेवेमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांनाही इतर एसटी बसप्रमाणे मोफत अथवा नियमानुसार प्रवास सवलत लागू करण्यात यावी, या मागणीसाठी भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सचिव लखनसिंह ठाकुर यांनी आज मंत्रालयात महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. यावेळी पत्रकारांच्या या रास्त मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक भूमिका घेत एसटी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना (MD) यासंदर्भात तातडीने प्रस्ताव सादर करण्याबाबत सकारात्मक शेरा व निर्देश दिले.

एसटी महामंडळाच्या साध्या, निमआराम, शिवशाही तसेच इतर वातानुकूलित बस सेवांमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना शासनाच्या नियमानुसार प्रवास सवलत उपलब्ध आहे. मात्र, महामंडळाच्या ताफ्यात नव्याने दाखल झालेल्या अत्याधुनिक व पर्यावरणपूरक 'शिवाई' इलेक्ट्रिक बस सेवेमध्ये ही सवलत लागू नसल्यामुळे पत्रकारांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविणे, ग्रामीण व शहरी भागातील जनसमस्या शासनापर्यंत मांडणे तसेच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यामुळे एसटी महामंडळाच्या सर्व प्रकारच्या बस सेवांमध्ये अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना समान प्रवास सवलत मिळणे आवश्यक असल्याची भूमिका लखनसिंह ठाकुर यांनी परिवहन मंत्र्यांसमोर मांडली. तसेच 'शिवाई' इलेक्ट्रिक बसमध्ये ही सवलत लागू करण्यासाठी एसटी महामंडळाच्या सर्व आगारांना स्पष्ट परिपत्रक जारी करावे.

मर्यादा पुरुषोत्तम म्हणजे श्रीराम- हभप मुकेश महाराज

अकोला : प्रभू श्रीराम हे संपूर्ण सृष्टीचे अधिपती असून ते मर्यादा पुरुषोत्तम आहेत.'प्राण जाय पर वचन न जाय'ही कृती या महान अवतारी प्रभूची होती.याच सूत्रातून त्यांनी जगाला मर्यादेचा एक महान संदेश दिला असून त्यांचे नित्य स्मरण म्हणजे सर्व गुणांची सहज प्राप्ती असल्याचा हितोपदेश रामायणकार हभप मुकेश महाराज आखरे यांनी केला.

जाहीर नोटीस

वि. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय कमांक ३, वाशिम जि. वाशिम यांचे न्यायालयात

फौ. कि. अर्ज क्र. ५५०/२०२६ चौकशी तारीख १७/१२/२०२६

चंद्रकला त्र्यंबक पटटेबहादूर
.....वि.....

सचिव/निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी कार्यालय, ग्रा. पं. केकतउमरा ता. जि. वाशिम

अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये अर्ज कलम १३ (३) जन्म मृत्यु नोंदणी आधिनियम १९६९ प्रमाणे मृत्यूची नोंद होणे बाबत अर्ज केला आहे.

सर्वत्र जनतेस कळविण्यात येते की, वरील प्रकरणात अर्जदार यांचे सासरे नामे दानुजी कृष्णाजी पटटेबहादुर यांचा मृत्यु दि. २५/०२/१९८१ तसेच अर्जदार यांचे सासु नामे साठुबाई दानुजी पटटेबहादुर यांचा मृत्यु दि. २०/०५/१९९५ रोजी केकतउमरा ता.जि. वाशिम येथे झाल्याची नोंद ग्रामपंचायत केकतउमरा येथे घेणेसाठी कोर्टास निर्देश देणेकरीता अर्ज केला आहे.

तरी कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी दि. १७/१२/२०२६ रोजी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर प्रकरण कायद्यानुसार निकाली काढण्यात येईल.आज दिनांक ०३/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

शिक्का

सहा अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी वाशिम

ग्रामपंचायतींनी राज्यस्तरीय पुरस्कार मिळवण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध कामाला लागावे : भास्कर पेरे पाटील

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात संपन्न

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात वाशिम जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामगिरी करून राज्यस्तरावर पुरस्कार मिळवण्यासाठी सर्वांनी नियोजनबद्ध पद्धतीने कामाला लागावे, असे आवाहन पाटोदा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी केले.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२६-२७ अंतर्गत जिल्हा परिषद वाशिमच्या वतीने (दि १९) जिल्हास्तरीय कार्यशाळेत ते प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते. स्थानिक वाटाणे लॉन्स येथे आयोजित केलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना भास्कर पेरे पाटील यांनी ग्रामपंचायतींच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसहभाग, प्रभावी नियोजन, पारदर्शक कारभार आणि विकासकामांची गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी या बाबींवर भर दिला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे ग्रामपंचायतींसाठी आपल्या गावाचा विकास साधण्याची आणि कामगिरी सिद्ध करण्याची महत्त्वपूर्ण संधी आहे. या अभियानात वाशिम जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामगिरी करून राज्यस्तरावर पुरस्कार मिळवावा, या दृष्टीने सर्वांनी नियोजनबद्ध पद्धतीने कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले.



ग्रामपंचायतींनी केवळ शासकीय योजनांची अंमलबजावणी न करता गावाच्या गरजा ओळखून विकासाचे नियोजन करावे. गावातील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, लोकसहभाग आणि शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे या बाबींना प्राधान्य द्यावे. ग्रामपंचायतींच्या कामात ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढवून गावाच्या विकासाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत सुरुवातीला उप मुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे ग्रामपंचायत स्तरावर करावयाचे नियोजन, कामांचे दस्तऐवजीकरण, विकासकामांची अंमलबजावणी आणि अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींची कामगिरी उंचावण्याबाबत मार्गदर्शन करण्यात केले. पुरुषोत्तम बाबा व्यसनमुक्ती कलापथकाचे शाहिर केशव डाखोरे, कवि-गायक जनार्धन भालेराव आणि लोककवि प्रज्ञानंद भगत यांनी पाणी, स्वच्छता, व्यसनमुक्तती ई. विषयावर गीत गायनाने अभियानाबाबत जनजागृती केली. जलजीवन मिशन अंतर्गत गावांची यशोगाथा व पाणी टंचाईबाबत उपाययोजना याविषयी पुष्पलता अफुने यांनी माहिती दिली.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३५३ ■ शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

निसर्गाने झोडपले, बँकांनीही झुलविले

रब्बी पीककर्ज वाटपाचा वेग मंदावला ; २५० कोटींच्या उद्दिष्टापैकी अवघे १२१ कोटींचे वाटप, १४ हजार ८४० शेतकरी प्रतीक्षेत

वर्धा जनमाध्यम : निसर्गाने खरीप हंगामात साथ दिली नाही, जलसाठे आटण्याच्या मार्गावर आहेत आणि आता रब्बी हंगामाच्या पेरणीची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. अशा दुहेरी संकटात शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याची जबाबदारी असलेल्या बँकांची कर्जवाटपातील गती मात्र संथ असल्याचे समोर आले आहे. जिल्ह्यात रब्बी पीककर्ज वाटपाचे २५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट असताना आतापर्यंत केवळ १२१.१७ कोटी रुपयांचेच कर्ज वाटप करण्यात आले आहे. म्हणजेच उद्दिष्टाच्या निम्म्यापेक्षाही कमी रक्कम शेतकऱ्यांच्या हातात पडली आहे. त्यामुळे रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी कायम आहे.

जिल्ह्यातील २२ हजार ४८५ शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी पीककर्ज देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी १९ प्रमुख बँकांच्या १५३ शाखांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. मात्र, आतापर्यंत केवळ ७ हजार ६४५ शेतकऱ्यांनाच १२१.१७ कोटी रुपयांचे कर्ज मिळाले आहे. याचा अर्थ तब्बल १४ हजार ८४० शेतकरी अद्याप पीककर्जाच्या प्रतीक्षेत आहेत. १५३ शाखांचे जाळे आणि कोट्यवधींचे उद्दिष्ट असूनही कर्जवाटपाचा वेग वाढताना दिसत नाही.

विशेष म्हणजे, यंदाच्या खरीप हंगामात अल्पपर्जन्यमानामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अपेक्षित पाऊस न झाल्याने पिकांचे नुकसान झाले, तर जलसाठ्यांमध्येही पुरेसे पाणी उपलब्ध नाही. आगामी काळात सिंचनासाठी पाणी मिळणार की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना आहे.

त्यामुळे कमी पाण्यात येणाऱ्या पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. मात्र, अशा प्रतिकूल परिस्थितीत बियाणे, खते आणि मशागतीसाठी लागणारा पैसा उभा करणे शेतकऱ्यांसाठी कठीण ठरत आहे.एका बाजूला नैसर्गिक संकट आणि दुसऱ्या बाजूला कर्जासाठी बँकांचे उंबरठे झिजविण्याची वेळ, अशी शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे. रब्बी हंगाम हातातून जाण्यापूर्वी बँकांनी कर्जवाटपाचा वेग वाढवून उर्वरित शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

३,८८४ शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन

अल्पपर्जन्यमान आणि प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या जिल्ह्यातील ३ हजार ८८४ शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले आहे. या कर्जाची एकूण रक्कम ५२.८९ कोटी रुपये आहे. कर्ज पुनर्गठनामुळे संबंधित शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा असली, तरी नव्या हंगामासाठी लागणाऱ्या भांडवलाचा प्रश्न कायम आहे.

पाण्याचे संकट, पिकांची निवडही बदलली

रब्बी हंगामात गहू आणि हरभरा ही प्रमुख पिके घेतली जातात. मात्र, यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जलसाठ्यांवर ताण निर्माण झाला आहे. सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्याची अनिश्चितता लक्षात घेता शेतकरी कमी पाण्यात समाधानकारक उत्पादन देणाऱ्या पिकांकडे वळत आहेत. अशा स्थितीत वेळेवर पीककर्ज मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्यथा पाण्याच्या संकटासोबत आर्थिक संकटाचाही सामना शेतकऱ्यांना करावा लागू शकतो.

जिल्ह्यात रब्बी हंगामात प्रामुख्याने गहू आणि हरभरा पिकाची लागवड केली जाते. मात्र, यंदा रब्बी हंगामावर पाणीटंचाईचे सावट आहे. त्यामुळे कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना कमी पाण्यात समाधानकारक उत्पन्न देणाऱ्या पिकांची निवड करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

-अरविंद उपरिकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वर्धा.

पालिका कर्मचाऱ्यांचा संताप; सिंदीत कामबंद, वर्धेत काळ्या फिती

कथित अरेरावी आणि गैरवर्तणुकीच्या निषेधार्थ अधिकारी-कर्मचारी आक्रमक; संबंधितावर कारवाईची मागणी



सिंदी (रेल्वे) : वर्धा जनमाध्यम: नगर परिषद अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी कथित अरेरावी व गैरवर्तणूक केल्याच्या निषेधार्थ पालिका कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी, २० नोव्हेंबर रोजी आंदोलनाचे हत्यार उपसले. सिंदी (रेल्वे) नगर परिषदेत कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन करीत ठिय्या दिला, तर वर्धा नगर परिषदेत कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून नियमित कामकाज करीत निषेध नोंदविला. एका व्यक्तीच्या कथित वर्तनामुळे पालिका कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचा आरोप करीत संबंधितावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

या आंदोलनाची पार्श्वभूमी १८ नोव्हेंबर रोजी नगर परिषद सिंदी (रेल्वे) येथे घडलेल्या घटनेशी संबंधित आहे. बुधवारी दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास ?ड. पंकज झाडे हे नगर परिषदेच्या बांधकाम विभागात आले होते. माहिती अधिकाराच्या अर्जावरून त्यांचा स्थापत्य अभियंता प्रमोद भगवंत मोरले यांच्याशी वाद झाल्याचे कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी आरडाओरड करीत अरेरावी करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

संबंधित व्यक्तीकडून यापूर्वीही नगर परिषद कार्यालयात येऊन विविध विभागांतील कर्मचाऱ्यांशी वादविवाद केले जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कार्यालयीन कामकाजाच्या ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांना मोकळेपणाने काम करणे कठीण होत आहे. शिवाय शासकीय कामकाजात अडथळे निर्माण होण्यासोबतच कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण तयार होत असल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली.

या प्रकरणी स्थापत्य अभियंता प्रमोद मोरले यांनी १८ नोव्हेंबर रोजी सिंदी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीच्या आधारे अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. मात्र, केवळ तक्रारीची नोंद करून न थांबता संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली. या मागणीसाठी सिंदी नगर परिषदेत कामबंद आंदोलन करून कर्मचाऱ्यांनी ठिय्या दिला. आंदोलनादरम्यान विविध मागण्यांचे निवेदन मुख्याधिकाऱ्यांना सादर करण्यात आले. दरम्यान, सिंदीतील घटनेचे पडसाद वर्धा नगर परिषदेतही उमटले.

वर्धा येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. कामकाज ठप्प न करता निषेधाची भूमिका मांडत कर्मचाऱ्यांनी एकजूट दाखविली. नगर परिषद कार्यालये ही नागरिकांच्या समस्या सोडविण्याची ठिकाणे आहेत. त्यामुळे तेथे अधिकारी-कर्मचाऱ्यांना निर्भयपणे काम करता यावे आणि नागरिकांच्या कामात व्यत्यय येऊ नये, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

आरोप निराधार; सीसीटीव्ही तपासून चौकशी करा

दरम्यान, ॲड. पंकज बंडुजी झाडे यांनी आपल्यावरील धमकी देणे आणि शासकीय कामात अडथळा आणण्याचे आरोप निराधार असल्याचे स्पष्ट केले. नागरिकांच्या तक्रारी तसेच प्रलंबित असलेल्या ३५ माहिती अधिकार अर्जांवर कार्यवाही व्हावी, ही आपली मागणी असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित घटनेचे सीसीटीव्ही फुटेज आणि व्हिडिओ तपासून निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. आपली चूक सिद्ध झाल्यास कारवाई करावी मात्र अधिकारी-कर्मचाऱ्यांची कसूर आढळल्यास त्यांचीही जबाबदारी निश्चित करावी. या वादामुळे सामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये, अशी आपली भूमिका असल्याचे ॲड. झाडे यांनी सांगितले.

पोलिसांकडून नियमानुसार कारवाई

याबाबत सिंदी (रेल्वे) पोलिस ठाण्याचे ठाणेदार नरेंद्र निस्वादे यांनी सांगितले की, १८ नोव्हेंबर २०२६ रोजी नगर परिषद अभियंता प्रमोद मोरले यांची तक्रार प्राप्त झाली असून, त्यावर नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे.

पालिका कर्मचाऱ्यांच्या आंदोलनामुळे माहिती अधिकाराच्या अर्जावरून निर्माण झालेला वाद आता प्रशासन, कर्मचारी आणि तक्रारदार यांच्यातील चर्चेचा विषय ठरला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन वस्तुस्थिती समोर येते का, याकडे लक्ष लागले आहे.

पालिकेच्या दारातच कर्मचाऱ्याच्या जिवाशी खेळ, भाजप गटनेता पुन्हा वादात

पालिका कर्मचाऱ्याला दुचाकीने उडविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप

पुलगाव जनमाध्यम : नगरपालिकेच्या सभागृहात कचरा फेकून गोंधळ घालणे आणि सफाई कर्मचाऱ्याला शिवीगाळ केल्याच्या प्रकरणामुळे चर्चेत आलेले भाजपचे गटनेते प्रवीण पुनिया पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. फॉगिंगच्या कामावरून झालेल्या वादातून त्यांनी पालिका कर्मचारी संजय वानखेडे यांच्या अंगावर दुचाकी नेऊन जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप पोलिसांत दाखल तक्रारीतून करण्यात आला आहे. या घटनेनंतर संतप्त पालिका कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

गुरुवारी सायंकाळी ५.५० वाजताच्या सुमारास संजय वानखेडे पालिकेच्या पोर्चमध्ये उभे असताना भाजप गटनेते तथा नगरसेवक प्रवीण पुनिया दुचाकीने तेथे आले. फॉगिंगच्या कामावरून वाद घालत त्यांनी शिवीगाळ केली. त्यानंतर दुचाकी थेट अंगावर नेऊन धडक देण्याचा प्रयत्न केला तसेच धक्काबुक्की केल्याचा आरोप वानखेडे यांनी तक्रारीत केला आहे. या घटनेचे चित्रण सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्याची चर्चा आहे. कर्मचाऱ्यांनी रात्रीच पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली.

घटनेनंतर वानखेडे यांची प्रकृती खालावली. रक्तदाब वाढल्याने आणि छातीत दुखू लागल्याने त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मुख्याधिकारी विजयकुमार आश्रमा, नगराध्यक्ष कविता ब्रह्मणकर यांच्यासह नगरसेवकांनी रुग्णालयात भेट दिली.



तक्रार देऊनही पोलिसांकडून गुन्हा नोंदविण्यास दिरंगाई होत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला. राजकीय दबावामुळे कारवाई रखडली आहे का, असा सवाल उपस्थित करीत शुक्रवारी कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरू केले.

दरम्यान, पुनिया यांनीही वानखेडे यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार दिली आहे. कामकाजाबाबत चर्चा सुरू असताना वानखेडे यांनी शिवीगाळ करून अंगावर धाव घेतल्याचा त्यांचा आरोप आहे. आपल्यावर हल्ला झालेला नसून कर्मचारी खोटे आरोप करीत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सीसीटीव्ही चित्रण तपासून संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. त्यामुळे या प्रकरणात दोन्ही बाजूंच्या आरोपांची पोलिस चौकशी आणि सीसीटीव्ही चित्रण महत्त्वाचे ठरणार आहे.

दारूबंदीच्या जिल्ह्यात अवैध दारूचा साठा

राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकाची सिंदी मेघे येथे कारवाई

दोन जण ताब्यात ; १.१३ लाखांचा देशी-विदेशी मद्यसाठा जप्त

वर्धा जनमाध्यम : दारूबंदी असलेल्या वर्धा जिल्ह्यात अवैध दारूविक्रीचा व्यवसाय सुरूच असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या राज्यस्तरीय भरारी पथकाने शुक्रवारी सिंदी मेघे येथील विक्रमशिला नगर परिसरात छापा टाकत दोघांना ताब्यात घेतले.

या कारवाईत १ लाख १३ हजार रुपयांचा देशी-विदेशी दारूसाठा जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या प्रमाणात दारूसाठा आढळूनही दोन्ही संशयितांची सूचनापत्रावर सुटका करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

वर्धा जिल्ह्यात दारूबंदी असतानाही शहरासह ग्रामीण भागात अवैध दारूविक्रीचे जाळे पसरले आहे. मध्य प्रदेश आणि गोवा राज्यातील दारूसह बनावट मद्याचीही विक्री होत असल्याच्या तक्रारी आहेत. मात्र, उत्पादन शुल्क विभागाकडून मनुष्यबळाअभावी प्रभावी कारवाई होत नसल्याची चर्चा असतानाच राज्यस्तरीय भरारी पथकाने थेट वर्ध्यात धडक दिली.

गोपनीय माहितीच्या आधारे दोन वाहनांतून आलेल्या पथकाने स्थानिक उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेत विक्रमशिला नगर परिसरात छापा टाकला.

यावेळी शुभम विठ्ठल ठाकरे (रा. तुकाराम वॉर्ड, वर्धा) आणि बाबू नंदलाल समुद्रे (रा. गौरक्षण वॉर्ड, वर्धा) यांच्याकडून १.१३ लाख रुपयांचा देशी-विदेशी दारूसाठा जप्त करण्यात आला.

कारवाईनंतर दोघांनाही सूचनापत्र देऊन सोडण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे दारूबंदीच्या जिल्ह्यात अवैध मद्यसाठ्यावर कारवाई करणाऱ्या यंत्रणेच्या पुढील तपासाकडे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्याच्या स्वप्नांची राखरांगोळी, गोठ्यातील कापसाला मध्यरात्री भीषण आग

घामाच्या कमाईवर आगीचा घाला; लाखमोलाचा कापूस जळून खाक, नगराध्यक्ष किरण ठाकरे मदतीसाठी धावले

देवळी जनमाध्यम : वर्षभर शेतात राबून, रक्ताचे पाणी करून पिकविलेला कापूस विक्रीसाठी गोठ्यात साठवून ठेवला; मात्र मध्यरात्री अचानक लागलेल्या आगीने शेतकऱ्याच्या स्वप्नांची क्षणात राखरांगोळी केली. सोनेगाव (आ.) येथील निखिल वानखेडे यांच्या गोठ्यातील खोलीत साठवून ठेवलेला कापूस आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. ही घटना मध्यरात्री १२.३० वाजताच्या सुमारास घडली.

शेतातून गोळा केलेला कापूस वानखेडे यांनी गोठ्यातील एका खोलीत साठवून ठेवला होता. मध्यरात्री अचानक कापसाने पेट घेतला आणि पाहता पाहता आगीने रौद्ररूप धारण केले. आगीची माहिती मिळताच देवळीचे नगराध्यक्ष किरण ठाकरे यांनी तातडीने अग्निशमन विभागाला पाचारण केले. स्वतः घटनास्थळी धाव घेत त्यांनी अग्निशमन दलाच्या जवानांसोबत आग विझविण्याच्या कामात हातभार लावला.



अग्निशमन दलाचे रणजीत दाभेकर, आसिफ शेख आणि अक्षय क्षीरसागर यांनी घटनास्थळी पोहोचून पाण्याचा मारा सुरू केला. नगराध्यक्ष किरण ठाकरे, त्यांचे सहकारी आणि ग्रामस्थांनीही मदतकार्यात सहभाग घेतला. तब्बल दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. मात्र, तोपर्यंत साठवून ठेवलेल्या कापसाचे मोठे नुकसान झाले होते.

शेतात कष्ट करून पिकविलेला कापूस डोळ्यांदेखत जळून खाक झाल्याने वानखेडे कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. आधीच शेतीच्या वाढत्या खर्चाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्याला या आगीने मोठा फटका दिला आहे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून प्रशासनाने शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

वर्धेकरांच्या प्रश्नांसाठी शासनदरबारी पाठपुरावा करणार

आ.अभिजित वंजारी यांची नगर परिषदेला भेट; विकासकामांचा घेतला आढावा



वर्धा जनमाध्यम : शहरातील प्रलंबित विकासकामे, नागरिकांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न आणि नगर परिषदेच्या प्रशासकीय अडचणी मार्गी लावण्यासाठी शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करू, अशी ग्वाही नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. अभिजित वंजारी यांनी दिली. त्यांनी शुक्रवारी वर्धा नगर परिषदेला सदिच्छा भेट देत शहराच्या विकासासंदर्भातील विविध प्रश्नांचा आढावा घेतला.

या भेटीदरम्यान नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, मुख्याधिकारी विजय देशमुख आणि नगरसेवकांशी त्यांनी सविस्तर चर्चा केली. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण, नगर परिषदेला आवश्यक निधी, रखडलेली विकासकामे, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या मूलभूत सोयी-सुविधांचा मुद्दा यावेळी चर्चेला आला.

नगर परिषदेच्या कामकाजात येणाऱ्या प्रशासकीय अडचणी आणि शहरातील विविध विकास प्रकल्पांची माहिती लोकप्रतिनिधींनी आमदार वंजारी यांच्यासमोर मांडली. शहराच्या विकासासाठी निधी उपलब्ध होणे आवश्यक असून, प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. केवळ विकासकामांचे नियोजन करून चालणार नाही, तर त्यांची अंमलबजावणीही वेळेत होणे गरजेचे आहे. यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यात समन्वय असणे महत्त्वाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या बैठकीला नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, मुख्याधिकारी विजय देशमुख, नगरसेवक परवेझ खान, शैलेंद्र झाडे, प्रदीप जग्यासी, स्नेहा आकरे, वंदना भुते, अश्विनी खोडे, सुनील कोल्हे, अभिजित चौधरी, महमूद शेख, यांच्यासह नगर परिषदेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

रायपूर-माळेगावच्या शिवारात वाघाची दहशत

आधी माणसाचा बळी, आता दोन गायींची शिकार, वाघाच्या वावराने गावकरी धास्तावले

सेलू जनमाध्यम : आर्वी तालुक्यातील माळेगाव (ठेका) आणि सेलू तालुक्यातील रायपूर जंगली या शेजारील गावांच्या शिवारात पट्टेदार वाघाने धुमाकूळ घातला आहे. दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये वाघाने दोन गायींची शिकार केल्याने शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, याच परिसरात सप्टेंबर महिन्यात वाघाच्या हल्ल्यात एका व्यक्तीचा बळी गेला होता. त्यामुळे पुन्हा वाघाचा वावर वाढल्याने ग्रामस्थांच्या चिंतेत भर पडली आहे. रायपूर जंगली गावालगत शेत असलेले शेतकरी हमीद खाँ सिकंदर खाँ पठाण यांनी जनावरांसाठी गोठा बांधला आहे. या गोठ्यात बांधून ठेवलेल्या गायीवर गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास पट्टेदार वाघाने हल्ला केला. या हल्ल्यात गाय ठार झाली. त्यामुळे पठाण यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. दुसरीकडे माळेगाव (ठेका) येथे वामन बुरमुसे यांच्या मालकीच्या गायीवरही वाघाने हल्ला करून तिला ठार केले. सलग दोन गावांच्या शिवारात गायींची शिकार झाल्याने वाघाचा वावर या परिसरात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अपघाताची वाट पाहणारे प्रशासन, तळेगाव-वरुड मार्गावर खिळ्यांचे साम्राज्य

निकृष्ट रिफ्लेक्टर फुटले, लोखंडी खिळे मात्र कायम, आंदोलनाचा इशारा

आष्टी शहीद जनमाध्यम : रस्ते बांधले जातात वाहनांचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी; मात्र तळेगाव शा. ते आष्टीमार्गे वरुडकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्यावर वाहनचालकांच्या सुरक्षेऐवजी अपघाताचा सापळाच उभारण्यात आल्याचे चित्र आहे.

रात्री रस्त्याची दिशा दाखविण्यासाठी बसविण्यात आलेले रिफ्लेक्टर निकृष्ट दर्जाचे असल्याने फुटले, पण ते रोवण्यासाठी वापरण्यात आलेले लोखंडी खिळे आजही रस्त्यावर उभे आहेत. संबंधित यंत्रणा आणखी किती अपघातांची वाट पाहणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.



सिमेंट रस्त्याच्या बांधकामाला पाच वर्षे उलटली. मात्र, रस्त्यावर धोकादायक स्थितीत असलेले खिळे काढण्याची साधी तसदीही संबंधित विभागाने घेतलेली नाही. रात्रीच्या अंधारात हे खिळे वाहनचालकांच्या लक्षात येत नसल्याने दुचाकीस्वारांसाठी ते जीवघेणे ठरू शकतात. साहूर गावाजवळील रस्त्यालाही जागोजागी तडे गेले असून भेगांचे जाळे निर्माण झाले आहे. खिळे आणि खराब रस्त्यामुळे किरकोळ अपघात घडत असून मोठ्या दुर्घटनेची टांगती तलवार कायम आहे.

जाहीर सूचना

आम जनतेस सूचित करण्यात येते की, मी श्रीमती रेखा अरुण तांदले रा. खंडवा, जिल्हा खंडवा,(मध्य प्रदेश) मी, शेत सर्वे नंबर ६४/१ मौजा नांदोरा त. देवळी, जिल्हा वर्धा येथील खालील वर्णनाची शेती श्री पवन रमेश कठाने रा. ठाणे, जि. ठाणे (महाराष्ट्र)यांच्याकडून शेती विकत घेण्याचा सौदा केला आहे. शेत जमिनीचे वर्णन खालील प्रमाणे: शेत सर्वे नंबर ६४/१, आराजी १.५७, वर्ग-१ प्रकार- कोरडवाहू. वरील वर्णनाची मालमत्ता असून तरी या मालमत्तेवर कुणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, संबंध अधिकार असल्यास किंवा या मालमत्तेबाबत कोणतेही प्रकारचा व्यवहार झालेला असल्यास किंवा ही मालमत्ता कुण्या दुसऱ्यास लिहून दिलेली असल्यास किंवा कूण्या व्यक्ती बँक व संस्थेचा कसल्याही प्रकारचा गहाण बोजा, करार असल्यास ही सूचना प्रकाशनाचे आठ (८) दिवसाच्या आत लेखी कागदपत्र व पुराव्यासह सुद्धा येऊन भेटावे. नंतर या मालमत्ते संबंधात कोणाचेही कसलेही प्रकारचा उजर व आक्षेप स्वीकार केला जाणार नाही.

दिनांक २०/११/२०२६

रेखा अरुण तांदले मो.९४०७३११४२१

■ शनिवार २१ नोव्हेंबर २०२६

paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

नागपूरचे नाव 'दीक्षाभूमी' करा

प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी तयार करावा : संजय राऊत-उद्धव ठाकरेंची मागणी

नागपूर/प्रतिनिधी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील सामाजिक क्रांतीची सुरुवात नागपुरातून झाली, त्यामुळे नागपूरचे नाव 'दीक्षाभूमी' करणे ही त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत म्हणाले. यावर आता नागपूरचे पालकमंत्री व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'संजय राऊत काय सांगतात, यापेक्षा दीक्षाभूमीचे महत्त्व संपूर्ण जगाला माहीत आहे', असे सुनावले. त्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे.

काय म्हणाले चंद्रशेखर बावनकुळे?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्य सरकारने नागपूरच्या नामांतराचा प्रस्ताव तयार केल्यास त्या निर्णयाला त्यांचा पक्ष पाठिंबा देईल, उद्धव ठाकरे यांनीही यासंदर्भात सूचना केल्याचा दावा राऊत यांनी केला. यावर शुक्रवारी नागपुरात प्रसारमाध्यमांसोबत बोलताना महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, नागपूरची दीक्षाभूमी जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहे. नागपुरात येणारा प्रत्येक व्यक्ती दीक्षाभूमीला भेट देतो. दीक्षाभूमीच्या नावानेच नागपूरची जगभरात ओळख निर्माण झाली आहे. दीक्षाभूमीचे महत्त्व संपूर्ण जगाला माहीत आहे, असेही बावनकुळे म्हणाले.



आंब्याच्या जिओ टॅगिंगमध्ये राज्य सरकारचा थेट संबंध नाही

कोकणातील आंब्याच्या जिओ टॅगिंगच्या मुद्द्यावर चेन्नई न्यायालयाने आदेश दिले असून, न्यायालयाच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्य सरकारने याबाबत स्वतंत्र शासन निर्णय काढलेला नाही. त्यामुळे या प्रकरणाशी राज्य सरकारचा थेट संबंध नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

इंदू मिल स्मारकाचे काम सरकार पूर्ण करणार

इंदू मिल स्मारक प्रकल्पाची किंमत वाढली असली तरी राज्य सरकारने आवश्यक निधी उपलब्ध करून दिला आहे. इंदू मिल येथील स्मारकाचा संपूर्ण प्रकल्प आमचे सरकार पूर्ण करणार आहे. काही काळ आवश्यक साहित्य उपलब्ध न झाल्यामुळे कामाला विलंब झाला. मात्र, उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे बावनकुळे म्हणाले.सातारा बँक प्रकरण हा स्थानिक राजकारणाशी संबंधित विषय आहे. एखाद्या जिल्ह्यातील स्थानिक विषयांवर मतभेद असू शकतात. मात्र, त्याचा परिणाम महायुतीवर होणार नाही. त्यामुळे या प्रकरणाचा महायुतीशी संबंध जोडण्याची आवश्यकता नाही, असे ते म्हणाले.

राज्यातील भटक्या समाजाच्या वस्त्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी राज्य सरकारच्या वतीने महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत येत्या ७ आणि ८ जानेवारी रोजी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असून, या माध्यमातून नागरिकांना जन्मदाखले, घरांचे दस्तऐवज, विविध शासकीय दाखले तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

फासेपारधी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न

फासेपारधी समाजाच्या विकासासंदर्भात बोलताना बावनकुळे म्हणाले की, या समाजासाठी गावठाणे गठित करणे, तांड्यांना ग्रामपंचायतीचे अधिकार देणे, विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि रोजगार निर्मितीसाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, या विषयांवर बैठक घेण्यात आली आहे. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सकारात्मक असून, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

वाहनधारकांनो सावधान! HSRP नंबरप्लेट नसल्यास खिसा होणार हलका, आजपासून राज्यभर मोहीम तीव्र

अकोला /प्रतिनिधी- वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (HSRP) बसवणे बंधनकारक असतानाही अनेक वाहनांवर अद्याप ही पाटी बसविण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर परिवहन विभागाने आता या वाहनांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारण्याचा निर्णय घेतला. राज्यातील सर्व प्रादेशिक व उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या कार्यक्षेत्रात २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



राज्यभर पडताळणी व तपासणी मोहीम; तर दंडात्मक कारवाई

राज्यभरातील परिवहन कार्यालयांना विशेष तपासणी करून 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत देण्यात आले. या मोहिमेदरम्यान प्रमुख रस्ते, महामार्ग, तपासणी नाके तसेच गर्दीच्या ठिकाणी वाहनांची कसून तपासणी केली जाणार आहे. दुचाकी, तीनचाकी, चारचाकी यासह सर्व प्रकारच्या वाहनांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून, संबंधित वाहनांना नियमानुसार 'एचएसआरपी' बसविण्यात आली आहे किंवा नाही, याची पडताळणी केली जाईल. ही पाटी बसवणे बंधनकारक असूनही त्याचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांवर कायदे व नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

वायुवेग पथके रस्त्यावर उतरणार- विशेष तपासणी मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी परिवहन विभागाकडून आवश्यकतेनुसार वायुवेग पथकांची नियुक्ती केली जाणार आहे. तसेच स्थानिक वाहतूक पोलिसांची मदत घेऊन संयुक्त तपासणी मोहीमही राबविण्यात येणार आहे. परिवहन विभाग आणि वाहतूक पोलिसांमध्ये समन्वय साधून वाहनांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दररोजच्या कारवाईचा अहवाल सादर करावा लागणार

या मोहिमेच्या अंमलबजावणीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे विशेष लक्ष राहणार आहे. तपासणी केलेल्या वाहनांची एकूण संख्या, पाटी नसलेली आढळलेली वाहने, त्यांच्यावर केलेली दंडात्मक कारवाई आणि वसूल झालेल्या दंडाची रक्कम यांचा दैनंदिन अहवाल नोंदवावा लागणार आहे. २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीतील प्रत्येक दिवसाची माहिती त्याच दिवशी अद्ययावत करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

नियमानुसार पाटी बसवून घ्या, अन्यथा दंड- येत्या दहा दिवसांत राज्यभरात 'एचएसआरपी' नसलेल्या वाहनांची तपासणी तीव्र होणार असून, वाहनधारकांनी आपल्या वाहनाला नियमानुसार उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवून घ्यावी, अन्यथा संबंधितांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, अशी माहिती अकोल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार यांनी दिली.

समृद्धीच्या पुलाखाली गांजा तस्करी, महिलेसह ७ आरोपी ताब्यात

बुलढाणा /प्रतिनिधी- मेहकर पोलिसांनी गांजाची अवैध विक्री करणाऱ्या टोळीवर धडक कारवाई करत सात आरोपींना ताब्यात घेतले आहे. मेहकर-जानेफळ रोडवरील समृद्धी महामार्गाच्या पुलाखालील गोटाळा शिवारात ही कारवाई करण्यात आली.पोलिसांनी आरोपींकडून १९ किलो ६६० ग्रॅम गांजा, एक इर्टिका कार, मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १९ लाख १३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



गुप्त माहितीवरून पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी इर्टिका कारमधून काही इसम गांजाची विक्री करण्याच्या उद्देशाने मेहकर, जानेफळ व डोणगाव परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मेहकर पोलिसांनी सापळा रचला.मेहकर-जानेफळ रोडवरील समृद्धी महामार्गाच्या पुलाखाली गोटाळा गावाजवळ पोलिसांनी इर्टिका कार अडवून तपासणी केली असता कारच्या मागील डिक्कीमध्ये दोन सुटकेसमध्ये १९ किलो ६६० ग्रॅम गांजा आढळून आला. पोलिसांनी गांजा, इर्टिका कार (क्रमांक एम एच २८ सीसी ९८८४), मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १९ लाख १३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पुण्यातील महिलेचाही समावेश

या कारवाईत आरोपी किरण विष्णू चांदणे (३०, रा. मुंदेफळ, ता. मेहकर, जि. बुलढाणा) योगेश वसंत पानभरे (२६, रा. पेंडगाव, ता. मंगरूळपीर, जि. वाशिम) विवेक रमेश दाभाडे (२०, रा. इंदिरानगर, जानेफळ, ता. मेहकर) अभिषेक नारायण शेख (२१, रा. इंदिरानगर, जानेफळ, ता. मेहकर, जिल्हा बुलढाणा) संदीप आत्माराम दातार (३६, रा. अहिल्यानगर, जानेफळ, ता. मेहकर,) सचिन भगवान फुके (२०, रा. अहिल्यानगर, जानेफळ, ता. मेहकर) यासह कोथरूड, पुणे येथील एका महिलेस देखील ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी महिला पोलीस उपनिरीक्षक कांचन जारवाल यांनी तक्रार दिली. फिर्यादीवरून मेहकर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा १९८५ मधील कलम ८(क), २०(ब) (क), २२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनामध्ये करण्यात आली. पोलीस निरीक्षक व्यंकटेश आलेवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक शरद माळी व पोलीस पथकाने सहभाग घेतला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.मेहकर पोलीस गांजा तस्करांचा व्यवहार कोणासोबत होणार होता, हा गांजा कुठे कुठे पोहोचणार होता याचा शोध घेत आहे. मेहकर पोलिसांनी याप्रकरणी सखोल चौकशी केली तर निश्चितच मेहकर तालुक्यातील गांजा विक्री करणारे मोठे 'रॅकेट' समोर येण्याची दाट शक्यता आहे.

सैनिकी शाळांतील प्रवेश गुणवत्तेच्या आधारेच-मुख्यमंत्री

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन; कमी कामगिरी करणाऱ्या शाळांवर कारवाई

मुंबई/प्रतिनिधी- राज्यातील सैनिकी शाळांमध्ये गुणवत्ताधारित प्रवेश प्रक्रिया अधिक सक्षम करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन देण्यात येईल. शाळांच्या कामगिरीनुसार जिथे कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे तिथे प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. सैनिकी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्था निर्माण करण्यावर या संदर्भातील धोरणात भर देण्यात यावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सैनिकी शाळा मूल्यांकन व सक्षमीकरण आराखडा तसेच सैनिकी शाळा सुधारीकरण धोरणांतर्गत गठित समितीच्या अहवालासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती, तेव्हा ते बोलत होते. बैठकीस शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक मंगेश जोशी, यशदा, पुणे येथील उपमहासंचालक हेमंत वसेकर, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नागपूरचे शैलेश जोगळेकर, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथील डॉ. अजय फुंदे तसेच समितीचे सदस्य व संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, समितीने सादर केलेल्या अहवालातील बहुतांश शिफारशी योग्य असून, संबंधित विभागांनी त्यावर आवश्यक कार्यवाही करावी. यासाठी अन्य विभागांशी समन्वय साधून निर्णय घ्यावेत. सैनिकी शाळांच्या कामकाजाचा वर्षातून एकदा आढावा घेऊन शिफारशींच्या अंमलबजावणीची प्रगती तपासावी. 'अ' वर्गातील सैनिकी शाळांना त्यांच्या कामगिरीबाबत प्रोत्साहन देवून 'ब' श्रेणीतील शाळांना 'अ' वर्गात येण्यासाठी प्रोत्साहन देणे,



'क' आणि 'ड' श्रेणीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.आवश्यक ती कठोर कार्यवाही करावी असेही त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील सैनिकी शाळांची शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्ता उंचावण्याबरोबरच पायाभूत सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सैनिकी प्रशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी हा आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी तसेच संरक्षण दलांमध्ये अधिकारी म्हणून अधिकाधिक विद्यार्थी दाखल व्हावेत, या उद्देशाने सैनिकी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्था निर्माण करण्यावर या धोरणात भर देण्यात यावा असे निर्देशही त्यांनी दिले. शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, राज्य सैनिकी शाळा मूल्यांकन व सक्षमीकरण आराखडा तसेच सैनिकी शाळा सुधारीकरण समितीने राज्यातील प्रत्येक शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन शैक्षणिक, प्रशासकीय आणि सैनिकी प्रशिक्षणाच्या अनुषंगाने सखोल पाहणी केली आहे. त्यानंतर अभ्यासपूर्ण अहवाल सादर करण्यात आला आहे. शासनाने या संस्थांना सुमारे ३० एकर जमीन आणि विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांचा प्रभावी वापर करून शाळांच्या कामकाजातील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे.आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अधिकाधिक विद्यार्थ्यांना शुल्कसहाय्य देण्याबाबत विचार करावा. सैनिकी शिक्षणाची आवड आणि क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी राज्य अथवा जिल्हास्तरावरील प्रवेश परीक्षा अधिक काटेकोर व गुणवत्ताधारित करावी. तसेच राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी आणि अन्य संरक्षण अकादमींमधील प्रवेशासाठी इंग्रजी माध्यमाचे महत्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया मजबूत करण्यासाठी इंग्रजी माध्यमातील शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत

पहिल्या टप्प्यात १ लाख ६९ हजार ८२० पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध

मुंबई/प्रतिनिधी- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेसाठी पात्र ठरलेल्या १ लाख ६९ हजार ८२० शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, या योजनेत कर्जमुक्ती, एकवेळ समझोता (ओटीएस) आणि प्रोत्साहन असे तीन घटक समाविष्ट आहेत. पहिल्या टप्प्यात कर्जमुक्ती घटकाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. याअंतर्गत २५.८१ लाख शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. यापैकी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या २०.७२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये १८ हजार कोटी रुपयांची कर्जमुक्ती देण्यात आली आहे.योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात एकवेळ समझोता (ओटीएस) अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या दोन लाख रुपयांवरील कर्जाच्या हिश्श्याची रक्कम संबंधित बँकेत जमा केल्यानंतर शासनाकडून दोन लाख रुपयांपर्यंतचा कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. बँकांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे संगणकीय संस्करण करून १ लाख ६९ हजार ८२० पात्र शेतकऱ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.या यादीमध्ये शेतकऱ्याचे नाव, गाव, विशिष्ट क्रमांक, आधार क्रमांक, बँकेचे नाव, बँक शाखा, विकास संस्थेचे नाव, कर्जखाते क्रमांक, ३१ मार्च २०२६ अखेरची थकबाकी, ओटीएस नुसार थकबाकीची रक्कम, शेतकऱ्याने भरावयाची रक्कम आणि शासनाकडून देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम यांचा समावेश आहे. ही यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.पात्र शेतकऱ्यांनी प्रसिद्ध झालेल्या यादीतील तपशील तपासून ओटीएस नुसार त्यांच्या हिश्श्याची दोन लाख रुपयांवरील रक्कम संबंधित बँकेत जमा करणे आवश्यक आहे. एकाच बँकेत कर्जखाते असलेल्या शेतकऱ्यांनी यादीमध्ये नमूद केलेली रक्कम संबंधित कर्जखात्यात जमा करावी. एकापेक्षा अधिक कर्जखाती असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या कोणत्याही एका कर्जखात्यात ही रक्कम जमा करण्याची सुविधा आहे. मात्र, संबंधित खात्यात ओटीएस नुसार बँकेस देय असलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम जमा करू नये.शेतकऱ्यांनी भरलेल्या रकमेची माहिती संबंधित बँकेकडून पोर्टलवर अद्ययावत करण्यात येणार आहे. ही माहिती दर शुक्रवारी पोर्टलवर अपलोड केली जाईल. शेतकऱ्यांनी भरावयाची रक्कम जमा केल्याची खातरजमा झाल्यानंतर थकबाकी अद्ययावत केल्याच्या तीन दिवसांनंतर आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.या योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांची अग्रीस्टॅक नोंदणी असणे आवश्यक आहे. अग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या तसेच योजनेच्या निकषांनुसार संबंधित बँकेत आपल्या हिश्श्याची रक्कम जमा केलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ देण्यात येणार आहे. शासनाकडून ही रक्कम जमा झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होणार आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या दोन लाख रुपयांवरील कर्जाच्या हिश्श्याची रक्कम भरण्याची अंतिम मुदत ३१ मार्च २०२७ पर्यंत आहे.

विभागनिहाय पात्र शेतकऱ्यांची संख्या- प्रसिद्ध करण्यात आलेल्या पहिल्या यादीत नाशिक विभागात सर्वाधिक ४८,३७९ शेतकरी पात्र ठरले आहेत. त्यानंतर पुणे विभागातील ४०,९४६, छत्रपती संभाजीनगर विभागातील ३९,५९७, अमरावती विभागातील २५,९१७, नागपूर विभागातील १२,००२ आणि कोकण विभागातील २,९७९ शेतकऱ्यांचा समावेश आहे. ही ओटीएस अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेली पहिली यादी असून, बँकांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीचे संगणकीय संस्करण सुरू राहणार आहे. त्यामुळे पुढील काळातही पात्र शेतकऱ्यांच्या याद्या टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.योजनेअंतर्गत मृत, वयोवृद्ध तसेच बोटांचे ठसे नोंदविण्यात अडचण येणाऱ्या लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यासंदर्भात १९ ऑगस्ट २०२६ रोजी मानक कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी राज्यात वॉटर कप स्पर्धा राबविण्याचे नियोजन

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर प्रभावीपणे मात करण्यासाठी तसेच जलसंधारणाच्या कामांना लोकसहभागाची जोड देऊन ग्रामीण भागात पाणीटंचाईवर शाश्वत उपाययोजना करण्याच्या उद्देशाने पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून राज्यात 'वॉटर कप' स्पर्धा सुरू करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. या स्पर्धेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नुकतीच राज्यस्तरीय कार्यकारी समितीची बैठक मंत्रालयात पार झाली. या बैठकीत राज्यात वॉटर कप स्पर्धा सुरू करण्याबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले. स्पर्धेचे स्वरूप, अंमलबजावणीची कार्यपद्धती, विविध विभागांचा सहभाग तसेच आवश्यक प्रशिक्षण याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गावांना आणि संबंधित घटकांना आवश्यक प्रशिक्षण देणे, त्यासाठी प्रशिक्षणाचे नियोजन करणे तसेच विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधणे या बाबींवर बैठकीत विशेष भर देण्यात आला.जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकसहभाग वाढविणे, गावपातळीवर पाण्याचे नियोजन आणि जलसाठा निर्माण करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांना प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. पाणी फाउंडेशनच्या अनुभवाचा उपयोग करून राज्यात व्यापक स्तरावर जलसंधारणाची लोकचळवळ उभी करण्याच्या दृष्टीने या स्पर्धेचे नियोजन करण्यात येत आहे. या बैठकीस जलसंपदा विभाग प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, जलसंपदा विभागाचे सचिव प्रकाश मिसाळ, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे पाणी फाउंडेशनचे आमिर खान, किरण राव, सत्यजित भटकळ, एटीई चंद्रा फाउंडेशनचे अमित चंद्रा सहभागी झाले होते.

ओबीसींप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही मिळणार शुल्क सवलत

मुंबई : 'शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, ही शासनाची भूमिका आहे. मराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यांनाही ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक शुल्कात सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे कृषी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे,' असे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय म्हणजेच ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक व विविध शुल्क सवलती देण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. याबाबत कृषी विभागाने २० नोव्हेंबर २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयानुसार पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कासह प्रवेश शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, नोंदणी शुल्क, विद्यार्थी सहाय्य व कल्याण निधी, विमा निधी, महाविद्यालयीन मासिक शुल्क, वैद्यकीय मदत निधी आणि विद्यार्थी ओळखपत्र शुल्क अशा विविध शुल्कांमध्ये सवलत मिळणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. लाभ देताना शासनाने निश्चित केलेल्या पात्रतेच्या निकषांची काटेकोर तपासणी करण्याचे निर्देश चारही कृषी विद्यापीठांना देण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना आवश्यक समन्वय करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कार्तिकी एकादशी यात्रेसाठी एक हजार जादा बसेस सज्ज!

मुंबई/प्रतिनिधी- येत्या २१ नोव्हेंबर रोजी पंढरपूर येथे संपन्न होणाऱ्या कार्तिकी एकादशी यात्रेनिमित्त राज्याच्या कानाकोपऱ्यातून विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सोयीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार एसटी महामंडळाने सुमारे एक हजार जादा बसेस सज्ज ठेवल्या आहेत. या माध्यमातून भाविकांना सुरक्षित, आरामदायी आणि विश्वासार्ह प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. आषाढी एकादशीप्रमाणेच कार्तिकी एकादशीलाही वारकरी संप्रदायात विशेष महत्व आहे. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही संबोधले जाते. त्यामुळे या पवित्र पर्वानिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक पंढरपूरमध्ये दाखल होतात. चंद्रभागेच्या पवित्र तीरावर भक्ती, श्रद्धा आणि वारकरी परंपरेचा अनुपम सोहळा अनुभवायला मिळतो. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन एसटी महामंडळाने पंढरपूर येथील चंद्रभागा बसस्थानकातून राज्यातील विविध भागांसाठी जादा बसफेऱ्यांचे नियोजन केले आहे. दर्शनानंतर भाविकांना आपल्या गावी परतण्यासाठीही पुरेशा बसगाड्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. गर्दीचे नियोजन, बसफेऱ्यांचे व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महामंडळाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे.

पाणीटंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे तातडीने पाणीपुरवठा करा

पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील

मुंबई/प्रतिनिधी- राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती शक्यता लक्षात घेता, राज्यातील ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, त्या गावांमध्ये टँकरद्वारे तातडीने पाणीपुरवठा करावा. तसेच, पाणीटंचाईसंदर्भात माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांचीही दखल घेऊन संबंधित गावांमध्ये प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी आणि आवश्यकतेनुसार तात्काळ पाणीपुरवठा सुरू करावा, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी यंत्रणांना दिले.



राज्यातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागाने जिल्हा प्रशासनाला पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना याआधीच दिल्या आहेत. पावसाचे प्रमाण, भूजल पातळीतील घट, विहिरींची स्थिती आणि उपलब्ध पाणीसाठा यांचा विचार करून टंचाईग्रस्त गावांची निश्चिती करावी, असेही त्यांनी सांगितले.पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावांमध्ये नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करावी. ज्या गावांमध्ये पाण्याचे स्रोत आटले आहेत किंवा उपलब्ध स्रोतांमधून पुरेसा पाणीपुरवठा होत नाही, अशा गावांमध्ये टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी, असेही मंत्री पाटील म्हणाले.

पाणीटंचाईबाबत माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांची संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घ्यावी. पाणीटंचाईच्या बातम्या प्रसिद्ध झालेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीची खातरजमा करावी. पिण्याच्या पाण्याची समस्या असल्याचे निदर्शनास आल्यास प्रशासकीय प्रक्रियेत विलंब न करता टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, असेही मंत्री गुलाबराव पाटील यांनी निर्देशित केले. पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि पाणीपुरवठा विभागाने समन्वयाने काम करावे. नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे. पाणीपुरवठ्याच्या उपाययोजनांवर नियमित देखरेख ठेवून कोणत्याही गावात पिण्याच्या पाण्याची समस्या प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

'हॉस्पिटल ऑन व्हील्स'

जागतिक स्तरावर आरोग्य व्यवस्थापनाच्या संकल्पनेत मूलभूत बदल होत आहेत. वैद्यकीय सुविधा जिथे उपलब्ध आहेत, तिथे रुग्णाने पोहोचावे, या पारंपरिक दृष्टिकोनाऐवजी जिथे रुग्ण आहे, तिथे वैद्यकीय सुविधा पोहोचवण्याला प्राधान्य दिले जात आहे. दूरस्थ वैद्यकीय सल्ला, फिरती निदान केंद्रे, अत्याधुनिक रुग्णवाहिका, फिरती रुग्णालये या बदलत्या दृष्टिकोनातून उदयास आलेल्या संकल्पना आहेत. महाराष्ट्र सरकारने 'हॉस्पिटल ऑन व्हील्स'च्या माध्यमातून या दिशेने टाकलेले पाऊल म्हणूनच महत्त्वपूर्ण आहे. रायगड जिल्ह्यात अलिबाग येथे वाहतूक कोंडीत अडकल्याने २० महिन्यांच्या चिमुकल्याचा रुग्णवाहिकेत मृत्यू झाला. एखाद्या रुग्णाला वेळेत रुग्णालयात पोहोचवता आले नाही, तर वैद्यकीय क्षेत्रात कितीही प्रगती झाली असली, तरी तिचा उपयोग काय, असा प्रश्न अशा घटनांमुळे उपस्थित होतो. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अद्ययावत रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, २ डिसेंबर रोजी मुंबईतून या सेवेचा शुभारंभ होईल. पहिल्या टप्प्यात ३०० सुसज्ज रुग्णवाहिका सेवेत दाखल होतील. रुग्णाला रुग्णवाहिकेत घेतल्यापासूनच त्याच्यावर अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या सहाय्याने उपचार करता येतील. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण सुधारणा म्हणून याची नोंद होईल. महाराष्ट्रात २०१३-१४ मध्ये १०८ क्रमांकाची आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुरू झाली. दशक भरात या सेवेने असंख्य रुग्णांना आधार दिला. मात्र, लोकसंख्या, शहरीकरण, वाहन संख्या, वाहतुकीचा ताण आणि आरोग्यविषयक आव्हाने यांत मोठे बदल झाले. त्यामुळे रुग्णवाहिका सेवेचे आधुनिकीकरण अपरिहार्य होते. अत्यवस्थ रुग्णाबाबतीत रुग्णालयापर्यंतचा प्रवासही उपचारप्रक्रियेचा भाग असला पाहिजे. नव्या रुग्णवाहिकांमध्ये आयसीयूसारखी उपचार सुविधा निर्माण करण्यामागील राज्य सरकारचा दृष्टिकोन म्हणूनच महत्त्वाचा आहे. हृदयविकाराचा झटका, मेंदूचा पक्षाघात, गंभीर अपघात, प्रसूतीदरम्यानची गुंतागुंत अथवा श्वसनविकारात उपचार सुरू होण्यास लागणारा प्रत्येक मिनिटाचा विलंब महागात पडू शकतो. अपघातानंतरच्या पहिल्या तासाला वैद्यकीय परिभाषेत 'गोल्डन अवर' म्हणतात. या कालावधीत योग्य उपचार मिळाले तर रुग्णाचे प्राण वाचू शकतात. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसारख्या महानगरांमध्ये वाहतूक कोंडीचे आव्हान मोठे आहे. दुसरीकडे मेळघाट, नंदूरबार, गडचिरोली आणि दुर्गम आदिवासी भागांत रुग्णालयांपर्यंत पोहोचण्यासाठी मोठे अंतर पार करावे लागते. या दोन्ही समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी फिरत्या अतिदक्षता उपचार सुविधांचा उपयोग होऊ शकतो. तामिळनाडूमध्ये ?'हॉस्पिटल ऑन व्हील्स?' योजनेअंतर्गत ४२६ फिरती वैद्यकीय पथके कार्यरत आहेत. त्यापैकी ३९६ पथके ग्रामीण भागांत, २० आदिवासी भागांत आणि १० शहरी भागांत सेवा देतात. १४ जिल्ह्यांमध्ये आदिवासी बांधवांसाठी स्वतंत्र फिरती वैद्यकीय पथके आहेत. त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ आणि वाहनचालक यांचा समावेश आहे. माता व बाल आरोग्य, लसीकरण, विविध आजारांचे निदान, प्राथमिक प्रयोगशाळा चाचण्या आणि मोफत औषधे या सुविधा दिल्या जातात. चेन्नईतील झोपडपट्ट्या आणि पुनर्वसन वसाहतींमधील नागरिकांसाठीही अशी सेवा आहे. जम्मू-काश्मीरमधील रामबन जिल्ह्यातही 'हॉस्पिटल ऑन व्हील्स' उपक्रमात फिरती आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. भारतातील 'लाईफलाईन एक्स्प्रेस' या रेल्वे रुग्णालयाचा प्रयोगही उल्लेखनीय आहे. महाराष्ट्रात पुणे, सातारा आणि सोलापूर परिसरात कर्करोगाच्या प्राथमिक निदानासाठी फिरत्या वैद्यकीय वाहनांचा वापर केला जात आहे. देशात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा मोठ्या शहरांमध्ये केंद्रित झाल्या आहेत. ग्रामीण भागांतील रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यासाठी आजही तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. प्रत्येक गावात सुसज्ज रुग्णालय उभारणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही. अशा परिस्थितीत फिरत्या वैद्यकीय सुविधांचा विस्तार करणे हा उपलब्ध संसाधनांचा अधिक परिणामकारक वापर ठरू शकतो. भविष्यात महाराष्ट्राने फिरत्या निदान प्रयोगशाळा, कर्करोग तपासणी, माता-बाल आरोग्य आणि दूरस्थ वैद्यकीय सल्ला यांसाठी स्वतंत्र वाहनांची संख्या वाढवण्याचाही विचार करायला हवा. नव्या रुग्णवाहिका सेवेच्या यशासाठी वाहनांमधील अत्याधुनिक उपकरणांइतकेच प्रशिक्षित मनुष्यबळ महत्त्वाचे आहे. रुग्णवाहिकांचे स्थाननिश्चिती तंत्रज्ञानाद्वारे नियंत्रण, जवळच्या रुग्णालयाशी थेट संपर्क, वाहतूक पोलिसांशी समन्वय आणि उपकरणांची नियमित देखभाल यांवर विशेष भर द्यावा लागेल. रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचण्यासाठी लागणारा सरासरी वेळ, त्यामध्ये उपचार मिळालेल्या रुग्णांची संख्या आणि सेवेची जिल्हानिहाय उपलब्धता यांची आकडेवारी नियमितपणे प्रसिद्ध केल्यास या योजनेचे मूल्यमापन करणे शक्य होईल. अमरावती येथील रुग्णालयांमध्ये घडलेल्या आग दुर्घटनेप्रकरणी संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकले आहे. शासकीय आणि खासगी रुग्णालयांमधील कृत्रिम श्वसनयंत्रांच्या वापरासंबंधी स्वतंत्र कार्यप्रणालीही जाहीर केली आहे. वैद्यकीय उपकरणांची गुणवत्ता, त्यांची नियमित देखभाल आणि सुरक्षिततेच्या निकषांचे पालन याबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये. मानसिक आरोग्य हा आजही दुर्लक्षित विषय आहे. करोना काळात जागतिक आरोग्य संघटनेनेही मानसिक आजारांची त्सुनामी येईल अशी शक्यता व्यक्त केली होती. कोव्हिडच्या धक्क्यातून अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. तसाच मानसिक आघात आताच्या दुष्काळाने राज्यातील शेतकऱ्यांवर केला. त्याची दखल घेत दुष्काळग्रस्त भागांतील शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने पुढाकार घेण्याचे ठरवले आहे. शेतकरी आत्महत्यांच्या प्रश्नाला आर्थिक आणि सामाजिक परिमाणांबरोबरच मानसिक आरोग्याचेही परिमाण आहे. पीकहानी, कर्जबाजारीपणा आणि उत्पन्नाची अनिश्चितता यांमुळे निर्माण होणाऱ्या तणावातून मार्ग काढण्यासाठी समुपदेशनाची आवश्यकता आहे. मानसिक आरोग्य सेवा हा शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांवरील उपायांना पूरक उपक्रम आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातून नैराश्यग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याची सक्षम व्यवस्था निर्माण केली, तर या उपक्रमाचे सार्थक होईल. सार्वजनिक आरोग्यावर करण्यात येणारा खर्च ही मानवी संसाधनांच्या विकासासाठी केलेली गुंतवणूक असते. महाराष्ट्र सरकारने त्या दिशेने टाकलेली पावले आरोग्यव्यवस्थेच्या सक्षमीकरणाची आणि लोकाभिमुखतेची आहेत.

वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाच्या व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह!

'पाण्याचा प्रश्न केवळ नदी जोडून सुटत नाही; पाणी जिथे पडते, तिथेच ते अडवून, जिरवून आणि योग्य पद्धतीने वापरून सुटतो. विदर्भाला खर्चिक प्रकल्पांची नव्हे, तर शाश्वत जलव्यवस्थापनाची गरज आहे!'



महाराष्ट्रातील विदर्भ हा नैसर्गिक जलसंपत्तीने समृद्ध असलेला प्रदेश आहे. वैनगंगा, वर्धा, पैनगंगा यांसारख्या नद्या, शेकडो लहान-मोठे तलाव, जलाशय आणि पारंपरिक पाणवठे या प्रदेशाची नैसर्गिक संपत्ती आहेत. मात्र, एवढी जलसंपत्ती असूनही विदर्भातील अनेक भागांना आजही सिंचनासाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. विशेषतः पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांसमोर अनियमित पाऊस, भूजलपातळीतील घट, अपुरी सिंचन व्यवस्था आणि शेतीच्या वाढत्या खर्चाचे गंभीर संकट आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्याची गरज निश्चितच आहे. मात्र, त्यासाठी तब्बल ९५ हजार कोटी रुपयांचा वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हाच एकमेव पर्याय आहे का, हा प्रश्न उपस्थित करणे अत्यंत आवश्यक आहे.

वैनगंगा नदीवरील गोसीखुर्द प्रकल्पातून पावसाळी पाणी तापी खोऱ्यातील बुलढाणाच्या नळगंगा प्रकल्पापर्यंत पोहोचविण्याची या महत्त्वाकांक्षी योजनेची संकल्पना आहे. केंद्र सरकारने मार्च २०२६ मध्ये लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पातून १,८०४.७८ दशलक्ष घनमीटर पाणी वळविण्याचे नियोजन आहे. सुमारे ३८८.२८ किलोमीटर लांबीच्या जोडकालव्याद्वारे नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम आणि भंडारा या आठ जिल्ह्यांतील ४,०४,२८१ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे. कागदावर हा प्रकल्प अत्यंत आकर्षक दिसत असला, तरी त्याच्या आर्थिक, पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांचा सखोल विचार होणे गरजेचे आहे.

या प्रकल्पाला विरोध करण्यामागील सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे त्याचा प्रचंड आर्थिक खर्च. सुरुवातीला सुमारे ८७,३४२ कोटी रुपयांचा असलेला या प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यता सुमारे ९४,९६७ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. म्हणजेच प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण होण्यापूर्वीच प्रकल्पाच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे.

इतक्या प्रचंड निधीचा वापर करताना सरकारने त्यातून मिळणाऱ्या प्रत्यक्ष लाभांचे, देखभाल खर्चाचे, विजेच्या खर्चाचे आणि भविष्यातील आर्थिक दायित्वांचे पारदर्शक विश्लेषण जनतेसमोर ठेवले पाहिजे. प्रकल्पासाठी उभारण्यात येणाऱ्या कालव्यांचे, उपसा सिंचन यंत्रणांचे आणि जलसाठ्यांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतरही त्यांची देखभाल करावी लागणार आहे. पाणी उचलण्यासाठी लागणारी वीज, पंपिंग स्टेशनचा खर्च आणि कालव्यांमधील पाण्याची गळती यांचाही विचार आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या निधीचा विनियोग स्थानिक जलसंधारणासाठी केला असता तर किती गावांमधील तलावांचे पुनरुज्जीवन झाले असते? किती शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचले असते? किती नवीन जलसाठे निर्माण करता आले असते? या प्रश्नांची तुलनात्मक आर्थिक आकडेवारी सरकारने जनतेसमोर ठेवावी.

विदर्भातील आणि महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये ऐतिहासिक तलाव, गाव तलाव, पाझर तलाव, लघुसिंचन प्रकल्प आणि बंधारे अस्तित्वात आहेत. मात्र, अनेक वर्षांपासून गाळ साचल्यामुळे या जलस्रोतांची पाणी साठवण्याची क्षमता कमी झाली आहे. काही ठिकाणी अतिक्रमण, नाल्यांमधील अडथळे, पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात झालेले बदल आणि देखभालीचा अभाव यामुळे जलसाठे नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

अशा परिस्थितीत हजारो कोटी रुपये खर्च करून शेकडो किलोमीटर दूरवरून पाणी आणण्यापूर्वी उपलब्ध जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे अधिक तर्कसंगत नाही का?

प्रत्येक गावातील तलावांचे वैज्ञानिक पद्धतीने खोलीकरण आणि आवश्यकतेनुसार रुंदीकरण करण्यात यावे. तलावांमधील गाळ काढून त्याचा सुपीक माती म्हणून शेतकऱ्यांना उपयोग करता येईल. तलावांमध्ये येणाऱ्या पाण्याचे नैसर्गिक मार्ग मोकळे करावेत. पावसाचे पाणी गावातच अडविण्यासाठी लहान बंधारे, सिमेंट नाला बांध, शेततळी, पाझर तलाव आणि पुनर्भरण संरचना उभाराव्यात.

यामुळे पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी स्थानिक पातळीवर साठवता येईल. भूजलपातळी वाढण्यास मदत होईल. विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याची उपलब्धता सुधारू शकते. स्थानिक शेतीला पूरक सिंचन मिळू शकते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक गावाला स्वतःच्या जलस्रोतांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता प्राप्त होईल. हा पर्याय नदीजोड प्रकल्पाचा प्रत्येक बाबतीत पूर्ण पर्याय ठरेलच असे नाही; मात्र त्याची परिणामकारकता, खर्च आणि लाभ यांचे स्वतंत्र मूल्यमापन केल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रकल्पाला प्राधान्य देणे योग्य ठरणार नाही.

मोठ्या नदीजोड प्रकल्पाचे परिणाम केवळ कालव्यांच्या बांधकामापुरते मर्यादित नसतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनीचे संपादन, नैसर्गिक जलप्रवाहात बदल, वनक्षेत्रांवरील परिणाम आणि जैवविविधतेवर होणारे संभाव्य दुष्परिणाम यांचा विचार करावा लागतो.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या १९ जुलै २०२४ च्या प्रस्ताव परीक्षणातील आकडेवारी नुसार, त्या टप्प्यावरील प्रकल्प प्रस्तावासाठी २८,०४१.३० हेक्टर जमिनीची आवश्यकता नमूद करण्यात आली होती. त्यात ३९५.३० हेक्टर वनजमिनीचा समावेश होता. तसेच २६ गावे पूर्णतः आणि ८३ गावे अंशतः बाधित होण्याची शक्यता नोंदवण्यात आली होती. २,६४६ कुटुंबांच्या पुनर्वसनाचाही उल्लेख होता.

प्रकल्पाच्या पुढील सुधारित आराखड्यात हे आकडे बदललेले असू शकतात. त्यामुळे अंतिम भूसंपादन, वनक्षेत्र आणि पुनर्वसनाची अद्ययावत आकडेवारी सार्वजनिक करणे आवश्यक आहे. विकासाच्या नावा खाली स्थानिक नागरिकांचे जीवन, शेती, घरे आणि पर्यावरण धोक्यात येत असेल, तर त्याची किंमत कोण मोजणार? प्रकल्पग्रस्तांना केवळ आर्थिक मोबदला देणे पुरेसे नाही. त्यांच्या उपजीविकेची, सामाजिक संबंधांची आणि भविष्यातील सुरक्षिततेची हमी देणेही सरकारची जबाबदारी आहे.

पाण्याची समस्या ही केवळ पाण्याची उपलब्धता वाढविण्याची समस्या नाही, तर उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि न्याय्य वितरण करण्याचीदेखील समस्या आहे. अनेक भागांमध्ये जलसाठे अस्तित्वात असूनही कालव्यांची अपूर्ण कामे, वितरण व्यवस्थेतील त्रुटी, पाणीगळती आणि नियोजनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांना अपेक्षित लाभ मिळत नाही.

नदीजोड प्रकल्पातून पाणी आणले तरी ते प्रत्येक शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचेल याची हमी काय? सिंचनाचे लाभक्षेत्र निश्चित करताना लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना प्राधान्य मिळणार का? पाण्याचे वितरण राजकीय किंवा प्रशासकीय प्रभावावर अवलंबून राहणार नाही, याची व्यवस्था काय? उद्योगांसाठी आणि शेतीसाठी राखीव पाण्याचे प्रमाण कोणत्या पारदर्शक निकषांवर ठरविले जाणार? हे प्रश्न अनुत्तरित ठेवून केवळ सिंचनक्षेत्र वाढविण्याच्या घोषणांवर जनतेने विश्वास ठेवणे अपेक्षित नाही.

राज्य सरकारने वैनगंगा-नळगंगा प्रकल्पावर कोट्यवधी रुपये खर्च करण्यापूर्वी विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी विकेंद्रित जलव्यवस्थापनाचा व्यापक आराखडा तयार करावा. प्रत्येक जिल्ह्यातील, तालुक्यातील आणि गावातील जलस्रोतांचे सर्वेक्षण करून त्यांची सद्यस्थिती, पाणी साठवण क्षमता आणि पुनरुज्जीवनासाठी लागणारा खर्च निश्चित करावा. प्रत्येक गावातील जुने तलाव, जलाशय आणि पाझर तलाव यांचे वैज्ञानिक पद्धतीने खोलीकरण व आवश्यकतेनुसार रुंदीकरण करावे. तलावांमधील गाळ काढून त्याचा शेतजमिनींची सुपीकता वाढविण्यासाठी उपयोग करावा. गावोगावी नाला खोलीकरण, नाला रुंदीकरण, सिमेंट नाला बांध आणि लहान बंधाऱ्यांची कामे हाती घेणे महत्त्वाचे आहे.

पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी भूजल पुनर्भरणाच्या योजना प्रभावीपणे राबवणे आवश्यक आहे. महत्त्वाचे म्हणजे अस्तित्वात असलेल्या सिंचन प्रकल्पांची अपूर्ण कामे पूर्ण करून पाणी वितरण व्यवस्था सक्षम करणे गरजेचे आहे. पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनाला प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक गावात ग्रामपंचायत, शेतकरी आणि जलतज्ज्ञांच्या सहभागातून जलव्यवस्थापन समित्या स्थापन केल्यास त्याचा प्रभावी परिणाम दिसतील. या सर्व कामांसाठी स्वतंत्र निधी, निश्चित कालमर्यादा आणि सामाजिक लेखापरीक्षणाची व्यवस्था केल्यास त्यावर योग्य देखरेख राहील. राज्य सरकारच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत ५,८१८ गावांमध्ये १,४८,८८८ कामे आणि ४,२२७ कोटी रुपयांची तरतूद असल्याचे नमूद करण्यात आले होते. तसेच गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेचे कायमस्वरूपी अंमलबजावणीचे धोरणही जाहीर करण्यात आले. याच प्रकारच्या योजना राबविताना आर्थिक शाश्वतता, पर्यावरण संरक्षण आणि स्थानिक गरजांचा विचार करणे तितकेच महत्त्वाचे आहे.

सरकारने या प्रकल्पाच्या खर्चाची आणि स्थानिक जलसंधारणाच्या पर्यायांची स्वतंत्र तज्ज्ञ समितीमार्फत तुलनात्मक व्यवहार्यता तपासावी. किती तलावांचे पुनरुज्जीवन होऊ शकते, किती पाणी साठवता येईल, किती शेतकऱ्यांना लाभ मिळेल आणि किती खर्च वाचू शकेल, याची जिल्हानिहाय श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी. पर्यावरणीय परिणामांचे मूल्यमापन, पाण्याच्या उपलब्धतेचा शास्त्रीय अभ्यास आणि प्रकल्पाच्या आर्थिक परताव्याची माहितीही सार्वजनिक करावी.

शेवटी प्रश्न एवढाच आहे की, विदर्भाच्या शेतकऱ्यांना पाणी हवे आहे की हजारो कोटींचा प्रकल्प? शेतकऱ्यांना मोठमोठ्या घोषणा नकोत, तर त्यांच्या शेतात वेळेवर पाणी हवे आहे. गावातील तलाव कोरडे पडलेले असताना, अस्तित्वातील जलस्रोत गाळाने भरलेले असताना आणि स्थानिक पातळीवरील जलव्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होत असताना जवळपास ९५ हजार कोटी रुपयांचा नदीजोड प्रकल्प हाच सर्वोच्च प्राधान्यक्रम असावा का? हा प्रकल्प पूर्ण करण्याचा घाट सरकारने घातलाच, तर तो विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यातून गेला पाहिजे. त्याचा फायदा संपूर्ण जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यांना झाला पाहिजे. जर, हे शक्य नसले तर हा प्रकल्प काय कामाचा? त्यापेक्षा हा प्रकल्प नाही झालेलाच बरा.

म्हणूनच वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचा फेरविचार करून त्याऐवजी प्रथम स्थानिक जलस्रोतांचे संवर्धन, तलावांचे खोलीकरण, रुंदीकरण आणि पुनरुज्जीवन यांना प्राधान्य देण्यात यावे. मोठ्या प्रकल्पांच्या राजकारणापेक्षा गावागावांतील पाण्याची शाश्वत व्यवस्था उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे.

डॉ. संदीप ताजने
मो.९३५९५९५४५५

समुद्राचे पाणी, मनुष्यासाठी जलसंजीवनी?



महाराष्ट्रात आज अनेक भागांना पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. मोठ्या शहरांपासून छोट्या गावांपर्यंत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. धरणांमधील पाणीसाठ्यात होणारी घट, पावसाचे अनिश्चित स्वरूप आणि भूजलपातळीत होणारी घसरण यामुळे भविष्यातील जलसुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत पारंपरिक जलस्रोतांबरोबरच पाण्याचे नवे पर्यायी स्रोत शोधण्याची गरज निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने इस्रायलच्या धर्तीवर समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर करणारे प्रकल्प कोकण किनारपट्टीवर उभारण्याचा गांभीर्याने विचार करायला हवा.

इस्रायलसारख्या पाणीटंचाईग्रस्त देशाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने समुद्राच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करून जलसुरक्षेच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. भारतातही चेन्नईसारख्या शहरांमध्ये हे तंत्रज्ञान यशस्वीपणे वापरले जात आहे. महाराष्ट्रात मुंबईतील मनोरी येथे दररोज २०० दशलक्ष लिटर पाणी तयार करण्याची क्षमता असलेला प्रकल्प उभारला जात आहे. म्हणजेच हे तंत्रज्ञान आपल्यासाठी नवीन किंवा केवळ प्रायोगिक स्वरूपाचे राहिलेले नाही.

मग रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि पालघर या किनारपट्टीच्या जिल्ह्यांमध्ये स्थानिक गरजेनुसार असे प्रकल्प का उभारू नयेत? मोठ्या शहरांसाठी मोठ्या क्षमतेचे, तर पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या गावांसाठी कमी क्षमतेचे सामायिक प्रकल्प उभारता येऊ शकतात. सुरुवातीला काही निवडक गावांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर असे प्रकल्प सुरू करून त्यांची उपयुक्तता तपासता येईल.

अर्थात, अशा प्रकल्पांसाठी मोठी प्रारंभिक गुंतवणूक, विजेचा खर्च, देखभाल आणि समुद्रात सोडल्या जाणाऱ्या अतिक्षारयुक्त पाण्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन ही आव्हाने आहेत. त्यामुळे सौरऊर्जेचा वापर, आधुनिक झिल्ली तंत्रज्ञान, एनर्जी रिकव्हरी सिस्टीम्स आणि पर्यावरणीय निकषांचे काटेकोर पालन यांना प्राधान्य द्यावे लागेल. लोकसंख्या, पाण्याची गरज आणि आर्थिक व्यवहार्यता लक्षात घेऊनच प्रकल्पांसाठी योग्य ठिकाणांची निवड करणे आवश्यक आहे. समुद्राच्या पाण्याचे शुद्धीकरण हा महाराष्ट्राच्या जलसंकटावरील एकमेव उपाय नक्कीच नाही; मात्र पावसाचे पाणी साठवणे, जलसंधारण, भूजल पुनर्भरण आणि सांडपाण्याचा पुनर्वापर या उपायांना पूरक असा हा एक महत्त्वाचा पर्यायी जलस्रोत ठरू शकतो.

आज निर्माण झालेल्या जलसंकटाला केवळ 'अल निनो' हे एकमेव कारण नाही. त्यामागे अनेक नैसर्गिक चक्रांमध्ये आवाजवी मानवी हस्तक्षेप आणि पाण्याच्या वापराबाबतची अनास्थाही तितकीच जबाबदार आहे. वाढत्या पाणीऊपशामुळे अनेक भागांतील भूजलपातळी खालावली आहे. ठराविक नगदी पिकांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर केला जातो. पाण्याचा अपव्यय आणि योग्य नियोजनाचा अभाव यामुळे उपलब्ध जलसंपत्तीवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे.

नद्या, नाले आणि इतर नैसर्गिक जलस्रोत प्रदूषित केले जात आहेत. त्यांच्या प्रवाहात अडथळे निर्माण केले जात आहेत. बेसुमार वृक्षतोड आणि पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्याकडे झालेले दुर्लक्ष यामुळे भूजल पुनर्भरणाची नैसर्गिक प्रक्रिया बाधित झाली आहे. परिणामी धरणांवर आणि कृत्रिम जलसाठ्यांवर आपले अवलंबित्व वाढत गेले. पावसाच्या अनियमिततेबरोबरच या सर्व घटकांचा एकत्रित परिणाम आजच्या जलसंकटात दिसून येत आहे. अशा परिस्थितीत समुद्राचे खारे पाणी गोडे करण्याचा पर्याय स्वीकारणे म्हणजे चुकीच्या जलव्यवस्थापनातून निर्माण झालेल्या समस्येवर तंत्रज्ञानाच्या मदतीने तोडगा शोधण्यासारखे आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाकडे अंतिम उपाय म्हणून नव्हे, तर वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ठरू शकणारा पूरक पर्याय म्हणून पाहिले पाहिजे.

खरा आणि दीर्घकालीन उपाय निसर्गाने आपल्याला दिलेल्या गोड्या पाण्याच्या स्रोतांचे संवर्धन करण्यातच आहे. पावसाचे पाणी शक्य तितके जमिनीत मुरवणे, नद्या आणि नैसर्गिक जलस्रोत स्वच्छ व प्रवाही ठेवणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाण्याच्या उपलब्धतेनुसार पीकपद्धतीत बदल करणे आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करणे या गोष्टींना प्राधान्य द्यावे लागेल. कारण समुद्राचे पाणी गोडे करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करता येईल; पण पावसाचे नैसर्गिक चक्र, जमिनीची पाणी साठवण्याची क्षमता आणि निसर्गाचे संतुलन यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही.

पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊ लागले की त्याची किंमत कमी होण्याची आणि पुन्हा मनमानी वापर सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज ज्या चुकीच्या सवयींमुळे नैसर्गिक जलस्रोतांवर संकट ओढवले आहे, त्याच सवयी नव्या तंत्रज्ञानामुळे मिळणाऱ्या पाण्याच्या बाबतीतही कायम राहिल्या, तर या प्रयत्नांचा अपेक्षित फायदा होणार नाही.

शेवटी, निसर्गाने आपल्याला पावसाच्या रूपाने गोडे पाणी, तसेच नद्या, तलाव, विहिरी आणि भूजलाचे अमूल्य स्रोत दिले आहेत. मात्र त्यांचे संवर्धन करण्यात आपण कमी पडलो आणि आता समुद्राच्या खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून पाणी मिळवण्याची वेळ आपल्यावर येत आहे. त्यामुळे समुद्रजल शुद्धीकरणातून मिळणारे पाणी म्हणजे अमर्याद वापर करण्याचा परवाना नव्हे. ते मिळवण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान, ऊर्जा, पैसा आणि श्रम लक्षात घेता त्याचा वापर अधिक जबाबदारीने व्हायला हवा.

समुद्राकडून पाणी मिळवण्याची वेळ आपल्यावर येऊ नये, अशी काळजी घेणे हा पहिला प्रयत्न असावा; आणि अशी वेळ आलीच, तर मिळालेल्या प्रत्येक थेंबाची किंमत ओळखणे ही आपली जबाबदारी असावी! कारण पाण्याचा स्रोत बदलला म्हणून पाण्याबाबतची आपली मानसिकता बदलली नाही, तर कोणतेही तंत्रज्ञान आपल्याला जलसंकटातून कायमस्वरूपी बाहेर काढू शकणार नाही!

अनिकेत शेटे, पुणे.

शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

स्वातंत्र्य संग्राम सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या स्मृतिदिनानिमित्त कुस्त्याची विराट दंगल..!

१५ लाख रुपयांची जंगी लूट, विजेता पहेलवानाला मिळणार एक लाख रुपयांचे बक्षीस

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २० : महाराष्ट्रातील मल्लविद्येच्या विकासचक्राला गती देण्यासाठी लाल मातीतील कुस्ती स्पर्धांची परंपरा कायम राखत यवतमाळ जिल्हा कुस्तीगीर संघाने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बुधवार २५ नोव्हेंबर रोजी तब्बल पंधरा लाख रुपयांची रुपयांची जंगी लयलूट असलेल्या भव्य इनामी काटा कुस्त्यांची विराट दंगल आयोजित केली आहे.



ज्येष्ठ स्वातंत्र्यसंग्राम सेनानी तथा लोकमत वृत्तपत्र समूहाचे संस्थापक संपादक जवाहरलाल दर्डा उपाध्य बाबूजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त येथील ऐतिहासिक हनुमान आखाड्याच्या प्रांगणात २५ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजता पासून हलगी, तुतारी आणि डफ या शिवकालीन वाद्यांच्या गजरात स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. माजी खासदार विजय दर्डा, माजी शिक्षण मंत्री राजेंद्र दर्डा, यवतमाळ विधानसभेचे आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी आमदार कीर्ती गांधी, जिल्हा लोकमत,प्रमुख किशोर दर्डा यांच्या मार्गदर्शनात ही दंगल होणार आहे. कुस्ती शौकिनांना या दंगलीत प्रवेश नि:शुल्क राहणार आहे. हनुमान आखाड्यातील दिवंगत कुस्तीगीर पहेलवान गोकुल वस्ताद, श्रीरामजी पजगाडे, पहेलवान भैयालालजी जयस्वाल, बब्बी पहेलवान, गजानन धलवार, नारायणराव पजगाडे, नथ्थुजी नासनूरकर, बंठोल पहेलवान, मधुकरराव भेंडकर, गजाननराव भाटवडेकर, शेषरावजी अजमिरे,शाहू चव्हाण,रमेश पाटील, शेख अब्दुल,गजानन उजवणे, हिरामण यादव, सुधाकर डोईजड, गोसावी गुरुजी, परशरामजी तायडे गुरुजी, वसंतराव जोशी गुरुजी, नानासाहेब औदार्य, रामनाथजी यादव, रमेश तिवारी,राजेश दशसहस्र, विजय मोगरकर, विठ्ठल भोयर,राजू किनाके आदींच्या स्मृतीनिमित्त बक्षीसे ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेचे पहिले बक्षीस एक लाख रुपये व दुसरे बक्षीस ७१ हजार रुपये जिल्हा कुस्तीगीर संघातर्फे दिले जाणार आहे. तिसरे बक्षीस ५१ हजार रुपये यवतमाळ जिल्हा कुस्तीगीर संघाचे माजी अध्यक्ष सुभाषदादा बाजोरिया यांच्या स्मृतिनिमित्त दिले जाईल. चौथे बक्षीस ४१ हजार रुपये जनता नागरी सहकारी पतसंस्था यवतमाळ तर्फे, पाचवे बक्षीस ३१ हजार रुपये गोदावरी अर्बन मल्टीस्टेट बँकेतर्फे, सहावे बक्षीस २५ हजार रुपये चिंतामणी पांडे स्मरणार्थ बाळासाहेब पांडे नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे, सातवे २१ हजार रुपये विजय डांगे व धनंजय भगत यांचे कडून, आठवे १५ हजार रुपये अशोकराव गुल्हाने स्मृतीप्रित्यर्थ शैलेश गुल्हाने यांचे तर्फे, नववे १० हजार रुपये किशोर चाकोलेवार यांचे कडून, दहावे बक्षीस सात हजार रुपये यशवंत इसराणी यांचे तर्फे अकरावे बक्षीस सहा हजार रुपये मसूदभाई समीर एंटरप्राइजेस यांच्याकडून, बारावे बक्षीस सहा हजार रुपये शमी पहेलवान स्मृतीप्रित्यर्थ शकील पहेलवान यांचे कडून दिले जाणार आहे. याशिवाय एक हजार रुपयांच्या पाच -पाच कुस्त्या प्रकाश बन्नावडे यांचे स्मरणार्थ अभिजीत बन्नावडे यांचे कडून, पाच-पाचशे रुपयांच्या बावीस कुस्त्या नामदेव काळे, खन्नू पहेलवान, सुरेश जयसिंगपुरे यांचे तर्फे दिले जाईल. याशिवाय १००,२००,३००,४०० रुपयांचे अनेक कुस्त्यांचे जोड लावून विजयी मल्लांना रोख बक्षीस दिले जाणार आहे. कुस्त्यांची जोड धनराज मिसळे,नामदेवराव काळे, रामकृष्णजी शेटे, संजय तिवारी,गौरव पाने, शेख नईम,सय्यद शमशुद्दीन,गौरव कट्यारमल,चंद्रकांत खोडकुंभे,पवन पांडे, सुजित बाकडे,अभिषेक दाबेराव मोहन चुटे लावतील.समालोचन भालचंद्र रणशूर(हिंगोली),नितीन पटले करणार आहेत. पंच म्हणून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परीषद पुणेचे विभागीय सचिव अनिल पांडे,उद्धव बाकडे,प्रदीप जयस्वाल,मोहम्मद शकील, एडवोकेट धनंजय लोखंडे, संदीप नेवारे,सुभाष जुमळे, चेतन उगले, आनंद जाधव, जितू बन्नावळे काम सांभाळणार आहे. या स्पर्धेत सहभागी व्हावे अशी विनंती जिल्हा कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष प्रभाकर गटलेवार, सचिव अनिल पांडे उपाध्यक्ष कुलभूषण तिवारी, रामेश्वर यादव,संघटक प्रताप पारसकर, दीपक ठाकूर, कोषाध्यक्ष अनंत जोशी, सहसचिव सुरेश जयसिंगपुरे यांनी केले आहे

'वोट बचाओ, देश बचाओ'चा काँग्रेसचा एल्गार; पांढरकवड्यात जनजागृती अभियानाला जोर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि. २० : खासदार प्रतिभाताई धानोरकर,माजी मंत्री शिवाजीराव मोघे,माजी मंत्री वसंत पुरके, जिल्हाध्यक्ष सचिन नाईक तसेच यवतमाळ जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष जितेंद्र भाऊ मोघे यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसच्या वतीने 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियान पांढरकवडा शहरातील विविध प्रभागांसह तालुक्यातील विविध गावांमध्ये राबविण्यात आले.

या अभियानांतर्गत मांगुर्डा व गोवराई येथेही जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. नागरिकांमध्ये मतदानाचे महत्त्व, लोकशाहीचे संरक्षण आणि संविधानाच्या रक्षणाबाबत जनजागृती करण्यात आली. लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या मतदानाचा हक्क जबाबदारीने बजावावा,असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी जिल्हा सरचिटणीस काँग्रेस कमिटी यवतमाळ अमर पाटील,माजी शहर अध्यक्ष मनोज भोयर,जिल्हाध्यक्ष आदिवासी सेल अनिल कीनाके,काँग्रेस कमिटी पांढरकवडा शहराध्यक्ष अनिस पोसवाल,माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती बिशनसिंग शिंदे, दत्तात्रेय ठाकरे,करीम मामू,शेषराव जिद्देवार, साहिल मेश्राम,सलीम मौलाना,पवन सलाम, माणिक टेकाम,शंकर टेकाम,वसंता शेटमेके, राजू कुमरे,राजू मडावी,अरुण पुसनाके, चंपत नैताम,इशरत शेख,सादिक सैयद, महेश गेडाम,आतिश येवले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'वोट बचाओ, देश बचाओ'— लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी जनजागृतीचा संकल्प करण्यात आला.

थोडक्यात



दादर स्थानकाला 'चैत्यभूमी' नाव देण्याच्या निर्णयाचे रिपाइंकडून स्वागत..!

यवतमाळ : मुंबईतील दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' असे नाव देण्याच्या निर्णयाचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर यांनी स्वागत केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रयत्नांमुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा खरा गौरव होत असल्याचा दावा त्यांनी प्रसिद्धीपत्रकातून केला. बाबासाहेबांना हयातीत भारतरत्न न मिळणे, निवडणुकीतील पराभवासाठी काँग्रेसने प्रयत्न करणे, अशा ऐतिहासिक मुद्द्यांचा उल्लेख करत मानकर यांनी काँग्रेसवर टीका केली. तर मोदी सरकारने २६ नोव्हेंबरला संविधान दिनाचा दर्जा देणे, लंडनमधील बाबासाहेबांचे निवासस्थान खरेदी करणे, इंदू मिल स्मारक आणि पंचतीर्थ विकासाला चालना देणे, हे महत्त्वाचे निर्णय असल्याचे त्यांनी नमूद केले. दादर स्थानकाला चैत्यभूमीचे नाव देण्याची मागणी आंबेडकरी समाजाकडून अनेक वर्षांपासून होत होती. महापरिनिर्वाण दिनासह वर्षभर लाखो अनुयायी या ठिकाणी अभिवादनासाठी येतात. त्यामुळे या निर्णयामुळे आंबेडकरी जनतेच्या भावनांचा सन्मान झाल्याचे मानकर म्हणाले. मात्र, बाबासाहेबांच्या विचारांचा खरा गौरव केवळ नामकरणाने नव्हे, तर संविधानातील समता, न्याय आणि बंधुत्वाची प्रत्यक्ष अंमलबजावणी केल्यानेच होईल, हा मुद्दाही महत्त्वाचा ठरतो.

टिपू सुलतान जयंती साधेपणाने साजरी..! सर्वधर्मीय नागरिकांचा सहभाग

पुसद : तालुक्यातील काळी दौलत खान येथे शेर-ए-हिंद टिपू



सुलतान यांची जयंती यंदा दुष्काळी परिस्थितीचे भान राखत साधेपणाने साजरी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा विचार करून मिरवणूक, डीजे आणि अनावश्यक जल्लोष टाळण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला. उत्सवापेक्षा सामाजिक संवेदनशीलतेला प्राधान्य देणाऱ्या या भूमिकेची चर्चा होत आहे. कार्यक्रमाची सुरुवात टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली. उपस्थितांनी घोषणांद्वारे अभिवादन केले. यावेळी वक्त्यांनी टिपू सुलतान यांच्या शौर्य, त्याग आणि देशभक्तीच्या कार्याचा गौरव केला. सर्वधर्मीय नागरिकांनी एकत्र येत बंधुता आणि सामाजिक एकोप्याचा संदेश दिला. कार्यक्रमानंतर मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी उपनिरीक्षक राहुल देशमुख, जमादार हनुमान गंगासागर, गावपाटील प्रकाश दवणे, तंटामुक्ती अध्यक्ष उज्ज्वल रणवीर, शारिक शेख यांच्यासह विविध क्षेत्रांतील नागरिक उपस्थित होते. आभार शारिक शेख यांनी मानले.

काँग्रेसमध्ये संघटनात्मक फेरबदल नव्या पदाधिकाऱ्यांवर पक्षबांधणीची जबाबदारी!

महागाव : आगामी राजकीय आव्हाने आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची पार्श्वभूमी लक्षात घेता महागाव तालुका काँग्रेस कमिटीने संघटनात्मक बांधणीला गती देण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आणि जिल्हा काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार तालुकाध्यक्ष सुनीलभाऊ राठोड यांनी जिल्हा परिषद मंडळ अध्यक्षांसह पंचायत समिती सेक्टर अध्यक्षांच्या नूतन नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. मात्र, या नियुक्त्यांमधून पक्षाला प्रत्यक्ष किती बळ मिळते, हे नव्या पदाधिकाऱ्यांच्या कामगिरीवर ठरणार आहे.
जिल्हा परिषद मंडळ अध्यक्षपदी फुलसावंगी येथील कुणाल सुभाषराव नाईक, सवना मंडळासाठी कलगावचे पंजाबराव राऊत आणि हिवरा मंडळासाठी ईजनी येथील निलेश साहेबराव राठोड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पंचायत समिती सेक्टर अध्यक्षपदी फुलसावंगी – प्रकाश मुधोळकर (काळी टेंभी), मुडाणा – पवन मोरे (वडद), सवना – नवाज खान युनूस खान, मोरथ – अमोल वानखेडे, हिवरा – सुभाष वामन खंदारे (आनंतवाडी) आणि पोखरी – गोविंद बलवंत खरे (तिवरंग) यांची निवड करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमागे तालुक्यातील ग्रामीण भागात काँग्रेसची संघटनात्मक पकड मजबूत करणे, निष्क्रियतेतून कार्यकर्त्यांना बाहेर काढणे आणि पक्षाचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, केवळ पदवाटप करून संघटना मजबूत होणार नाही. गावपातळीवर जनसंपर्क, कार्यकर्त्यांची सक्रियता आणि जनतेच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणे आवश्यक ठरणार आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे तालुका काँग्रेस कमिटीने अभिनंदन केले असून, आता प्रत्यक्ष कामातून पक्षाला उभारी देण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली आहे.

दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजनेतील कथित गैरव्यवहाराचे पडसाद..!

श्री समर्थ संस्थेवरही आमदार तोडसामांचा निशाणा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



घाटंजी, दि. २० : भूमिहीन आणि वंचित घटकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राबविण्यात आलेल्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळी करण आणि स्वाभिमान योजनेतील जमीन खरेदी व वाटप प्रक्रियेत मोठा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप आमदार राजू तोडसाम यांनी केला आहे.

२००५ मधील या प्रक्रियेत संगनमताने अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करत त्यांनी तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच आता श्री समर्थ शिक्षण संस्थेच्या कारभारावर ही त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. घाटंजी येथील विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार तोडसाम यांनी संस्थेच्या संचालक मंडळातील अलीकडील बदल, व्यवस्थापनाची कार्यपद्धती आणि संस्थेच्या भविष्यातील विकेंद्रीकरणा बाबत आक्षेप नोंदवले. गायकवाड स्वाभिमान योजनेतील कथित गैरव्यवहारातून निर्माण झालेल्या परिस्थितीची पुनरावृत्ती श्री समर्थ शाळेच्या बाबतीत होता कामा नये, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. संस्थेच्या व्यवस्थापनातील वादात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, ही आपली प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. व्यवस्थापनाने कारभारात आवश्यक सुधारणा करून उपस्थित प्रश्नांची समाधानकारक उत्तरे द्यावीत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कारभारात सुधारणा न झाल्यास विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून जाब विचारणार, असा इशाराही तोडसाम यांनी दिला. या पत्रकार परिषदेला भाजपचे तालुकाध्यक्ष विजय बैस, विनय जाधव, रितेश बोबडे व अंबादास मेश्राम उपस्थित होते. दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजनेतील कथित गैरव्यवहाराचे प्रकरण न्यायालयात असल्याने न्यायालयीन प्रक्रियेतून काय निष्पन्न होते आणि श्री समर्थ संस्थेच्या कारभारात काय बदल होतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

राजकीय व अधीकारी पाहुण्यांच्या दौऱ्यातच आर्णीची वाहतूक शिस्तीत..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



आर्णी, दि. २० : आर्णी शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, सर्वसामान्य नागरिकांना मात्र वाहतूक व्यवस्थेच्या अनागोंदीचा त्रास सहन करावा लागत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून बसस्थानक चौक आणि दिग्रस-माहूर मार्गापर्यंत वाहतुकीचा बोजवारा उडाला असताना पोलीस यंत्रणा कुठे आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. वाहतूक सुरळीत करण्याची मागणी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेचे आर्णी तालुका प्रमुख रफिक सरकार यांनी केली आहे. शहरातील प्रमुख चौकांमध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बसेस, ट्रॅव्हल्स आणि इतर वाहनांचा बिनदिक्कत वावर सुरू आहे. चौकांमध्येच वाहने उभी करून दिग्रस, यवतमाळ, माहूर आणि महागावकडे जाणाऱ्या प्रवाशांची चढ-उतार केली जाते. परिणामी वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. विशेषतः शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज चौकात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी असते. अशा परिस्थितीत लहान विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, कधीमधी चौकात दिसणारे दोन होमगार्डही वाहतूक कोंडी सोडविण्याऐवजी बघ्याची भूमिका घेत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे. बसस्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर खासगी बसेस उभ्या राहत असतानाही कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पाहुण्यांसाठी तत्पर, जनतेसाठी दुर्लक्ष?

शुक्रवारी आदिवासी विकास मंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आमदारांचा दौरा असल्याने सकाळपासून पोलिसांनी वाहतूक व्यवस्था चोख ठेवली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दौऱ्यावेळी वाहतूक सुरळीत होऊ शकते, तर रोजच्या नागरिकांसाठी ती का होऊ शकत नाही? असा बोचरा सवाल उपस्थित होत आहे.
या संदर्भात जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी निवेदन देण्यात येणार असून, वाहतूक व्यवस्थेत सुधारणा न झाल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशारा मानवाधिकार संघटनेने दिला आहे. आता आर्णी पोलीस प्रशासन केवळ दौऱ्यांपुरतेच सक्रिय राहणार की नागरिकांच्या सुरक्षिततेसाठीही ठोस कारवाई करणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

तिरळेपणावर यवतमाळात मोफत शस्त्रक्रियेची संधी!

'प्रोजेक्ट नयनतारा'चा पुढाकार,पहिल्याच दिवशी ३०० हून अधिक रुग्णांची तपासणी, २१ व २२ नोव्हेंबरला शस्त्रक्रिया

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २० : तिरळेपणाच्या समस्येमुळे अनेक बालकांसह तरुण आणि प्रौढांना शारीरिक त्रासाबरोबरच न्यूनगंड व सामाजिक अवहेलनेलाही सामोरे जावे लागते. मात्र, उपचारांचा खर्च परवडत नसल्याने अनेकजण उपचारांपासून वंचित राहतात.

ही अडचण दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'प्रोजेक्ट नयनतारा' अंतर्गत यवतमाळात मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी ३०० पेक्षा अधिक रुग्णांची तपासणी झाल्याने या उपक्रमाला प्रतिसाद मिळाला आहे. शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. तपासणीत शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरणाऱ्या रुग्णांवर २१ व २२ नोव्हेंबर रोजी मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. खासगी रुग्णालयांमध्ये तिरळेपणाच्या शस्त्रक्रियेसाठी साधारणतः ५० हजार ते एक लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. त्यामुळे आर्थिक परिस्थितीमुळे उपचार टाळणाऱ्या रुग्णांसाठी हे शिबिर दिलासादायक ठरणार आहे. यावेळी पालकमंत्री राठोड यांनी रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. तिरळेपणाच्या उपचारांसाठी पुणे-मुंबईला जाण्याची गरज भासू नये, यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर सुविधा उपलब्ध केल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात तालुकास्तरावरही अशी शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांनी जिल्हा परिषद शाळांमधील तिरळेपणा ग्रस्त मुलांसाठी पुन्हा विशेष मोहीम राबविण्याची ग्वाही दिली. यावेळी डॉ. मधुसूदन झंवर, डॉ. रितेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, डॉ. प्रशांत उईके, डॉ. सुखदेव राठोड, डॉ. सुभाष ढोले, डॉ. प्रसाद बनसोड यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. मुख्यमंत्री सहायता कक्ष, सार्वजनिक आरोग्य विभाग, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या चमूंनी शिबिरासाठी परिश्रम घेतले.

तुटलेल्या लोखंडी जाळी मुळे अपघाताचा धोका..! नगरपालिकेला दुर्घटनेची प्रतीक्षा?



पुसद, दि. २० : उमरखेड राज्य मार्गालगत पवननगर व मंगलमूर्ती नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील धोकादायक वळणावर नालीवरील लोखंडी जाळी तुटल्याने अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. गेल्या १५ ते २० दिवसांपासून नागरिक तक्रारी करीत असतानाही नगरपरिषद प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, याच ठिकाणी यापूर्वी ऑटो पलटी होऊन एका बालिकेचा, तर दुचाकीवरून पडून एका वृद्धाचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यानंतरही प्रशासनाला जाग येत नसेल, तर आणखी किती जीव जाण्याची प्रतीक्षा केली जात आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. तुटलेली जाळी हटवून त्या ठिकाणी मजबूत जाळी बसविण्याची मागणी नगर अभियंत्यांकडे वारंवार करण्यात आली आहे. मात्र, कार्यवाही शून्यच आहे. दुर्घटना घडल्यानंतर जबाबदारी निश्चित करण्यापेक्षा प्रशासनाने आताच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अन्यथा रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

बेलदरी ग्रामस्थांच्या पाठपुराव्याला यश नागपूर–तुळजापूर महामार्गावर स्वतंत्र मार्गाचे काम सुरू!



महागाव, दि. २० : नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरून बेलदरी गावाकडे जाण्यासाठी योग्य मार्ग नसल्याने ग्रामस्थांना करावा लागणारा जीवघेणा प्रवास अखेर थांबण्याच्या मार्गावर आहे.

नांदाव्हान येथून मोठा वळसा घेत महामार्ग ओलांडण्याची वेळ ग्रामस्थांवर येत होती. या धोकादायक परिस्थितीत अपघाताही घडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला होता. दुचाकीस्वार, शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सचिन आडे यांनी ग्रामस्थांच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर या मागणीची दखल घेत बेलदरीकडे जाण्यासाठी महामार्गावर मार्ग उपलब्ध करून देण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. काम सुरू असताना सचिन आडे यांच्यासह सर्जेराव राठोड, मधुकर जाधव, पृथ्वीराज जाधव, लखन जाधव, अशोक आडे, विनायक आडे, शुभम जाधव, आश्विन हनवते, पवन आडे व चंद्रसेन आढागळे उपस्थित होते. ग्रामस्थांच्या एकजुटीने अखेर प्रश्न मार्गी लागल्याने समाधान व्यक्त होत आहे. मात्र, रस्त्याचे काम सुरक्षिततेच्या सर्व निकषांनुसार पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

जिल्हा बँकेच्या समस्यांवर मुख्यमंत्र्यांचे आश्वासन अंमलबजावणीचे आव्हान कायम!

बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांच्या भेटीदरम्यान मुख्यमंत्र्यांचे ठोस आश्वासन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. २० : आर्थिक अनिष्ट तफावतीच्या विळख्यात अडकलेल्या यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला सावरण्यासाठी आता मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाकडे आशेने पाहिले जात आहे.

बँकेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे ठोस अभिवचन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मात्र, या आश्वासनांचे प्रत्यक्ष निर्णयात रूपांतर कधी होणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. १७ नोव्हेंबर रोजी बँकेचे अध्यक्ष खा. संजय देशमुख, उपाध्यक्ष नितीन भूतडा व विजय जाधव यांनी मुंबईत मंत्रालयात मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन बँकेच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधले. अनिष्ट तफावत कायमची दूर करणे, पोफाळी येथील वसंत सहकारी साखर कारखान्यावर बँकेच्या अधिकाऱ्याची अवसायक म्हणून नियुक्ती, २०१७ च्या छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेपासून वंचित शेतकऱ्यांना लाभ, सहकार प्रशिक्षण केंद्र व ग्रामीण विकास अकॅडमीची स्थापना, मुख्य कार्यकारी अधिकारी पदासाठी एमएससी बँकेचा अधिकारी प्रतिनियुक्तीवर देणे आणि कार्यालयांसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या मागण्या मांडण्यात आल्या. यावेळी वित्त व सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांना सर्व समस्यांबाबत तातडीने अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. पालकमंत्री संजय राठोड व राज्यमंत्री ॲड. इंद्रनील नाईक उपस्थित होते. आता केवळ आश्वासन नव्हे, तर ठोस निर्णय आणि कालबद्ध अंमलबजावणी आवश्यक आहे. कारण बँकेचे भवितव्य आणि हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक हित याच्याशी जोडलेले आहे.

सेतू ई-निविदेचा संपूर्ण लेखाजोखा,पात्र- अपात्रतेच्या निकषा पासून करारा पर्यंत आरटीआयचा बडगा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २० : जिल्हा सेतू समितीमार्फत राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निविदेतील पात्र-अपात्रतेचे निकष, हरकतींवरील सुनावणी, निवड झालेल्या संस्थेचे करारनामे आणि सेतू केंद्रांवरील ऑपरेटर्सच्या नियुक्त्यांबाबतची संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी माहिती अधिकाराचा आधार घेण्यात आला आहे. रासंभाजी नगर, आर्णी येथील रहिवासी लीलाधर राऊत यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे यासंदर्भात अर्ज दाखल केला आहे.

२९ जून २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या जिल्हा सेतू समितीच्या ई-निविदेतील निर्णय प्रक्रियेचा लेखाजोखा या अर्जातून मागविण्यात आला आहे. नेमके कोणते निविदाधारक पात्र ठरले, कोणाला अपात्र ठरविण्यात आले आणि त्यासाठी कोणते निकष लावण्यात आले, याची फेरीनिहाय लेखी माहिती मागण्यात आली आहे. त्यामुळे निविदा प्रक्रियेत समान संधी आणि नियमांचे पालन झाले होते का, याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागणार आहे. विशेष म्हणजे, निविदा प्रक्रियेदरम्यान दाखल झालेल्या हरकती, त्यावरील सुनावणी झाली किंवा नाही, सुनावणीतील खुलासे आणि जिल्हाधिकाऱ्यांनी नोंदविलेले शेरा यांच्याही प्रमाणित प्रती मागविण्यात आल्या आहेत. तहसीलनिहाय सेतू केंद्रांच्या संचालनासाठी निवड झालेल्या व्यक्ती, संस्था किंवा कंपनीला दिलेले कार्यभार आदेश, अटी-शर्ती आणि शासकीय करारबद्धतेची कागदपत्रेही मागविण्यात आली आहेत. याशिवाय निवड झालेल्या संस्थेने शासनाकडे सादर केलेला करारनामा, हमीपत्र, बाँड, बँक सिक्युरिटीचा तपशील तसेच नियुक्त ऑपरेटर्सची नावे, पदनामे आणि मोबाइल क्रमांकांची यादी मागण्यात आली आहे. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी हा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाला आहे. सेतू केंद्रे ही सर्वसामान्य नागरिकांच्या शासकीय कामकाजाशी थेट संबंधित सेवा व्यवस्था आहे. त्यामुळे या व्यवस्थेचे संचालन कोणाच्या हाती दिले, निवड कोणत्या निकषांवर झाली आणि हरकतींचे निराकरण कसे झाले, हे जनतेसमोर येणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रिया नियमबद्ध आणि पारदर्शक असेल तर कागदपत्रे समोर आणण्यास अडचण काय? आता प्रशासन माहिती देऊन संशय दूर करणार की प्रश्न अनुत्तरित ठेवणार, याकडे जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

चिखलदरा तालुक्यात स्वतंत्र कृउबा समितीची मागणी तीव्र

सभापती रोहित पटेल यांचे सहायक निबंधकांना निवेदन

मेळघाट/वार्ताहर

चिखलदरा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मागणीने पुन्हा एकदा जोर धरला आहे. गेल्या जवळपास ३० वर्षांपासून तालुक्यात स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती नसल्यामुळे आदिवासी तसेच इतर शेतकऱ्यांना शेतीमालाच्या विक्री आणि विपणन व्यवस्थेसाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून, त्यांच्या हितासाठी स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याची मागणी आता अधिक ठामपणे पुढे येत आहे.

चिखलदरा तालुक्यातील बहुतांश ग्रामीण भागातील नागरिकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाच्या विक्रीसाठी स्थानिक पातळीवर सक्षम आणि स्वतंत्र बाजारव्यवस्था उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र, स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती नसल्याने शेतकऱ्यांना सध्याच्या उपलब्ध व्यवस्थांवर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी शेतीमालाच्या विपणन प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असून त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होत आहे.

या प्रश्नाची दखल घेत कृषी उत्पन्न बाजार समिती धारणीचे सभापती रोहित राजकुमार पटेल यांनी चिखलदरा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीला प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात त्यांनी सहकार अधिकाऱ्यांमार्फत सहायक निबंधक, अचलपूर यांच्याकडे अधिकृत निवेदन सादर केले. या निवेदनातून चिखलदरा तालुक्यात स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मेळघाटातील आदिवासीबहुल भागातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी योग्य बाजारव्यवस्था मिळणे ही काळाची गरज आहे. स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन झाल्यास स्थानिक पातळीवर शेतीमालाच्या खरेदी-विक्रीसाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल पडू शकते. त्याचबरोबर शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडण्यास आणि कृषी क्षेत्राच्या आर्थिक विकासाला चालना देण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

निवेदन सादर केल्यानंतर सभापती रोहित राजकुमार पटेल यांनी शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर केवळ निवेदन देऊन थांबणार नसल्याचे स्पष्ट केले. संबंधित प्रशासकीय विभाग तसेच शासन स्तरावर या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. १७ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन करण्यासाठी ठोस कार्यवाही होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

गेल्या तीन दशकांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीबाबत आता प्रशासन आणि शासन कोणती भूमिका घेते, याकडे चिखलदरा तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. स्वतंत्र कृषी उत्पन्न बाजार समितीच्या स्थापनेबाबत सकारात्मक निर्णय झाल्यास मेळघाटातील कृषी क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

संक्षिप्त

अर्णवी गंजीवाले हिला बालरंग गौरव पुरस्कार

तिवसा- शिक्षक ध्येय यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत उत्कृष्ट चित्र साकारून उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल कु. अर्णवी अविनाश गंजीवाले हिला प्रतिष्ठेचा 'बालरंग गौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.अर्णवीने आपल्या कल्पकतेतून, रंगांच्या सुंदर संयोजनातून आणि कलात्मक दृष्टिकोनातून साकारलेल्या चित्राने परीक्षकांची मने जिंकली. तिच्या या यशामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.अर्णवीचे वडील अविनाश गंजीवाले हे शिक्षक असून त्यांना चित्रकलेची विशेष आवड आहे. आपल्या यशाचे श्रेय तिने आई-वडील तसेच मार्गदर्शन करणाऱ्या सर्व गुरुजनांना दिले आहे.अर्णवीच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून तिच्या पुढील शैक्षणिक व कलात्मक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



मंत्री जयकुमार गोरे यांचा दौरा

अमरावती- ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे हे शनिवार, २१ नोव्हेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.या दौऱ्यानुसार, मंत्री गोरे यांचे सकाळी १० वाजता अमरावती (बेलोरा) विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय येथे सकाळी १०.१५ वाजता 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६' विभागस्तरीय पुरस्कार वितरण व कार्यशाळेस उपस्थित राहतील. कार्यक्रमानंतर दुपारी २ वाजता ते बेलोरा विमानतळाकडे रवाना होतील. दुपारी २.१५ वाजता विमानाने पुण्याकडे प्रयाण करतील.



आडनदी जलविद्युत प्रकल्पाच्या सर्वेक्षणासाठी परवानगा

अमरावती- मेळघाट प्रादेशिक वनविभाग, परतवाडा अंतर्गत घटांग वनपरिक्षेत्रातील आडनदी येथे प्रस्तावित 'अदानी पंप स्टोरेज हायड्रोइलेक्ट्रिक प्रोजेक्ट'साठी केवळ प्राथमिक सर्वेक्षण व भू-तांत्रिक तपासणीपुरती परवानगी देण्यात आली असून, कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करण्यास परवानगी दिलेली नाही, तसेच अद्याप वनजमीन वळती करण्यात आली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. आडनदी येथील प्रस्तावित प्रकल्प क्षेत्रातील वनस्पती व प्राण्यांचे सर्वेक्षण तसेच जिओ-टेक्निकल इन्व्हेस्टीगेशनसाठी २४ ठिकाणी बोअरहोल घेण्याकरीता 'अदानी हायड्रो एनर्जी टेन लिमिटेड'कडून परवानगी मागण्यात आली होती. वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम १९८० आणि वन (संरक्षण एवं संवर्धन) नियम २०२३ मधील मार्गदर्शक तत्त्वानुसार या सर्वेक्षणाला परवानगी देण्यात आली आहे. या परवानगीमध्ये झाडे तोडण्यास कोणतीही मुभा दिलेली नाही. तसेच प्रकल्पासाठी अद्याप कोणतीही वनजमीन वळती करण्यात आलेली नाही. तसेच वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत वनजमीन वळती करण्याचा प्रस्तावही अद्याप प्राप्त झालेला नाही, असे सहायक वनसंरक्षक (कॅम्पा व वन्यजीव) घटांग योगेश तापस यांनी कळविले आहे.

वरिष्ठ सहाय्यक ते सहाय्यक प्रशासन अधिकारी पदोन्नतीत

अमरावती जिल्हा परिषद राज्यात प्रथम



अमरावती/का.प्र.

शासन निर्णयानुसार वरिष्ठ सहाय्यक संवर्गातून थेट सहाय्यक प्रशासन अधिकारी पदावर पदोन्नती देण्याची प्रक्रिया अमरावती जिल्हा परिषदेने राज्यात सर्वप्रथम पूर्ण केली. या प्रक्रियेला प्राधान्य देऊन तातडीने कार्यवाही केल्याबद्दल जिल्हा परिषद लिपिकवर्गीय कर्मचारी संघटना, अमरावतीच्या वतीने प्रशासनाचे आभार मानण्यात आले.

पदोन्नती प्रक्रियेसाठी मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यम गांधी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीराम कुलकर्णी, सहाय्यक प्रशासन अधिकारी निलेश तालन व श्रीकांत मेश्राम तसेच वरिष्ठ सहाय्यक सुजित गावंडे यांचे संघटनेने मनःपूर्वक आभार व्यक्त केले.आभार व व्यक्त करताना सहाय्यक प्रशासन अधिकारी अर्चना मानकर, स्वीय सहाय्यक ज्ञानेश्वर घाटे, सहाय्यक प्रशासन अधिकारी पंकज गुल्हाने, निलेश तालन, श्रीकांत मेश्राम, संजय राठी, विजय कविटकर, लीलाधर नांदे, गजानन इंगळे व विनोद बुटे तसेच वरिष्ठ सहाय्यक सुजित गावंडे व श्रीमती अपर्णा आत्राम उपस्थित होते.यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष पंकज गुल्हाने यांनी पदोन्नती कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना नव्या पदाच्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या.

अचलपूर बाजार समितीत मक्याची आवक

पाच लाख १५ हजार कट्ट्यांचा टप्पा पार

सोयाबीन व गव्हाचीही विक्री

अचलपूर/वार्ताहर

कृषी उत्पन्न बाजार समितीत यंदा मक्याची विक्रमी आवक होत असून, आतापर्यंत पाच लाख १५ हजार कट्ट्यांचा टप्पा पार झाला आहे. गेल्या गुरुवारी (ता. १९ नोव्हेंबर) रोजी एकाच दिवसात ८० हजार कट्टे मक्याची आवक झाली. त्यामुळे बाजार समितीचे आवार शेतमालाने गजबजून गेले होते.यापूर्वी बाजार समितीत चार लाख ६६ हजार कट्टे मक्याची आवक झाली होती. गुरुवारच्या आवकमुळे एकूण आवक पाच लाख १५ हजार कट्ट्यांवर पोहोचली. मक्यासोबतच सोयाबीन ३२ हजार ९६० कट्टे, गहू ११ हजार ७६९ कट्टे, तूर नऊ हजार २६० पोती आणि चण्याची एक हजार ४०० पोत्यांची आवक झाली.



शेतकऱ्यांसाठी केली भोजनाची व्यवस्था

मोठ्या संख्येने शेतकरी शेतमाल विक्रीसाठी येत असल्याने अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने त्यांच्या भोजनाची व्यवस्था केली होती. शेतमालाचे अचूक वजनमाप करून विक्रीचे पैसे वेळेत देण्याची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती प्रभारी सचिव मनोज ठाकरे यांनी दिली.

ट्रॅक्टरच्या रांगा

मक्याची मोठी आवक झाल्याने बाजार समिती परिसरात कट्ट्यांचे ढीग लागले होते. शेतमाल घेऊन आलेल्या ट्रॅक्टर आणि ट्रॅक्टर गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. शेतकऱ्यांचीही मोठी गर्दी झाली होती. बंपर आवकेमुळे दिवसभर बाजार समितीत खरेदी-विक्रीची लगबग सुरू होती.

सोमवारी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

अमरावती/का.प्र.

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २३ नोव्हेंबर रोजी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अमरावती येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात फियाट इंडिया ऑटोमोबाईल प्रा.कंपनी-पुणे मध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून ८७ हून अधिक पदांसाठी संधी मिळणार आहे. तसेच अमरावतीतील जिनस इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मध्ये अमरावती विभागातील ५ जिल्ह्यांमध्ये कायमस्वरूपी ७० हून अधिक पदांची संधी उपलब्ध होणार आहे.कंपनीचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेतील. मुलाखतीमध्ये पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना लगेचच नोकरीची संधी दिली जाणार आहे.१८ ते २४ वर्षांच्या पुरुष व महिला उमेदवारांसाठी ही संधी असून उमेदवार १२ वी आणि आयटीआय उत्तीर्ण (सर्व ट्रेड उत्तीर्ण उमेदवारांसाठी संधी) असावा. निवड झालेल्या उमेदवारास १८ हजार ८५० रुपये मासिक विद्यावेतन देण्यात येईल.यासोबतच वाहतूक व्यवस्था,कँटिन,गणवेश आणि शेफ्टीशुज अशा सुविधा पुरविण्यात येणार आहे.मेळाव्यात अमरावतीतील जिनस इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.मध्ये अमरावती विभागातील अमरावती,अकोला,वाशिम,यवतमाळ आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये कायमस्वरूपी ७० हून अधिक पदांसाठी नेमणूक करण्यात येईल. कंपनीचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेतील. मुलाखतीमध्ये पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मीटर बसविण्यासाठी कायमस्वरुपी नोकरीची संधी दिली जाणार आहे.इच्छुक उमेदवारांनी २३ नोव्हेंबर रोजी स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट साईझ फोटो आणि सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसह (व छायांकित प्रतींसह) केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे. याबाबत काही अडचण किंवा अधिक माहिती माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ / ८३०८९५६२३६ / ७६२०५६०१२५ / ८६०५६५४०२५ वर तसेच amravatirojgar@gmail.com या ईमेलवर संपर्क साधता येणार आहे.

आईला वेळेवर उपचार मिळाला नाही, म्हणून लेकाने आणली रुग्णवाहिका

संदीप देशमुख यांच्या प्रेरणादायी उपक्रमाचे अंजनगावात कौतुक



अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

जन्मदाती आई आपल्या सदैव स्मरणात राहील, या भावनेतून साईधाम नगरातील सामाजिक कार्यकर्ते संदीप देशमुख यांनी एक प्रेरणादायी उपक्रम राबविला आहे. आपली मातोश्री स्व. मनोरमा देशमुख यांना वेळेवर उपचार मिळाला नाही, ही खंत मनात ठेवून त्यांनी आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ शहरातील व परिसरातील गरीब व गरजू रुग्णांसाठी ना नफा ना तोटा तत्वावर रुग्णवाहिका सेवा सुरू केली आहे.

रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा, हा उद्देश ठेवून केलेल्या या कार्याबद्दल साईधाम नगरातील रहिवाशांच्या वतीने देशमुख परिवाराचा भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता.या सत्कार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कौस्तुभ पाटील उपस्थित होते. तर नगरातील जेष्ठ शेतकरी संघटनेचे नेते दिनेशराव ब्राह्मणकर हे कार्यक्रमाचे आयोजक होते.यावेळी नगरातील सचिन अब्रुक, संजय टाले, डॉ. शोण देशमुख, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. अमोल ब्राह्मणकर, सतिश घडेकार, विलासराव पिपळकर, नितीन काळे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. तसेच शहरातील मेळघाट ब्लड बँकचे संचालक डॉ. दत्ता पाटील मानवतकर डॉ साकिब शेख डॉ मयुर अरबट चंद्रकुमार चौखडे, संदिप श्रीवास्तव, आशिष गांधी, सुरेश खेरडे, सौदागर, अक्षय तायडे,हे देखील यावेळी उपस्थित होते.कार्यक्रमात बोलताना सामाजिक कार्यकर्ते संदीप देशमुख यांनी रुग्णवाहिका आणण्यामागील भावना व्यक्त केली. आपल्या आईच्या स्मृती जपण्यासाठी आणि अंजनगाव शहरातील व परिसरातील कोणत्याही रुग्णाला वेळेवर उपचारापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी ही सेवा सुरू केल्याचे त्यांनी सांगितले. साईधाम नगरातील रहिवाशांनी देशमुख परिवाराचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनीही संदीप देशमुख यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉ. गणेशराव खारकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळा

सामाजिक एकोपा, स्नेह आणि कर्तृत्वाचा गौरव



अमरावती/का.प्र.

जाती-धर्माच्या सीमा ओलांडून सामाजिक एकोपा आणि स्नेहबंध दृढ करणारा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सचिव,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी उपमहापौर डॉ. गणेशराव खारकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा व स्नेहीजन मेळावा गणेश कॉलनी येथे उत्साहात पार पडला. यावेळी विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सर्व समाजघटकांतील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला आ.सुलभा खोडके, माजी मंत्री सुनील देशमुख,माजी महापौर विलास इंगोले, ॲड. किशोर शेळके,अविनाश मार्डीकर,पोलीस उपायुक्त दिलीप वडगावकर,उपमहापौर सचिन भेंडे,ॲड.प्रशांत देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील राजकीय,सामाजिक,शैक्षणिक आणि व्यावसायिक मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.यावेळी आ.सुलभा खोडके यांनी डॉ. खारकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव करून त्यांचे मार्गदर्शन भावी पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. सर्वशाखीय माळी समाज ऋणानुबंध परिवाराच्या वतीने डॉ. गणेशराव खारकर व अरुणा खारकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि महात्मा फुले दाम्पत्याची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे 'वऱ्हाड विकासस्था' डॉ. खारकर गौरव अंकाचे लोकार्पण.यावेळी भीमप्रकाश कोबाडकर, रामकृष्ण रेवरे,डी.एस. यावतकर, वसंतराव झडके, डॉ. राधेश्याम बहादूरे, गुणवंत राऊत, सतीश मेहरे,श्रीकृष्ण बोबडे, प्रभाकर सुकळकर,अरुण बेलसरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.सुरसंगीत कराओके क्लबच्या गायकांनी सुमधुर गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे संचालन बनसोड आणि पत्रकार कंचन मुरके यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन तुषार खारकर, प्रियंका खारकर आणि अभिजित खारकर यांनी केले. सामाजिक बांधिलकी, स्नेह आणि कर्तृत्वाचा गौरव करणारा हा सोहळा उत्साहात झाला.

महावितरणच्या 'अभय योजनेचा' रथ यात्रेतून जागर

जिल्ह्यातील ८१ हजार ५८९ ग्राहकांना १३ कोटीची माफी

अमरावती/का.प्र.

महावितरणने कायम स्वरूपी तसेच तात्पूरता वीज पुरवठा खंडित असलेल्या थकबाकीदार वीज ग्राहकांना थकीत वीज बिलातून कायमस्वरूपी मुक्त करण्यासाठी जाहिर केलेल्या 'अभय योजना २०२६' चे जागर करण्यासाठी काढण्यात येणाऱ्या 'अभय योजना' रथ यात्रेचा शुभारंभ मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी हिरवी झेंडी दाखवून केला. यावेळी नांदगाव पेठ ग्रामपंचायतीने १ लाख ५८ हजार रूपये भरून पथदिव्याच्या दोन वीज जोडण्याच्या व्याज आणि विलंब आकारात तब्बल ३ लाख ६१ हजार रूपयाची सुट मिळवली.



कार्यकारी अभियंता बिपीन श्रीराव यांच्या पुढाकारातून विद्युत भवन येथून सुरूवात झालेली अभय योजना प्रचार रथ यात्रा शहर आणि परिसरातील भागातून मार्गक्रमण करणार आहे. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे, संजय शृंगारे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहीर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक सुर्यकांत फलटणकर, विकास बांबल यांची उपस्थिती होती.

'अभय योजना' ६ नोव्हेंबर २०२६ ते १५ जानेवारी २०२७ या कालावधीत अमलात आहे. यादरम्यान ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या उच्च व लघुदाब वर्गवारीमधील थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित झाला आहे, असे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी ग्राहक (शेती व सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना वगळून) तसेच दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेले ग्राहक या योजनेसाठी पात्र आहेत.

योजनेच्या अंतर्गत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. तसेच उर्वरित मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास त्यात आणखी २० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. ग्राहकांना मूळ थकबाकी एकाच वेळी किंवा हप्त्यांनी भरण्याची सुविधा असून, लघुदाब ग्राहकांना ५० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित रकमेसाठी ६ समान व्याजमुक्त मासिक हप्ते तर उच्चदाब ग्राहकांना ३ ते ६ हप्त्यांची सुविधा उपलब्ध असेल. याशिवाय, मंजूर भार २० किलोवॉटपर्यंत असलेल्या ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी 'प्रीपेड स्मार्ट मीटर'चा पर्याय निवडल्यास मूळ थकबाकीमध्ये अतिरिक्त ५ टक्के सवलत मिळणार असून पुनर्जोडणी आणि सर्व्हिस कनेक्शन शुल्क पूर्णपणे माफ केले जाईल.

जिल्ह्यात या योजनेसाठी ८१ हजार ५९८ वीज ग्राहक थकबाकीमुक्तीसाठी पात्र असून लाभ घेतल्यास या ग्राहकांना ८१ लाखाचे विलंब आकार आणि १२ कोटी ३५ लाख रूपयाचे व्याज शंभर टक्के माफी होणार आहे. यासोबतच एक रकमी थकबाकी भरल्यास २० टक्क्यापर्यंतची अतिरिक्त सुट मिळणार आहे.

एआय युगात नोकरी आणि आयुष्याचा खरा अर्थ..

'एआय' मुळे आयटी क्षेत्रावर येणारे संकट १० वर्षे आधीच आले आहे.एआय चा परिणाम केवळ आयटी क्षेत्रावरच नाही, तर अन्य सर्वच क्षेत्रांवर कमी जास्त प्रमाणात होणार आहे, हे नक्की.त्याच पार्श्वभूमीवर आजच्या एआय युगात नोकरी आणि आयुष्याचा खरा अर्थ सांगणारी ही सत्यकथा...



शेवटचे स्टँडअप (The Last Standup) मी हे आजपर्यंत कोणालाही सांगितलेले नाही, म्हणूनच नाव लपवून इथे लिहीत आहे.तसेही माझ्या नावाने काही फरक पडत नाही.आयटी क्षेत्रात ११ वर्षे घालवल्यानंतर एक गोष्ट कळली की इथे नावाला किंमत नसते, तर तुमच्या 'एम्प्लॉयी आयडी'ला (Employee ID) किंमत असते.

माझा आयडी होता ४०३१८ (४०३१८). हा नंबर लक्षात ठेवा.२०१३ मध्ये मी पुण्यातील एका मध्यम आकाराच्या सर्व्हिसेस कंपनीत रुजू झालो. माझ्या इंजिनिअरिंगच्या शिक्षणासाठी वडिलांनी बिहारमधील त्यांची गव्हाची शेती विकली होती. जेव्हा मला माझे पहिले 'ऑफर लेटर' मिळाले,तेव्हा त्यांनी ते एखाद्या जमिनीच्या सातबाऱ्यासारखे जपून हातात धरले होते. त्यांना इंग्रजी फारसे वाचता येत नव्हते, पण ते कंपनीच्या लोगोवरून पुन्हा पुन्हा आपला अंगठा फिरवत होते.

ते म्हणाले, 'बेटा, अब सब ठीक हो जाएगा.' (बाळा, आता सगळे ठीक होईल.)

मी त्यांच्यावर विश्वास ठेवला. का ठेवू नये?

यशाची चढण...??

सुरुवातीची ती वर्षे खूप सुंदर होती. मी रात्रंदिवस काम केले, पहाटे ३ वाजता मॅगी खाऊन काम शिकलो.२०१८ पर्यंत मी 'टीम लीड' झालो.२०२१ पर्यंत मी १४ जणांच्या टीमचा मॅनेजर बनलो. हिंजवडीमध्ये स्वतःचा फ्लॅट, अभिमानाने भरणारे हप्ते (EMI) आणि पार्किंगमध्ये उभी असलेली क्रेटा कार..सगळे काही मिळवले.

माझी आई नातेवाईकांना अभिमानाने सांगायची, 'माझा मुलगा MNC मध्ये मॅनेजर आहे.'

मी आठवड्याच्या दिवसांत वडिलांना फोन करणे बंद केले. 'खूप कामात आहे', हेच माझे उत्तर असायचे. स्प्रिंट डेडलाईन्स, क्लायंटचे प्रश्न आणि मध्यरात्रीचे रिलीज यांत मी गुरफटून गेलो. खरे तर,लोकांना माझी गरज आहे ही भावना मला आवडू लागली होती. स्लॅकवर (Slack) येणारा प्रत्येक मेसेज मला मी कोणीतरी खास असल्याची जाणीव करून द्यायचा.

पहिला तडा...२०२३ च्या सुरुवातीला एका क्लायंटने आम्हाला 'एआय प्रोडक्टिव्हिटी' वापरून पाहण्यास सांगितले. मॅनेजमेंटने ते खूपच उत्साहवर्धक असल्यासारखे मांडले. आम्ही एक पायलट प्रोजेक्ट सुरू केला, ज्यात काही डेव्हलपर्सनी एआय कोडिंग असिस्टंटचा वापर केला.

माझ्या हाताखाली काम करणाऱ्या प्रियाला अनुभव फक्त ३ वर्षांचा होता. पण तिने एआय च्या मदतीने एक काम अवघ्या २ दिवसांत पूर्ण केले,ज्याला मी स्वतः २ आठवड्यांचा वेळ दिला असता.तिच्या कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहून माझ्या पोटात भीतीचा गोळा उठला.

मी चेहऱ्यावर हसू आणून तिला 'छान काम केलंस' म्हटले. पण लगेच वॉशरूममध्ये जाऊन दहा मिनिटे स्तब्ध उभा राहिलो. त्या रात्री मी माझी पत्नी नेहाला म्हणालो, 'हे फक्त एक टूल आहे. टूल्स कधीच माणसांची जागा घेऊ शकत नाहीत.' मी इतक्या आत्मविश्वासाने हे बोललो की मला स्वतःलाही ते खरे वाटू लागले.

हळूहळू होणारी पडझड...२०२४ मध्ये नवीन भरती गुपचूप थांबवण्यात आली. कोणीही याची अधिकृत घोषणा केली नाही. नोकरी सोडून गेलेल्यांच्या जागी नवीन लोक घेतले गेले नाहीत. १४ जणांची टीम ११ वर आली आणि नंतर ९ वर.

क्लायंटचे कॉन्ट्रॅक्ट्सही बदलले. आता त्यांना '३० लोक' नको होते, तर त्यांना 'रिझल्ट' हवा होता. कमी माणसे आणि वेगवान डिलिव्हरी.प्रत्येक टाऊन हॉल मीटिंगमध्ये वरिष्ठ अधिकारी एकच गोष्ट सांगायचे,'एआय-फर्स्ट, रिस्किल, अपस्किल, ॲडॉप्ट.'

मी अनेक कोर्सेस केले. बुडणारा माणूस जसा वाचण्यासाठी काहीतरी शोधतो, तशी मी सर्टिफिकेट्स गोळा करू लागलो. प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग, क्लाउड, GenAI... माझी मुलगी झोपल्यावर मी रात्री १ वाजेपर्यंत अभ्यास करायचो. मनात विचार यायचा, 'मी ३४ वर्षांचा आहे. मी अजूनही कामाचा आहे, हे सिद्ध करण्याची वेळ माझ्यावर कधी आली?'

ती काळरात्र जी मी कधीच विसरणार नाही...ऑक्टोबर २०२४.माझी ६ वर्षांची मुलगी अनया हिने मला तिच्या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला (Annual Day) येण्यास सांगितले. मी होकार दिला.पण नेमका त्याच संध्याकाळी क्लायंटचा एक महत्त्वाचा कॉल आला. विषय होता 'टीम ऑप्टिमायझेशन'म्हणजेच कोणाची नोकरी काढायची याचा निर्णय.

मी मुलीच्या कार्यक्रमाला न जाता कॉल निवडला. मी अनयाला म्हणालो, 'पप्पा पुढच्या वेळी नक्की येतील.'ती रडली नाही.तिने फक्त मान डोलवली.सहा वर्षांच्या मुलीने इतक्या समजूतदारपणे मान डोलवणे हे खूप वेदनादायी होते.

त्या कॉलमध्ये मला माझ्याच टीममधील ९ जणांना 'एआय द्वारे कोणाची जागा घेतली जाऊ शकते' (AI-replaceability) यानुसार रँक द्यायला सांगितले गेले. माझ्यासमोर ९ नावे होती. ज्यांच्या लग्नाला मी गेलो होतो अशी माणसे. राकेश, ज्याच्या आईला कॅन्सर होता. प्रिया, जिने मला आपला गुरू मानले होते.

मी ते रँकिंग केले. मला याचा अजिबात अभिमान नाही. मी स्वतःची समजूत घातली की मी केले नाही तर दुसरे कोणीतरी करेल आणि ते यापेक्षा वाईट करतील.

रात्री ९:४० वाजता मी लॅपटॉप बंद केला. अनया झोपली होती. तिच्या अंगावर अजूनही डान्सचा पोशाख होता आणि गालावरची चमक (glitter) अर्धवट पुसली गेली होती.

तिच्या शिक्षकांनी मला कार्यक्रमाचा व्हिडिओ पाठवला होता. अंधारात बसून मी तो एकट्याने पाहिला. स्टेजवर नाचताना ती गर्दीत कोणालातरी शोधत होती... आणि जेव्हा तिला कोणीच दिसले नाही, तेव्हा तिचा चेहरा एकदम शांत आणि उदास झाला.

मी पार्किंगमध्ये जाऊन माझ्या गाडीत बसून एक तास ढसाढसा रडलो. एका भित्र्या माणसासारखा.

पतन (The Fall)...मार्च २०२५ मध्ये त्यांनी याला 'रोल रिअलाईनमेंट' (Role Realignment) असे गोंडस नाव दिले.

टीम्सवर (Teams) १५ मिनिटांचे एक इन्व्हाईट आले.. 'क्विक सिंक'. समोर HR, माझे डायरेक्टर आणि एक अनोळखी व्यक्ती होती.माझे डायरेक्टर माझ्याशी नजर मिळवू शकत नव्हते. मी त्यांच्या हाताखाली ८ वर्षे काम केले होते. नेहाची प्रसूती कळा सुरू झाल्यावर पहाटे ४ वाजता त्यांनीच मला गाडीतून हॉस्पिटलला नेले होते.

ते म्हणाले, 'तुमच्या पदावर याचा परिणाम होत आहे (Your role is being impacted).''परिणाम'... जणू काही मी पुराचा फटका बसलेले एखादे गाव होतो.त्यांनी मला एक पॅकेज दिले आणि सही करण्यासाठी वेळ दिला. मी कॉल सोडण्यापूर्वीच माझा सिस्टीम सक्सेस बंद करण्यात आला. वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच माझा लॅपटॉप काळा पडला. माझ्या टीमचा निरोप घेण्यासाठी मी लॉगिन करण्याचा प्रयत्न केला, पण माझा आयडी आधीच डिलीट झाला होता.

४०३१८ चे अस्तित्व संपले होते.

अकरा वर्षांची मेहनत... भात शिजायला जेवढा वेळ लागतो, तेवढ्या वेळात संपून गेली.

आयुष्याचा सर्वात कठीण टप्पा...मी १९ दिवस माझ्या घरच्यांना काहीही सांगितले नाही.दररोज सकाळी मी इस्त्रीचा शर्ट घालायचो, अनयाचा मुका घ्यायचो, बॅग उचलायचो आणि हायवेजवळच्या एका कॅफेमध्ये जाऊन बसायचो. संध्याकाळपर्यंत तिथे बसून नोकरीसाठी अर्ज करायचो. संध्याकाळी ७ वाजता घरी येऊन म्हणायचो, 'आज खूप दगदग झाली.'

क्रेटाचा हप्ता, फ्लॅटचा हप्ता, अनयाची शाळेची फी. मोबाईलवर येणारे प्रत्येक नोटिफिकेशन हातोड्याच्या घावासारखे वाटायचे.

३०० ठिकाणी अर्ज केले. फक्त ११ ठिकाणांहून उत्तर आले, आणि तेही नकारार्थी. एका रिक्रूटरने प्रामाणिकपणे सत्य सांगितले.. 'सर, तुम्ही ज्या पदासाठी शोधत आहात, ती पदे आता राहिलेली नाहीत. कंपन्यांना आता तीन लोकांचे काम करणाऱ्या एकाच माणसाची गरज आहे.'

१९ व्या दिवशी नेहाने माझा पाठलाग केला. तिला संशय आला होता, कारण मी कामाचा ताण घेणे बंद केले होते. मी मॅनेजरबद्दल तक्रार करणे बंद केले होते.तिने मला त्या कॅफेमध्ये एका थंड झालेल्या चहाच्या कपाकडे एकटक पाहताना पकडले. ती ओरडली नाही. ती शेजारी बसली, माझा हात हातात घेतला आणि म्हणाली:

'तुम अकेले इतना बोझ क्यों उठा रहे थे?' (तू एकटाच इतकं ओझं का वाहत होतास?)

मी त्या अनोळखी लोकांसमोर लहान मुलासारखा रडलो.

तो भीतीदायक फोन कॉल... त्या रात्री मी वडिलांना फोन केला. मी अनेक महिन्यांत त्यांच्याशी नीट बोललो नव्हतो. मला खूप भीती वाटत होती. याच माणसाने माझ्या 'सुरक्षित भविष्यासाठी' आपली जमीन विकली होती.

मी त्यांना सर्व काही सांगितले. नोकरी गेल्याचे, खोटे बोलल्याचे, हप्त्यांचे आणि मला वाटणाऱ्या लाजेचे.

पलीकडून इतका वेळ शांतता होती की मला वाटले फोन कट झाला.

मग ते म्हणाले:

'बेटा, जब मैं खेती करता था, तो कभी बारिश नहीं होती थी, कभी बाढ़ आ जाती थी. फसल हर साल नहीं बचती. पर ज़मीन हमेशा रहती है.'

(बाळा, जेव्हा मी शेती करायचो, तेव्हा कधी पाऊस पडायचा नाही, तर कधी पूर यायचा. पीक दरवर्षी वाचत नाही. पण जमीन कायम तिथेच राहते.)

'तू ज़मीन है, बेटा. नौकरी फसल थी.' (तू जमीन आहेस बाळा, नोकरी तर फक्त एक पीक होते.)

मी अनेक वर्षे मॅनेजर होतो. शेकडो मोटिव्हेशनल पुस्तके वाचली होती. पण पाचवी पास असलेल्या एका माणसाच्या या एका वाक्याने माझे संपूर्ण आयुष्य बदलून टाकले.

नव्याने उभारी (The Rebuild)...हे एखाद्या चित्रपटासारखे सोपे नव्हते. ते खूप कठीण आणि संथ होते.

मी क्रेटा गाडी विकली. मी नेहाला सांगितले की आपण लहान फ्लॅटमध्ये राहायला जाऊया. ती म्हणाली, 'मला घर हवे आहे, हप्त्यांचे स्टेटस नाही.'

मला आता फक्त पगारासाठी नोकरी नको होती. ज्या गोष्टीने माझी जागा घेतली होती, तिला मला मुळापासून समजून घ्यायचे होते. म्हणून मी एआय शी लढणे थांबवले आणि ते नीट शिकायला सुरुवात केली. यावेळी सर्टिफिकेटसाठी नाही, तर काहीतरी निर्माण करण्यासाठी.

मी माझ्या शहरातील लहान व्यावसायिकांना त्यांची कंटाळवाणी कामे ऑटोमेट (Automate) करून देण्यास मदत करू लागलो. स्थानिक दवाखाने, एक कापड निर्यातदार, एक कोचिंग क्लास. सुरुवातीला कोणीही जास्त पैसे देत नव्हते. एका क्लायंटने मला ८,००० दिले आणि मी दहा मिनिटे त्या मेसेजकडे पाहत बसलो. जुन्या नोकरीत मी एका तासात यापेक्षा जास्त कमावायचो, पण हे पैसे माझे स्वतःचे होते.

मला एक गोष्ट लक्षात आली एआय माझ्यापेक्षा वेगाने कोड लिहू शकते. पण ते एखाद्या घाबरलेल्या दुकानदारासोबत बसून त्याला तंत्रज्ञानाची भीती का वाटते, हे समजू शकत नाही. एआयला माणसांच्या भावना वाचता येत नाहीत. आणि हेच तर माझे खरे काम होते, जे मी आजपर्यंत तिकीट नंबर्स आणि स्टेटस रिपोर्ट्सच्या खाली गाडून टाकले होते.

आज मी कुठे आहे... या गोष्टीला १८ महिने झाले आहेत. मी श्रीमंत नाही. मी कोणी मोठा 'थॉट लीडर' नाही. मी दोन पार्ट-टाईम सहकाऱ्यांसोबत एक छोटी कन्सल्टिंग फर्म चालवतो. त्यापैकी एक आहे प्रिया तीच ज्युनियर, जिला मी एकेकाळी त्या यादीत रँक केले होते.

तिला त्या रँकिंगबद्दल समजले होते. ती माझ्या घरी आली तेव्हा मला वाटले ती मला जाब विचारेल. पण ती म्हणाली, 'सर, तुमच्याकडे दुसरा पर्याय नव्हता हे मला तेव्हाही माहित होते. पण तुम्ही माझ्याशी कधीच खोटे बोलला नाहीत, याबद्दल धन्यवाद.'

मी पुन्हा रडलो. हल्ली मी खूप रडतो.

गेल्या महिन्यात मी अनयाच्या शाळेच्या स्नेहसंमेलनाला गेलो होतो. तिसऱ्या रांगेत बसलो होतो, फोन बंद करून.

ती स्टेजवर नाचली. तिने गर्दीत नजर फिरवली. तिला मी दिसलो.

आणि यावेळी तिचा चेहरा उदास झाला नाही.

मला तुम्हाला हेच सांगायचे आहे... जर तुम्ही आयटी क्षेत्रात असाल आणि मध्यरात्री पोटात भीतीचा गोळा घेऊन हे वाचत असाल, तर मी अनुभवातून शिकलेल्या या गोष्टी लक्षात ठेवा:

तुमचा एम्प्लॉयी आयडी ही तुमची ओळख नाही. माझा आयडी १५ मिनिटांत डिलीट झाला, पण मी अजूनही जिवंत आहे.

दुःख एकट्याने सहन करू नका. लाजेपोटी मी माझे १९ दिवस वाया घालवले, जे कधीच परत येणार नाहीत.

एआय शी लढू नका आणि त्याची पूजाही करू नका. ते शिका, आणि मग ती मानवी कामे करा जी एआय करू शकत नाही...निर्णयक्षमता, सहानुभूती, विश्वास आणि जबाबदारी.

आई-वडिलांना फोन करा. सुट्टीच्या दिवशी वेळ मिळेल तेव्हा नाही, तर आत्ताच करा.

जी माणसे महत्त्वाची आहेत, तीच सोबत राहतील. बाकीचे सर्व फक्त पीक होते.

मला आजही कधीकधी जुन्या आयुष्याची आठवण येते. ते कॅन्टीन, शुक्रवारचे जेवण, मोठ्या कंपनीचा भाग असण्याची भावना. पण मुलीच्या स्टेजवरील हास्यापेक्षा क्लायंटच्या कॉलला महत्त्व देणारा तो जुना माणूस मला पुन्हा व्हायचे नाही.

जर ही कथा तुमच्या मनाला भिडली असेल, तर आयटीमध्ये गुपचूप संघर्ष करणाऱ्या एका मित्रासोबत ती नक्की शेअर करा. कदाचित तोही माझ्यासारखाच सर्व काही ठीक असल्याचे नाटक करत असेल.

कारण कुठेतरी, एका कॅफेमध्ये इस्त्रीचा शर्ट घातलेला एक माणूस थंड झालेल्या चहाच्या कपासमोर बसला असेल आणि कोणालाही काही सांगत नसेल...त्याला सांगा की तो एकटा नाही.(साभार व्हॉट्स ॲप)

मूळ लेखक-अज्ञात

उठा पांडुरंगा,दर्शन द्या सकळा!

आषाढी एकादशीपासून सुरू झालेल्या चातुर्मासाची सांगता कार्तिकी एकादशीला, अर्थात देवउठणी एकादशीला होते. चार महिन्यांच्या विश्रांतीनंतर भगवान विष्णू योगनिद्रेतून जागे होतात,अशी धार्मिक श्रद्धा आहे.त्यामुळे या एकादशीला केवळ धार्मिक विधींचे नव्हे, तर भक्ती,श्रद्धा आणि नवचैतन्याचेही विशेष महत्त्व आहे.

'उठा पांडुरंगा, दर्शन द्या सकळा' हा भक्तिभावाने ओथंबलेला आर्त स्वर याच दिवशी वारकरी संप्रदायाच्या मनामनांतून उमटतो. या काळात कोजागिरी पौर्णिमेपासून ते कार्तिकी पौर्णिमेपर्यंत, भल्या पहाटे मंदिरातून काकड आरती व विठू नामाच्या गजरात दिंड्या काढल्या जातात.

आषाढी एकादशीला पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी पायी वारी करतात. टाळ-मृदंगाचा गजर,मुखी हरिनाम आणि खांद्यावर भगवी पताका घेतलेला वारकऱ्यांचा समुदाय भक्तीचा अनुपम सोहळा साकारतो. आषाढीला विठुरायाच्या चरणी लीन झालेला भक्त कार्तिकी एकादशीला पुन्हा त्याच्या भेटीची आस मनात बाळगतो.या दोन



एकादश्यांमधील चार महिन्यांचा काळ म्हणजे आत्मचिंतन, संयम, साधना आणि सदाचाराचा काळ मानला जातो.

चातुर्मासाचे महत्त्व केवळ उपवास, व्रतवैकल्ये आणि धार्मिक कर्मकांडांपुरते मर्यादित नाही.या काळात मनावर संयम ठेवणे, सात्त्विक आहार-विहार करणे, परोपकाराची भावना जोपासणे आणि ईश्वरभक्तीत मन रमविणे अपेक्षित असते. संतांनीही भक्तीचा अर्थ केवळ देवदर्शनापुरता मर्यादित ठेवला नाही. माणसामाणसांत प्रेम,समता, बंधुभाव आणि माणुसकी जपणे, हीच खरी ईश्वरसेवा असल्याचा विचार त्यांनी समाजाला दिला.

कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर पुन्हा एकदा विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून जाते. चंद्रभागेच्या तीरावर स्नान करून विठ्ठलाच्या दर्शनासाठी आतुर झालेले वारकरी आपल्या भक्तीचा उत्कट आविष्कार घडवतात. विठ्ठलाच्या सावळ्या रूपात त्यांना केवळ परमेश्वराचे दर्शन होत नाही, तर जीवनाला दिशा देणारी श्रद्धा आणि संकटांशी लढण्याचे बळही मिळते.

आजच्या धावपळीच्या, स्पर्धेच्या आणि अस्वस्थतेच्या जीवनात चातुर्मासाचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. माणसाने भौतिक सुखांच्या मागे धावताना आपल्या अंतर्मनातील सद्भावना, संवेदना आणि नैतिक मूल्ये हरवू नयेत. देवाला मंदिरात शोधण्याबरोबरच तो दीनदुबळ्यांच्या सेवेत, भुकेल्याला दिलेल्या घासात आणि दुःखितांच्या अश्रूंच्या पुसण्यातही अनुभवता आला पाहिजे.

'उठा पांडुरंगा, दर्शन द्या सकळा' ही केवळ देवाला जागे करण्याची हाक नाही,तर निद्रिस्त झालेल्या माणुसकीला जागे करण्याचेही आवाहन आहे. भक्तीचा हा जागर प्रत्येकाच्या अंतःकरणात सद्विचारांचा दीप प्रज्वलित करो आणि समाजात प्रेम, समता व बंधुभावाची पहाट उजाडो,हीच कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने विठुरायाच्या चरणी प्रार्थना!

पुंडलिक वरदा हरी विठ्ठल!
श्री ज्ञानदेव तुकाराम!

शशिकांत तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
भ्रमणध्वनी:-
९१३०८३५४५८

तुळशी विवाह आणि तुळशीचे अनन्यसाधारण



यंदा २१ नोव्हेंबर २०२६ (कार्तिक शुक्ल द्वादशी) पासून तुळशी विवाहाचा मंगल सोहळा सुरू होत आहे. कार्तिक शुद्ध एकादशीपासून पौर्णिमेपर्यंतच्या काळात साजरा होणारा हा सण आपल्या संस्कृतीतील निसर्गप्रेम, भक्ती आणि परंपरेचा सुंदर संगम दाखवतो.

बाळकृष्णाच्या मूर्तीचा आणि तुळशीचा विवाह लावून देण्याचा हा विधी सहसा सायंकाळी केला जातो. त्याआधीच्या दिवशी तुळशीवृंदावन रंगवून सजवले जाते.ऊस, झेंडूची फुले, चिंचा आणि आवळे यांसारख्या घटकांसह हा सोहळा रंगतदार होतो. तुळशी विवाह पार पडल्यानंतर चातुर्मासातील व्रतांची सांगता होते. चातुर्मासात जे पदार्थ वर्ज्य केलेले असतात, ते दान दिल्यानंतरच पुढे पुन्हा सेवन करण्याची पद्धत आहे.

आपल्या दैनंदिन जीवनात आणि अध्यात्मात तुळशीला मोठे स्थान आहे. तुळशीचे दर्शन, पूजन आणि सेवन केल्याने मनातील वाईट गोष्टी दूर होऊन सकारात्मकता मिळते, अशी श्रद्धा आहे. तुळशीच्या रोपात सर्व देवतांचा वास असतो आणि ती श्रीविष्णूंना अत्यंत प्रिय मानली जाते. तसेच, तुळशीच्या परिसरातील वातावरण पवित्र राहते आणि श्रीविष्णूंच्या नैवेद्यात तुळशीपत्राला विशेष महत्त्व असते.सणांच्या माध्यमातून आपण केवळ परंपरा जपत नाही, तर पर्यावरण आणि निसर्गाप्रती कृतज्ञताही व्यक्त करतो. यंदाच्या तुळशी विवाहाच्या निमित्ताने प्रत्येकाच्या अंगणात आनंदाचे आणि पवित्रतेचे वातावरण नांदो, हीच सदिच्छा.

वर्षा आवदे

वाढदिवसानिमित्त..

बाळासाहेबांच्या विचारांचा पाईक असलेला कट्टर शिवसैनिक-निरज नागे



शिवसेनेचे प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा पाईक व कट्टर शिवसैनिक २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण हा ध्यास मनात घेऊन खल्लार सर्कलमधिल उपराई या छोटयाश्या गावाचे माजी सरपंच निरज नागे यांचा आज वाढदिवस.शेतकरी कुटुंबातील, घरात कुठलाही राजकीय वारसा नाही. उपराईसारख्या छोटयाश्या गावात एकसंघ असलेल्या शिवसेनेचे सुरुवातीला शिवसैनिक नंतर शाखाप्रमुख ते दर्यापूर तालुक्याचे उपतालुकाप्रमुख असा राजकीय प्रवास वयाच्या २८ व्या वर्षी ग्रामपंचायत सदस्य व त्याच कालावधीत सरपंच उपराई ग्रामपंचायतच्या इतिहासात सर्वात कमी वयाचा सरपंच त्यांच्या सरपंचपदाच्या कारकिर्दीत गावात मोठया प्रमाणात विकास निधी आणून गावाच्या विकासकामासाठी खर्च केला.घरकुल,गावातील रस्ते, स्मशानभूमी, कब्रस्थान रोड, आयुर्वेदिक दवाखाना व अन्य विकासात्माक कामे केली.उमद्या मनाचा शिवसैनिक असलेले व गोपाल अरबट यांचे खंदे समर्थक असलेले निरज नागे यांच्यावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने खल्लार सर्कलची जबाबदारी सोपविली आहे. निरज नागे याच्याकडून अशीच कामे भविष्यात होत राहावी हिच वाढदिवसानिमित्य सदिच्छा...

युवराज डोंगरे
चंद्रपूर (खल्लार)

■ शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

नाथशक्तीपीठाच्या माध्यमातून सुसंस्कारित पिढी घडविण्याचे कार्य – पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

■ प्रतिनिधी | अकोला ■

सदगुरू नरेंद्रनाथ महाराजांनी अध्यात्माची मांडणी विज्ञान आणि तर्काच्या कसोटीवर केली आहे. नाथशक्तीपीठाच्या माध्यमातून समाजोपयोगी, सदाचारी आणि सकारात्मक जीवनमूल्ये रुजवून सुसंस्कृत पिढी घडविण्याचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.



नाथशक्तीपीठातर्फे नारदीय व वारकरी कीर्तन सप्ताह महोत्सवाचा शुभारंभ पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या उपस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह येथे झाला, त्यावेळी ते बोलत होते. श्रीनाथशक्ती पीठाधीश सदगुरू नरेंद्रनाथ महाराज, स्वागताध्यक्ष न्यायमूर्ती संजय मेहरे, उद्घोजक सिद्धार्थ रूहाटिया, राम हरी पाटील, सीए अनिरूद्ध चौधरी, डॉ. श्रीकांत शास्त्री गदाधर, रामेश्वर फुंडकर, हभप डॉ. अजय अपमार्जने आदी उपस्थित होते. समाजमाध्यमांच्या आजच्या काळात युवकांना प्रबोधनाच्या माध्यमातून राष्ट्रीय कार्याकडे वळविण्यासाठी कीर्तन हे सशक्त माध्यम आहे.

त्यादृष्टीने नाथशक्तीपीठाद्वारे आयोजित नारदीय व वारकरी कीर्तन सप्ताहाचा उपक्रम अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी यावेळी सांगितले. श्री. रूहाटिया यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मंत्रपठण, प्रार्थना व संतांच्या प्रतिमेचे पूजन झाले.

सलाईनमधून इंजेक्शन दिले अन् दहा महिन्यांच्या खुशीचा मृत्यू!

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■



नातेवाईकांचा संतप्त आक्रोश; उपचार पद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह, डॉक्टरांकडून निष्काळजीपणाचा आरोप फेटाळला

खोकला, सर्दी आणि छातीत कफ झाल्याने उपचारासाठी दाखल केलेल्या अवघ्या दहा महिन्यांच्या चिमुकलीचा खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना मूर्तिजापुरात घडली. सलाईनमधून पिवळ्या रंगाचे इंजेक्शन दिल्यानंतर काही वेळातच खुशीची प्रकृती अचानक बिघडली आणि तिचा मृत्यू झाला, असा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेनंतर रुग्णालयात नातेवाईकांनी एकच आक्रोश केला. चिमुकलीचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, उपचारादरम्यान काय घडले आणि याला जबाबदार कोण, असे सवाल उपस्थित होत असून या घटनेने वैद्यकीय उपचारांच्या विश्वासार्हतेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार, कारंजा तालुक्यातील रामगाव (रामेश्वर) येथील अंजली आणि अजय जाधव यांची दहा महिन्यांची मुलगी खुशी हिला सर्दी, खोकला व छातीत कफ झाल्याने १९ नोव्हेंबर रोजी मूर्तिजापूर येथील अवघाते बाल रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले होते. तपासणीनंतर डॉ. प्रशांत अवघाते यांनी तिला रुग्णालयात दाखल करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार खुशीला रुग्णालयात दाखल करून उपचार सुरू करण्यात आले.

मात्र, २० नोव्हेंबर रोजी दुपारी घडलेल्या घटनेने जाधव कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. नातेवाईकांच्या आरोपानुसार, खुशीची प्रकृती ठीक असल्याचे दिसत असतानाच तिला सलाईन लावण्यात आले. त्यानंतर सलाईनमधून पिवळ्या रंगाचे इंजेक्शन देण्यात आले. इंजेक्शन दिल्यानंतर अचानक खुशीने हातपाय वाकडे केले आणि काही क्षणांतच तिचा मृत्यू झाला. या अनपेक्षित घटनेमुळे कुटुंबीयांना मोठा धक्का बसला.

औषध कोणते दिले, मृत्यूचे कारण काय?

सलाईनमधून नेमके कोणते औषध देण्यात आले? इंजेक्शन दिल्यानंतर चिमुकलीची प्रकृती अचानक का बिघडली? उपचारादरम्यान काही निष्काळजीपणा झाला का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे नातेवाईकांकडून मागितली जात आहेत. रुग्णालय प्रशासनाने मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट करावे, अशी मागणीही त्यांनी केली. चिमुकलीचे काका प्रमोद जाधव यांनी सांगितले की, १९ नोव्हेंबर रोजी खुशीला उपचारासाठी रुग्णालयात आणले होते. २० नोव्हेंबर रोजी डॉक्टर तपासणी करून गेल्यानंतर काही वेळातच मुलीने जीव सोडला. आमच्या बाळाचा मृत्यू कशामुळे झाला, याची माहिती आम्हाला देण्यात यावी. तसेच, माझ्या भावाकडून बळजबरीने कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

डॉक्टरांकडून निष्काळजीपणा नसल्याचा दावा

दरम्यान, डॉ. प्रशांत अवघाते यांनी खुशीला निमोनिया झाल्यामुळे १९ नोव्हेंबर रोजी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगितले. तिच्यावर उपचार सुरू होते. मात्र, दुपारी अचानक बाळ श्वास घेत नसल्याची माहिती मिळताच तिला वाचविण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्यात आले. निमोनियादरम्यान शरीरात गंभीर गुंतागुंत निर्माण होऊ शकते. ही घटना अचानक कशी घडली, याचे निदान सांगणे कठीण आहे. उपचारादरम्यान कोणताही निष्काळजीपणा झालेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

पोलिसांची घटनास्थळी धाव

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार धर्मेंद्र जोशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी आणि पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वानखडे यांच्यासह पोलीस पथक रुग्णालयात दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती हाताळली. नातेवाईकांकडून कारवाईची मागणी होत असली, तरी वृत्त लिहिपर्यंत शहर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली नव्हती. दहा महिन्यांच्या चिमुकलीचा मृत्यू आणि त्यानंतर नातेवाईकांनी केलेले आरोप यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. मृत्यूचे नेमके कारण, उपचारादरम्यान वापरण्यात आलेली औषधे आणि वैद्यकीय उपचारांची प्रक्रिया यांची वस्तुनिष्ठ तपासणी झाल्यासच या घटनेमागील सत्य समोर येऊ शकणार आहे.

आलेगाव परिसरात जुगार, हातभट्टी अड्ड्यांवर छापे

■ प्रतिनिधी | अकोला ■



तिहेरी कारवाईत १ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त; सहा आरोपी ताब्यात

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने आलेगाव परिसरातील अवैध धंद्यांविरोधात धडक मोहीम राबविली. या मोहिमेत जुगार आणि गावठी हातभट्टी दारूच्या अड्ड्यांवर एकाच दिवशी तीन ठिकाणी छापे टाकून सहा आरोपींना ताब्यात घेण्यात आले. या कारवाईत एकूण १ लाख ४४ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त व नष्ट करण्यात आला.

पहिल्या कारवाईत आलेगाव येथील चक्रधर स्वामी मंदिराजवळ तीन पानी पत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या किरण तेलगोटे, अनंत गिरे आणि देवनाथ तेलगोटे यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांच्याकडून रोख रकमेसह मोबाईल व पत्ते असा १३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.दुसऱ्या कारवाईत निर्गुणा नदीपात्रात गावठी दारू गाळणाऱ्या निसार खॉ जावेद खॉ याच्याकडून २० लिटर दारू व ३७५ लिटर सडवा मोहाचा असा ७० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून नष्ट करण्यात आला.

या प्रकरणी चान्नी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार अधिनियम व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक डॉ. निलेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, उपनिरीक्षक अनिल चव्हाण व पथकाने केली.

संविधान सन्मान महासभेसाठी अकोटमधून शेकडो कार्यकर्ते मुंबईला रवाना होणार!



■ प्रतिनिधी | अकोट ■

मुंबई येथे २५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'संविधान सन्मान महासभे'त सहभागी होण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या अकोट तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचा निर्धार केला आहे. यासंदर्भात आघाडीच्या वतीने आयोजित नियोजन बैठकीत महासभेच्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

महासभेसाठी अकोट तालुक्यातून कार्यकर्ते सहभागी होणार असून, २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मुंबईकडे प्रस्थान करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कार्यकर्त्यांची वाहतूक, निवास व्यवस्था, बॅनर-पोस्टर्स तसेच महासभेच्या ठिकाणी शिस्तबद्ध संचलन यासह विविध बाबींवर बैठकीत चर्चा करण्यात आली. अकोट तालुक्यातून महासभेला मोठी उपस्थिती राहील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या नियोजन बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे अकोला जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, महिला जिल्हाध्यक्षा अमपालीताई खंडारे, तालुकाध्यक्ष चरण इंगळे, तालुका महासचिव रोशन पुंडकर, सुरेंद्र औइबे, प्रसिद्धीप्रमुख स्वप्निल सरकटे, गोपाल ढोरे, संदेश घनबहादुर, विकी वानखडे, संभा थोरात, विकी तेलगोटे, लखन इंगळे, दीपक तेलगोटे, विकी धांडे, इम्रान पठाण, सुनील घनबहादुर, स्वाती चिखले, प्रतीक तेलगोटे, सुनीता वानखडे, मंदाताई कोल्हे, कल्पना भटकर, मंगला खांडेकर, अर्चना वानखडे, दिनेश धांडे, निरंजन गावडे, सचिन सरकटे, निखिल गावडे, रंजित सरकटे, प्रेमराज भटकर, मंगेश चिखले, भीमराव तायडे, नितीन वाघ, सदानंद सिरसाट, नितीन वानखडे, अनिल पोतले, तुषार पाचकोर, धीरज सिरसाट, नवनीत तेलगोटे, अतुल अढाऊ, विनोद धांडे, दादू निताळे, माणिक इंगळे, स्वप्निल दहिभात, मुश्ताक पटेल, आशिष रायभोले तसेच नगरसेविका लताताई कांबळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

सव्वा किलो गांजासह ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■



उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पथकाची कारवाई; एकाला अटक

'ऑपरेशन प्रहार-नार्को स्ट्राईक' अंतर्गत अंमली पदार्थ तस्करांविरुद्ध कारवाई करत उपविभागीय पोलीस अधिकारी अकोला शहर यांच्या विशेष पथकाने खटाऊ जिन, राजेश्वर सेतू परिसरात छापा टाकून १.२ किलो गांजा जप्त केला. या कारवाईत ४५ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

१९ नोव्हेंबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष ही कारवाई केली. यावेळी सागर देवराव घनबहादूर (३७, रा. खोलेश्वर, अकोला) याच्याकडून ३० हजार रुपये किमतीचा गांजा, ४६० रुपये रोख आणि १५ हजार रुपये किमतीचा स्मार्टफोन असा एकूण ४५ हजार ४६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २०(ब)(ग)(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक निलेश पांडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक आनंद कांदे, पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप पळसपगार यांच्यासह पोलीस अंमलदार रवि घिवे, विनय जाधव, मोहम्मद नदीम, गोपाल बायस्कर, प्रफुल्ल बांगर, प्रतीक्षा सावरकर आणि नाझिया शेख यांनी ही कारवाई केली.

हारे का सहारा, श्याम हमाराचा महानगरात घुमला गजर

■ प्रतिनिधी | अकोला ■



लाखों भक्तांचे तारणहार श्री श्यामबाबा यांच्या पावन जन्मोत्सवानिमित्त शुक्रवारी महानगरात खाटूचे भगवान श्यामबाबा यांची विराट निशाणयात्रा काढण्यात आली. यात शेकडो महिला-पुरुषांनी हातात रंगबेरंगी ध्वज म्हणजे निशाण घेऊन सहभाग घेतला.

स्थानिक श्री रामदेवबाबा-श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने गीतानगर परिसरातील रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिरात बाबांचा पाच दिवसांचा जन्मोत्सव विविध उपक्रमांसह साजरा केला जात आहे. या जन्मोत्सवात शुक्रवारी सकाळी स्थानिक राणी सती धामहून खाटू नरेश श्यामबाबांची आकर्षक मूर्ती रथात विराजमान करून गीतानगरपर्यंत भव्य निशाणयात्रा काढण्यात आली.ही निशाण यात्रा सिटी कोतवाली परिसरात येताच दाबकी रोडवरील ओल्ड सिटी ग्रुपने रथासोबत निशाणयात्रा काढली. दोन्ही निशाण यात्रांचे संगम होऊन 'हारे का सहारा, श्याम हमारा' आणि श्यामबाबांच्या जयघोषासह ही विराट यात्रा मंदिरापर्यंत पोहोचली.यावेळी महानगरातील दाबकी मार्ग, खोलेश्वर, गोरक्षण रोड, गीतानगर आदी परिसरातूनही अनेक भक्तांनी निशाण घेऊन मोठ्या संख्येने मंदिरात येऊन श्यामबाबांना निशाण अर्पण करून उत्सवात सहभागी झाले.निशाण यात्रेचे समाजातील विविध संस्था व संघटनांनी ठिकठिकाणी स्वागत केले. तसेच जल, पेय आणि फराळाचे वाटप केले. या वितरणात श्याम मित्र मंडळ, बबेरवाल परिवार आदींनी सहभाग घेतला.मंदिरात या उत्सवानिमित्त अखंड ज्योत सजवून बाबांचा अभिषेक, पूजन आणि फुलांचा शृंगार करण्यात आला. महाआरती व अल्पोपहारामुळे उत्सवाला अधिक भव्यता प्राप्त झाली. जन्मोत्सवात मंदिरात श्यामबाबांची अद्भुत झांकी साकार करण्यात आली आहे. भजनकार व कथावाचक पं. उमेश शर्मा डब्बूजी श्याम यांनी अखंड ज्योत पाठाचे वाचन केले, तर भजनकार नेतल शर्मा यांनी संगीतमय भजने सादर केली.

डिजीटल हयात दाखल्याबाबत 'पेन्शनर्स' साठी सोमवारी मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | अकोला ■

निवृत्तीवेतनधारकांना हयातीचा दाखला डिजीटल स्वरूपात सादर करण्यात अडचणी येत असल्यास त्यांनी सोमवारी (२३ नोव्हेंबर) सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालयातील काटेपूर्णा सभागृहात हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारक व कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांनी हयातीचा दाखला डिजीटल स्वरूपात दाखल करण्याचे आवाहन जिल्हा कोषागाराने यापूर्वीच केले आहे. त्यानुसार अनेकांकडून डिजीटल दाखले सादर करण्यात आले. तथापि, काही व्यक्तींना दाखला फिजीकला सादर न करता डिजीटल स्वरूपात सादर करण्यात अडचणी येत असतील तर अशा व्यक्तींसाठी सोमवारी मार्गदर्शन करण्यात येईल.

संबंधित निवृत्तीवेतनधारक, कुटुंब निवृत्तीधारकांनी निवृत्तीवेतनाचे बँक पासबुक, आधारपत्र, तसेच निवृत्तीवेतन प्रदान आदेश क्रमांक घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी माधवराव झुंजारे यांनी केले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३३७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर सुचना

दि. २०.११.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, शब्बिर अहेमद बशीर अहेमद रा मूर्तीजापूर, ता.मूर्तीजापूर जि. अकोला यांनी मौजे मूर्तीजापूर, ता. मूर्तीजापूर जि. अकोला येथील सर्व्हे नं १, नझुल शिट क्र ११-बी, नझुल प्लॉट क्र ११९, ही मालमत्ता त्यांनी दि.१.६.१९८३, दस्त क्र १२३० या खरेदीखतानुसार नजीराबी मोहम्मद इसाक व इतर यांचे पासून विकत घेतली होती. नजीराबी मोहम्मद इसाक व इतर यांचे मालकी संदर्भात मालमत्ता पत्रकाव्यतिरिक्त कुठलेही कागदपत्र शब्बिर अहेमद बशीर अहेमद यांचेकडे नाहीत. सदरहू मालमत्ता ही सन १९८३ पासून त्यांचेच मालकी व ताब्यात आहे. शब्बिर अहेमद बशीर अहेमद हे वरील मालमत्ता एच.डी.एफ.सी. बँकेकडून कर्ज घेऊन गहाण ठेवणार आहेत.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा दस्ताबाबत, कागदपत्रांबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन चौदा(१४)दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

आपला
शिशिर अरविंद देशपांडे
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो: ९८२३०९१३७७

जाहीर नोटीस

वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८८३/२०२६ प्रोसेस नं.१४४१४/२०२६
चौ.ता. २१/१२/२०२६ दिनांक : ०७/११/२०२६

अर्जदार : १. आनंद अजित थत्ते रा. श्री नाथ दत्त मंदिर जवळ, रामदासपेठ अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : कोणीही नाही.
मयताचा पत्ता :- मयत : १.वीणा अजित थत्ते
पत्ता :- रा. श्री नाथ दत्त मंदिर जवळ, रामदासपेठ अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, वीणा अजित थत्ते यांचे दि. २९/०७/२०२५ रोजी द्वारा डॉ. आशिष आर देशमुख, श्री नाथ दत्त मंदिरा जवळ रामदास पेठ अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर सुचना

सर्वांना ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, राहुल विष्णू अंभोरे रा. बुलढाणा ह्यांच्याकडुन त्यांच्या मालकी व ताब्यातील खालील वर्णनाची मालमत्ता खरेदी करण्याचा करार केला आहे.

मालमत्तेचे वर्णन : मौजे माळविहीर ता. जि. बुलढाणा. र. स. डी. र.डी., ग्रा. पं. माळविहीर च्या हद्दीतील गट क्र. २२८ च्या जमिनीचे चे वि. उप-विभागिय अधिकारी, अकोला यांच्या फाईलावरील महसूल प्र. क्र. एन. ए. पी. - ३४/माळविहीर/३९/१९८९-९० आदेश दि. १९/०३/१९९० नुसार पारीत ले - आऊट नकाशातील प्लॉट क्र. १७ (सातबा-या प्रमाणे २२८/४/१७) ज्याचे क्षेत्रफळ १५६.२५ चौ. मी. आणि प्लॉट क्र. १८ (सातबा-या प्रमाणे २२८/४/१८) ज्याचे क्षेत्रफळ १४८.३६ चौ. मी. त्यावर बांधलेल्या घरासह, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : काकड यांचे घर/ जाधवचे लेआउट, पश्चिमेस : खुला प्लॉट/शेळके चा प्लॉट, उत्तरेस : रस्ता, व दक्षिणेस : अढाऊ चे घर/ वेगळे ले आउट येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे नोंदणीकृत खरेदिखत दस्त क्र. ४३ दि. ०५/०१/१९९३ रोजीचे मुळ दस्त जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले / गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन बुलढाणा येथे दि. १६/११/२०२६ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन आय. सि.आय.सि.आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

अकोला
दि. १९/११/२०२६

अधिवक्ता: संजीव रा. बोचरे,
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

जाहीर नोटीस

विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट

कि फौ अर्ज क्रमांक ३१८/२०२६ चौ. ता. १९/१२/२०२६

अर्जदार : जेनब बी शेख मुनाफ, रा. शाहीन कॉलनी पोपटखेड रोड अकोट, ता. अकोट, जि. अकोला

...विरूध्द...

गैरअर्जदार : निबंधक जन्म/मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी/सचिव ग्राम पंचायत पळसोद ता. अकोट, जि. अकोला

विरुध्द

ज्या अर्थी अर्जदार जेनब बी शेख मुनाफ ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार स्वत: जेनब बी शेख मुनाफ यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९६७ रोजी पळसोद ता अकोट जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक: १९/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट

कि फौ अर्ज क्रमांक ३०९/२०२६ चौ. ता. २२/१२/२०२६

अर्जदार : मुखतार बेग सत्तार बेग, रा. मोहाळा, ता. अकोट, जि. अकोला

...विरूध्द...

गैरअर्जदार : सचिव ग्राम पंचायत मोहाळा ता. अकोट, जि. अकोला

विरुध्द

ज्या अर्थी अर्जदार मुखतार बेग सत्तार बेग ह्यांनी, या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे मुखतार बेग सत्तार बेग यांचा जन्म दिनांक १४/०८/१९५७ रोजी मोहाळा ता. अकोट जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता आज दिनांक: १९/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट

कि फौ अर्ज क्रमांक २९३/२०२६ चौ. ता. ०३/१२/२०२६

अर्जदार : नसीम खान अताउल्ला खान, रा. मु. पो. पणज, ता. अकोट, जि. अकोला

...विरूध्द...

गैरअर्जदार : सचिव ग्राम पंचायत पणज ता. अकोट, जि. अकोला

विरुध्द

या अर्थी अर्जदार नसीम खान अताउल्ला खान ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदाराचे स्वत: नामे नसीम खान अताउल्ला खान यांचा जन्म दिनांक: १४/१२/१९८६ रोजी पणज ता. अकोट जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयांत स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता अजा दिनांक: २०/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जाहीर नोटीस

विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र ०१, अकोट

कि फौ अर्ज क्रमांक ३१९/२०२६ चौ. ता. १९/१२/२०२६

अर्जदार : राबीया बी शेख मुनाफ, रा. मु. पो. उमरा, ता. अकोट, जि. अकोला

...विरूध्द...

गैरअर्जदार : निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी / सचिव ग्राम पंचायत पळसोद ता. अकोट, जि. अकोला

विरुध्द

ज्या अर्थी अर्जदार राबीया बी शेख मुनाफ यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला की राबीया बी शेख मुनाफ यांना जन्म दिनांक १७/१२/७२ रोजी पळसोद ता. अकोट जि. अकोला येथे झाला आहे.

कलम १३(३) जन्म/मृत्यु नांदणी अधिनियम १९६९ अन्वये सदर जन्म / मृत्युची नोंद होणेबाबत आदेश करण्याची मागणी सदर अर्जात केली आहे. तरी या नोटीसव्दारे कळविण्यात येते की सदर नोंद घेण्यास कोणताही आक्षेप किंवा हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रकाशीत झाल्यापासुन १५ दिवसाचे आत सदर न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहुन आक्षेप नोंदवावा मुदतीत हजर न राहील्यास मागणी नुसार नोंद घेण्याबाबतचा आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता अजा दिनांक:१९/११/२०२६ रोजी माझे सहिने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय
(कोर्ट क्र ०१ अकोट), अकोट

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

आरोग्य सेवांचा दर्जा उंचवा; रुग्णांचा विश्वास संपादन करा-आरोग्यमंत्री

समित्यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत संवाद, रुग्णांचे अनावश्यक रेफरल टाळा, अनावश्यक रेफरलचे ऑडिट

वर्धा/जनमाध्यम

रुग्णालयांच्या इमारती उभारणे हेच आरोग्य विभागाचे उद्दिष्ट नसून प्रत्येक रुग्णाला वेळेत, दर्जेदार आणि विश्वासार्ह उपचार मिळणे महत्त्वाचे आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये सुविधा उपलब्ध असतानाही नागरिक खासगी रुग्णालयांकडे का वळतात, याची कारणे शोधून कामकाजात सुधारणा कराव्या. अनावश्यक रेफरल करणे टाळावे. शासकीय आरोग्य सेवांचा दर्जा उंचवा तसेच रुग्णांचा विश्वास संपादन करा, निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती तसेच आरोग्य विभागाच्या विविध समित्यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत आयोजित आरोग्य संवाद सभेत ते बोलत होते. यावेळी आ.समीर कुणावार, आ.राजेश बकाणे, आ.सुमित वानखेडे, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, आरोग्य संचालक डॉ.विजय कंदेवाड, आरोग्य उपसंचालक डॉ.शशिकांत शंभरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजसिंह पवार,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांच्यासह ग्राम व जिल्हास्तपर्यंतच्या विविध आरोग्य समित्यांचे सदस्य, अधिकारी, कर्मचारी ऑनलाईन उपस्थित होते.

आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले, वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे जॉब चार्ट तयार करून त्यांच्या कामाचे नियमित मूल्यमापन करावे. कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून आवश्यक कारवाई करावी. नियुक्ती देऊनही रुजू न होणाऱ्या डॉक्टरांबाबत कठोर भूमिका घ्यावी. तसेच रुग्णांना अनावश्यकपणे दुसऱ्या रुग्णालयात रेफर करणाऱ्या डॉक्टरांवर तातडीने कारवाई करावी. रेफरल यंत्रणेचे नियमित ऑडिट करण्याची सूचनाही त्यांनी केली. 'तिशीचा पल्ला, तपासणीचा सल्ला' हे महत्त्वाकांक्षी अभियान प्रभावीपणे राबविण्याची गरज व्यक्त करताना त्यांनी प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेवर भर दिला.प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, गावपातळी, जिल्हा रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालय स्तरावरील समित्यांच्या



कामकाजाचा नियमित आढावा घ्यावा, असे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.आरोग्य विभागातील कामकाज गतिमान करण्यासाठी दरवर्षी मंत्री, राज्यमंत्री, सचिव आणि आयुक्त स्तरावर किमान दोन बैठका घेऊन त्रुटी व सूचनांचा आढावा घ्यावा. गावपातळीवरून प्राप्त होणाऱ्या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करावी.वर्धा जिल्ह्यातील आरोग्य संस्थांच्या कामकाजाचा आढावा घेताना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींचे त्यांनी कौतुक केले. जिल्ह्यातील आरोग्य सुविधांचा 'वर्धा पॅटर्न' राज्यात राबविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येतील, असे ते म्हणाले. महात्मा फुले जनआरोग्य योजना प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरापर्यंत प्रभावीपणे पोहोचवून नागरिकांना स्थानिक पातळीवरच उपचार सुविधा देण्याचे उद्दिष्ट ठेवावे. हिंगणघाट येथील आरोग्यसेवेच्या कामकाजाचा दाखला देत ज्या ठिकाणी सेवा चांगल्या प्रकारे दिल्या जातात, तेथे नागरिकांचे समाधान दिसून येते, असेही त्यांनी सांगितले. आरोग्य संस्थांमधील रिक्त पदे, औषधसाठा, रेफरल पद्धती, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि आरोग्य सेवा यांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी संबंधित संचालक व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने कार्यवाही सुरू करावी. पुढील तीन महिन्यांत निश्चित केलेल्या प्रमाणित कार्यपद्धतीनुसार (एसओपी) आणि कृती आराखड्यानुसार झालेल्या प्रगतीचा पुन्हा आढावा घेतला जाईल, असेही आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

वडनेर रुग्णालय जागेचा प्रश्न सोडवा : आ.कुणावार

यावेळी आमदार समीर कुणावार यांनी मॉड्युलर शवागार, डॉक्टरांची रिक्त पदे, औषधसाठा, रेफरल ऑडिट, महिला स्त्रीरोगतज्ज्ञांची नियुक्ती तसेच वडनेर येथील रुग्णालयाच्या इमारतीसाठी जागेचा प्रश्न निकाली काढण्याची मागणी केली.

रुग्णालयांतील रिक्तपदे भरणे आवश्यक: आ.बकाने

आमदार राजेश बकाणे यांनी देवळी तालुक्यातील आरोग्य संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याचे निदर्शनास आणून ही पदे तातडीने भरण्याची मागणी केली. पुलगाव व अल्लीपूर येथील रुग्णालयांचे प्रश्न सोडविण्यासह तालुक्यात आवश्यक असलेल्या नवीन आरोग्य केंद्रांना मंजुरी देण्याची बाब त्यांनी मांडली.

आरोग्य व्यवस्था सुधारणेचा मास्टर प्लॅन : आ.वानखेडे

आमदार सुमित वानखेडे यांनी सुरक्षा रक्षक, परिचर आणि आरोग्य सेवकांची कमतरता दूर करावी, रुग्णालयांमध्ये नियमित स्वच्छता ठेवावी, जिल्ह्यासाठी आरोग्य विभागाचा सर्वंकष मास्टर प्लॅन तयार करावा तसेच रुग्णालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली लागू करण्याची मागणी केली. बैठकीदरम्यान अल्लीपूर, वायगाव, गिरड, समुद्रपूर, नांदोरी, नारा आणि अंतोरा येथील आरोग्य संस्थांच्या प्रतिनिधींशी आरोग्यमंत्र्यांनी थेट संवाद साधला. संबंधित संस्थांमधील औषधसाठा, प्रसूतींची संख्या, बाह्यरुग्ण विभागातील रुग्णसंख्या आणि उपलब्ध सुविधांची माहिती जाणून घेतली. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल यावेळी आरोग्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला.



निम्न वर्धाचे पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचवा

वंचित गावांतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी देण्याची शिवसेनेची मागणी

गाडेगाव/जनमाध्यम

निम्न वर्धा प्रकल्पाच्या कालव्यातून सोडण्यात आलेले पाणी शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच बंद करू नये. सर्व गावांतील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय गिरी यांनी केली आहे.

कानगाव, चानकी, रोहनखेडा, आलमडोह, कोसुर्ला आणि बाबापूर या गावांपर्यंत अद्याप सिंचनासाठी पुरेसे पाणी पोहोचलेले नाही. त्यामुळे या गावांतील शेतकरी रब्बी पिकांच्या ओलितापासून वंचित आहेत.या पार्श्वभूमीवर संजय गिरी यांनी वर्धा येथील कालवे विभागाचे कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले.

शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना ओलितासाठी पाणी मिळेपर्यंत कालव्याचा पाणीपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी त्यांनी केली.

प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून पाणी वितरणाचे योग्य नियोजन करावे. केवळ पाणी सोडल्याचा देखावा न करता ते शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवावे, असेही गिरी यांनी निवेदनात म्हटले आहे. यावेळी भगवंत भोयर, बंडूभाऊ उमाटे यांच्यासह संबंधित गावांतील शेतकरी उपस्थित होते.

संक्षिप्त

उधारीचे पैसे मागितल्यास विटेने डोक्यावर वार

पुलगाव-उधारीने दिलेले १ हजार ५०० रुपये परत मागितल्याच्या कारणावरून दोघांनी एका तरुणाला शिवीगाळ करीत मारहाण केल्याची घटना फतेपूर, ता. देवळी येथे घडली. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मयूर रामरावजी मढावी (वय २४, रा. फतेपूर) यांनी आरोपीच्या पत्नीला १ हजार ५०० रुपये उधार दिले होते. ही रक्कम परत मागण्यासाठी मयूर आरोपीच्या घरी गेले असता, पैसे देण्यास नकार देत आरोपीने त्यांना शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान, दुसऱ्या आरोपीने त्यांना पकडून ठेवले. त्यानंतर शंकर मांढरे याने खाली पडलेली वीट उचलून मयूर यांच्या डोक्यावर मारली. यात त्यांच्या डोक्याला दुखापत होऊन रक्तस्राव झाला. तसेच कान, तोंड आणि उजव्या पायालाही मार लागला. पुन्हा घरी आल्यास जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

भरधाव कारची दुचाकीला मागून धडक; काका-आत्या जखमी

देवळी-भरधाव आणि निष्काळजीपणे कार चालवून दुचाकीला मागून धडक दिल्याने दुचाकीवरील दोघे जण जखमी झाल्याची घटना वायगाव निपाणी चौकात घडली. याप्रकरणी देवळी पोलिसांनी कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादीचे काका आणि आत्या हे दुचाकीने जात असताना वायगाव निपाणी चौकाजवळ एमएच ४० एटी ८०३२ क्रमांकाच्या मारुती स्विफ्ट कारने त्यांच्या दुचाकीला मागून जोरदार धडक दिली. कारचालकाने वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालविल्याने हा अपघात घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. धडकेमुळे दुचाकीवरील दोघांनाही मार लागून ते जखमी झाले. या प्रकरणी देवळी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

मोबाईलच्या हप्त्यावरून घरातच राडा

सिंदी रेल्वे-मोबाईलचा हप्ता का भरला नाही, यावरून झालेल्या वादातून सख्ख्या भावाने तरुणाच्या हातावर लोखंडी रॉडने वार केला. तर वडिलांनीही लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना मस्तानशहा चौक, सिंदी रेल्वे येथे घडली.राकेश चंद्रशेखर नक्षीने (वय २२) यांनी मोबाईलचा हप्ता न भरल्याने दुकानदाराचा फोन आल्याचे भाऊ प्रशांत याला सांगितले. यावरून संतापलेल्या प्रशांतने लोखंडी रॉडने राकेश यांच्या उजव्या हाताच्या मनगटावर दोन ते तीन वार केले. त्यामुळे त्यांच्या हाताला दुखापत झाली. यावेळी वडील चंद्रशेखर यांनीही राकेश यांना शिवीगाळ करीत हातापायांवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. वाद सोडविण्यासाठी आलेल्या आईलाही दोघांनी धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

मुंबईत २४ नोव्हेंबरला राज्यस्तरीय बुवाबाजीविरोधी महिला परिषद

खा.सुप्रिया सुळे यांच्या हस्ते उद्घाटन; अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती

वर्धा/जनमाध्यम

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार २४ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे राज्यस्तरीय बुवाबाजीविरोधी महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला राज्यभरातून ५०० हून अधिक महिला आणि पुरुष उपस्थित राहणार असून, वर्धा जिल्ह्यातील २० हून अधिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी सहभागी होणार आहेत.

मुंबईतील मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत ही परिषद होईल. खा.सुप्रिया सुळे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार असून, सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे असतील.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांचे बुवाबाजी : बळी स्त्रियांचा, एक मानसशास्त्रीय विश्लेषण या विषयावर व्याख्यान होणार आहे. तिसऱ्या सत्रात जेन-झी टॉक ऑन बुवाबाजी या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. यात प्रियांका खेडेकर, हरी आवळे, शितल वसावे आणि गौरी जाधव सहभागी होणार आहेत.परिषदेच्या



समारोप सत्राला ज्येष्ठ साहित्यिका प्रा. नीरजा आणि अभिनेत्री अनिता दाते उपस्थित राहणार आहेत. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे असतील.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती गेल्या ३७ वर्षांपासून अंधश्रद्धा निर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनासाठी कार्यरत आहे. बुवाबाजीविरोधात संघटनेने सातत्याने भूमिका घेतली असून, आतापर्यंत समितीच्या पुढाकाराने जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत १५०० पेक्षा अधिक गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. यातील काही प्रकरणांत भोंदू बाबा आणि मांत्रिकांना शिक्षाही झाली आहे. परिषदेच्या आयोजनासाठी बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य कार्यवाह ॲड. रंजना गवांदे, सहकार्यवाह विष्णू लोणारे, महिला सहभाग विभागाच्या राज्य कार्यवाह गायत्री आडे, रुपेश शोभा तसेच राज्य प्रधान सचिव विजय परब, सरचिटणीस आरती नाईक, नंदकिशोर तळाशीलकर, यश सूर्यवंशी, डॉ. सुषमा बसवंत, संदीप गायकवाड आणि राजेंद्र पंडित प्रयत्नशील आहेत. या परिषदेला वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील कार्यकर्ते, पदाधिकारी, तरुण-तरुणी, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार,प्रकाश कांबळे, सारिका डेहनकर, डॉ. माधुरी झाडे, डॉ. हरीश पेटकर, जिल्हाध्यक्ष बाबाराव किटे, यशवंत झाडे, डॉ. हाशम शेख, दिलीप उटाणे, अरुणकुमार हर्षबोधी, अरुण चवडे, भरत कोकावार, मनीष फुसाटे, द्वारका इमडवार,डॉ. मंजुषा देशमुख, कविता राठोड, कल्पना सातव, मोनाली गुळघाणे, संजय भगत, दिलीप गुळघाणे, अशोक हेडावू, बबिता नेगी, नंदा नरांजे आणि रिंकू घोडेस्वार यांनी केले आहे.

वरोरा येथे बरखास्ती, सिंदीत संचालकाला अभय कोणाचे

सरपंचपद अडीच वर्षांपासून रिक्त, तरी संचालकपद आणि लाभ कायम

सेलू/जनमाध्यम

कायद्याचा बडगा वरोऱ्यात चालतो,मग सिंदी बाजार समितीत तो बोथट का होतो? चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथे अशाच स्वरूपाच्या प्रकरणात दोषींवर बरखास्तीची कारवाई होते. मात्र,वर्धा जिल्ह्यातील सिंदी कृषी उत्पन्न बाजार समितीतील संचालकाच्या प्रकरणात कारवाई करताना प्रशासनाची पावले का अडखळतात नियम बदलले आहेत की कारवाईवर कुणाचा दबाव आहे,असा प्रश्न दहेगाव (गोसावी) येथील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. संचालक संदीप सुरेश वाणी यांचे संचालकपद रद्द करण्यासह त्यांना पाठीशी घालणाऱ्या सभापती व सचिवांवरही कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.यासंदर्भात ५ नोव्हेंबर रोजी जिल्हा उपनिबंधक,वर्धा यांना निवेदन देण्यात आले. यापूर्वीही वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई झालेली नसल्याने ग्रामस्थांनी आता प्रशासनाला थेट जाब विचारला आहे.ग्रामस्थांच्या आरोपानुसार, संदीप वाणी यांचे सरपंचपद रिक्त होऊन अडीच वर्षांचा कालावधी उलटला आहे. असे असतानाही त्यांचे बाजार समितीतील संचालकपद कायम कसे? संबंधित माहिती जिल्हा उपनिबंधकांना देण्याची जबाबदारी सभापती व सचिवांची असताना ती माहिती दडविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर संचालकपदाच्या माध्यमातून भत्ते आणि अन्य लाभही सुरू असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

दुसऱ्याच्या नावाने ठेकेदारी, स्वतःची वाहने कामावर

बाजार समितीच्या नियमांना बगल देत दुसऱ्याच्या नावाने ठेकेदारी सुरू असल्याचा गंभीर आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. संदीप वाणी यांच्या मालकीचे पाण्याचे टँकर आणि ट्रॅक्टर बाजार समितीच्या कामावर वापरले जात असल्याचे छायाचित्र पुरावे निवेदनासोबत जोडल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे. संचालकपदाचा वापर करून आर्थिक लाभ घेतला जात असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

वरोऱ्यात एक न्याय, सिंदीत दुसरा न्याय

वरोरा येथील तत्सम प्रकरणात जिल्हा उपनिबंधकांनी केलेल्या कारवाईचा दाखला देत ग्रामस्थांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एकाच



प्रकारच्या प्रकरणात दोन जिल्ह्यांत वेगवेगळे निकष कसे लागू होऊ शकतात? नियम सर्वांसाठी समान असतील तर सिंदी बाजार समितीत कारवाईला विलंब का? असा सवाल त्यांनी केला आहे. संदीप वाणी यांचे संचालकपद तातडीने रद्द करावे,तसेच त्यांना कथितरीत्या आर्थिक लाभ मिळवून देण्यास मदत करणाऱ्या सभापती व सचिवांवरही कठोर कारवाई करावी,अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधितांना कायमस्वरूपी निवडणूक लढविण्यास अपात्र ठरविण्याची मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

सात दिवसांत निर्णय घ्या, अन्यथा न्यायालयात खेचू

प्रशासनाने सात दिवसांच्या आत निर्णय घ्यावा, अन्यथा जिल्हा उपनिबंधकांनाही न्यायालयीन प्रक्रियेत पक्षकार केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. आता जिल्हा उपनिबंधक या आरोपांची चौकशी करून कारवाई करतात की पुन्हा एकदा तक्रारीला केराची टोपली दाखवतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अल्लीपूरमध्ये नोव्हेंबरमध्येच पाणीटंचाई

तीन दिवसाआड पाणीपुरवठा; यशोदा नदी कोरडी, ग्रामस्थांची पाण्यासाठी भटकंती

मोझरी (शेकापूर)/जनमाध्यम

यंदा कमी पावसामुळे अल्लीपूर गावात नोव्हेंबर महिन्यातच तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. ग्रामपंचायतीकडून दोन ते तीन दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.



वर्धा धरणातून सोडण्यात आलेले पाणी अद्याप यशोदा नदीपर्यंत पोहोचलेले नाही. हे पाणी निमसडा गावापर्यंतच आले असून पुढे अडविण्यात आल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे.परिणामी यशोदा नदी कोरडी पडली असून गावातील पाणीपुरवठ्याच्या विहिरींची पातळीही झपाट्याने खालावत आहे. त्यातच गावातील अनेक हातपंप बंद असल्याने नागरिकांची अडचण वाढली आहे.देवळी-पुलगाव विधानसभा क्षेत्राचे आ.राजेश बकाने यांनी संबंधित अधिकाऱ्यांना धरणाचे पाणी तातडीने सोडण्याचे आदेश दिले होते. मात्र, अद्याप पाणी यशोदा नदीपर्यंत पोहोचले नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दरम्यान, माजी ग्रामपंचायत सदस्य सतीश काळे यांनी ग्रामपंचायतीचे प्रशासक तुषार जोगी आणि ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय दिवटे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. यात धरणातून पाणी तातडीने यशोदा नदीपर्यंत सोडावे, बंद असलेले हातपंप दुरुस्त करावेत, पाणीपुरवठ्याच्या विहिरींमधील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी उपाययोजना कराव्यात आणि गावात नियमित पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, अशी मागणी केली आहे.नोव्हेंबर महिन्यातच पाणीटंचाईची ही परिस्थिती निर्माण झाली असल्याने आगामी उन्हाळ्यात काय स्थिती होणार, असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. ग्रामपंचायतीने तातडीने उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

नऊ जिल्हा परिषद शाळांना डिजिटल शिक्षणाची प्रतीक्षा

आर्वी तालुक्यातील शाळांसाठी ५९ लाख ८५ हजारांचा CSR प्रस्ताव बँक ऑफ बडोदाकडे

आर्वी/जनमाध्यम

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात, यासाठी आर्वी तालुक्यातील नऊ जिल्हा परिषद शाळांच्या विकासाचा प्रस्ताव बँक ऑफ बडोदा आर्वी शाखेकडे सादर करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर राठोड यांनी पुढाकार घेतला असून, या शाळांसाठी ५९ लाख ८५ हजार रुपयांच्या सामाजिक दायित्व निधीची मागणी करण्यात आली आहे.

या प्रस्तावात दहेगाव मुस्तफा, पाचेगाव, कवाडी, गव्हाणखेडी, बोरगाव हातला, नांदुरा काळे, पिपरी, पारगोठान आणि धनोडी येथील जिल्हा परिषद शाळांचा समावेश आहे. प्रस्तावित निधीतून शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम, डिजिटल डिस्प्ले, संगणक, प्रोजेक्टर, इंटरनेट सुविधा, यूपीएस तसेच वीजपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय विज्ञान आणि गणित प्रयोग साहित्य, ग्रंथालयासाठी पुस्तके, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य आणि शिक्षकांना डिजिटल प्रशिक्षण देण्याचेही नियोजन



आहे. ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक सुविधांची दरी कमी व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता असूनही आधुनिक शैक्षणिक साधनांच्या अभावामुळे त्यांच्या प्रगतीवर मर्यादा येतात. त्यामुळे त्यांनाही तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची संधी मिळणे आवश्यक आहे, असे ज्ञानेश्वर राठोड यांनी सांगितले.

कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १३५ आणि अनुसूची सातनुसार शिक्षण क्षेत्रातील उपक्रमांना CSR निधीतून मदत देण्याची तरतूद आहे. त्यानुसार बँक ऑफ बडोदाने या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, ५९ लाख ८५ हजार रुपये ही मंजूर निधीची रक्कम नसून नऊ शाळांच्या विकासासाठी अपेक्षित प्रकल्प खर्च आहे. या प्रस्तावाला बँकेकडून मंजुरी मिळते का, याकडे संबंधित गावांतील पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. निवेदन सादर करताना सचिन जिवतोडे, मुकेश दुपारे, हर्षल कावळे, सिद्धार्थ वरठी, सचिन कावळे, वैभव ढोमने, रवी खंडारे, अमित धोबे, मारुती राऊत, रवी मगर, गुरुदेव चापले, विजय खडतकर, संदीप सोनटक्के, राजू जाधव, दिनेश राठोड, अजय राठोड, शरद आहाके, सचिन दविले, सुरेश महाजन, धर्मा राठोड, अमन कलोकार, नितीन शेलोटे, आयुष वाकोडकर, अंकित राहूत, अवधूत रामगडे, राजू मडवे आणि मयूर तिवाडे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३५३
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

शासकीय विभागीय ग्रंथालयात दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन

'दिवाळी अंक हे मनाची भूक भागवणारे उत्कृष्ट खाद्य' - संजय देशमुख



अमरावती/प्रतिनिधीः- ज्याप्रमाणे दिवाळीत आपल्याला आवडीचे फराळाचे पदार्थ खायला आवडतात, त्याचप्रमाणे मनाची आणि विचारांची भूक भागवण्यासाठी दिवाळी अंक हे एक उत्कृष्ट बौद्धिक खाद्य असल्याचे प्रतिपादन 'उत्कृष्ट ग्रंथालय सेवक'पुरस्कार प्राप्त संजय देशमुख यांनी केले.

अमरावती शासकीय विभागीय ग्रंथालय आणि सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.सहायक ग्रंथालय संचालक डॉ. राजेश पाटील,शासकीय विभागीय ग्रंथालयाचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय बनसोड आणि उभय कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी आणि ग्रंथालयात अभ्यास करणारे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना देशमुख म्हणाले,दिवाळी अंक हे एक बौद्धिक खाद्य असून सर्व विद्यार्थी आणि वाचकांनी या दिवाळी अंक प्रदर्शनाचा लाभ घ्यावा.या प्रदर्शनात विविध साहित्यिक आणि वैचारिक विषयांच्या दिवाळी अंकांसोबतच विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी इयत्ता १०वीचे प्रश्नपत्रिका संच आणि इतर उपयुक्त शैक्षणिक साहित्यही उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या उपक्रमाचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

थकीत मालमत्ता करापोटी राजमहल लॉन व मंगल कार्यालय सील

अमरावती प्रतिनिधी - अमरावती महानगरपालिकेच्या पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूरनगर येथील वॉर्ड क्रमांक C8 मधील मालमत्ता क्रमांक ९४८, राजमहल लॉन व मंगल कार्यालय, गणपती नगर, श्रध्द रोड, अमरावती यांच्याकडे मालमत्ता कराची तब्बल १३ लाख ९५ हजार ४५८ रुपये इतकी थकबाकी असल्याने महानगरपालिका प्रशासनाने आज दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ रोजी जप्तीनाम्यानुसार सदर मालमत्ता सील केली.

महानगरपालिकेच्या थकीत कर वसुली मोहिमेंतर्गत ही कारवाई करण्यात आली. वारंवार थकीत कर भरण्याबाबत सूचना देऊनही रक्कम जमा न झाल्याने महानगरपालिका प्रशासनाने जप्तीची कारवाई करत राजमहल लॉन व मंगल कार्यालयाला सील करण्यात आले.

ही कारवाई सहायक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी सहायक क्षेत्र अधिकारी प्रवीण ठाकरे, दीपक सरसे, आकाश चौधरी तसेच महानगरपालिकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

थकीत कराचा तातडीने भरणा करण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

६ हजार शेतकऱ्यांना होणार एकवेळ समझोता कर्जमुक्तीचा लाभ

२ लाखांवरील रक्कम भरून लाभ घेण्याचे आवाहन

अमरावती/प्रतिनिधीः- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६च्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत एकवेळ समझोता आधार प्रमाणीकरणासाठी पहिली यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये जिल्ह्यातील ६ हजार ३०६ पात्र शेतकऱ्यांचा समावेश आहे. यातील शेतकऱ्यांनी दोन लाख रूपयांवरील रक्कम भरून कर्जमुक्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आतापर्यंत जिल्ह्यातील १ हजार ८७१ लाभार्थ्यांनी एकवेळ समझोतासाठी आधार प्रमाणीकरण केले आहे. पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी संबंधित बँक शाखा, विकास संस्था आणि ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. यादीतील तपशील तपासून पात्र शेतकऱ्यांनी आपल्या कर्जातील २ लाखावरील हिश्श्याची रक्कम संबंधित बँकेत जमा करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची एकापेक्षा जास्त कर्जखाती आहेत, त्यांनी कोणत्याही कर्जखात्यात रक्कम भरण्याची सुविधा आहे. मात्र एका खात्यात एकवेळ समझोताप्रमाणे नमूद देय रकमेपेक्षा जास्त रक्कम भरू नये. शेतकऱ्यांनी हिश्श्याची रक्कम भरण्यासाठी अंतिम मुदत दि. ३१ मार्च २०२७ आहे.

शेतकऱ्यांनी रक्कम भरल्यानंतर बँकेमार्फत दर शुक्रवारी माहिती पोर्टलवर अपलोड केली जाणार आहे. थकबाकी अद्ययावत झाल्यानंतर तीन दिवसांनी आधार प्रमाणीकरणाची सुविधा मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण आहे, त्यांनाच आधार प्रमाणीकरण करून शासनाकडून २ लाखाच्या कर्जमुक्ती लाभ दिला जाणार आहे. ही एकवेळ समझोता यादी केवळ पहिली यादी असून, बँकांकडील माहितीच्या संगणकीय संस्करणानंतर पुढील याद्याही प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मयत, वयस्कर तसेच बोटांच्या ठशाची नोंद होत नसल्यास लाभार्थ्यांसाठी दि. १९ ऑगस्ट २०२६ रोजीच्या मानक कार्यप्रणालीनुसार कार्यवाही केली जाणार आहे.

जाहीर सूचना

सर्व लोकांस कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **सारिका विजय शिरभाते, विजय मनोहर शिरभाते,रा.इंद्रपुरी शाळेजवळ, रवि नगर, अमरावती, ता.जि.अमरावती व गौरव मनोहरराव शिरभाते, रा.पोलीस स्टेशन मागे परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती** यांचे संयुक्त मालकीची मालमत्ता (प्लॉट व त्यावरील घर) विकत घेण्याचा करार केलेला आहे, त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे -

मालमत्तेचे वर्णन :- नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर वि.कचेरीचे कक्षेतील व मनपा अमरावतीच्या हददीतील मौजे-महाजनपुर, प्रगणे- बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं. ३/२ मधील ६ एकर २६ गुंठे जमिनीतील वि.एस.डी.ओ.साहेब, अमरावती यांनी त्यांच्या फाईला ज्याचा रा.मा.क्र.एन.ए.पी.-३४/महाजनपुर-६६/१९८२-१९८३, नि.ता.२०.०७.१९८३ नुसार लेआउट कन्व्हर्शन मंजुर झालेल्या व सहायक संचालक नगर रचना अधिकारी मनपा अमरावती यांचे आदेश क्र.१६४/२०००,दि.१८.०१.२००० नुसार व वि.जिल्हाधिकारी साहेब, अमरावती यांचे सुधारीत आदेश पारित दिनांक ०७.१२.२००० नुसार लेआउट कन्व्हर्शन मंजुर झालेल्या व श्री दत्त विहार या नावाने ओळखल्या जाणा-या जागेतील प्लॉट क्र.४९-बी (एकोणपन्नास-बी) याची साईज १० मी.X १८ मी. असून याचे एकूण क्षेत्रफळ १८० चौ.मि.(१९३८ चौ.फुट.) आहे.या प्लॉटचे सहायक संचालक नगर रचना मनपा अमरावती यांचे पत्र क्र.**DDMCA/SA/2024/APL/02023** दि.१०.०३.२०२४ व वि.तहसिलदार साहेब,अमरावती यांचा प्लॉट विभाजनाचा सुधारित आदेश क्र.रा.मा.क्र.एम.आर.सी.८१/महाजनपुर-६८५/२०२३-२४, नि.ता.२७.०३.२०२४ नुसार सबडिव्हीजन मंजुर झालेला प्लॉट क्र.४९/ब/२(एकोणपन्नास/ब/दोन) याची साईज ७मी.X १८ मी.असून याचे एकूण क्षेत्रफळ ९०.००चौ.मी. (९६९ चौ.फुट.) यावर मनपा मंजुर नकाशानुसार बांधकाम केलेले दोन मजली घर आहे.ज्यामध्ये तळमजल्यावर तीन रुम संडास-बाथरुम व पहिल्या मजल्यावर ३ रुम संडास-बाथरुम, ज्यामध्ये इलेक्ट्रीक फिटींग केलेले आहे, ज्याची चर्तुसिमा -

पुर्वेस - लेआउट मधील रोड, पश्चिमेस - दुस-याचे लेआउट,
उत्तरेस- प्लॉट नं.४७/ए दक्षिणेस- सबडिव्हीजन प्लॉट नं.४९/ब/१.

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मालमत्ते (प्लॉट व घर) विकत घेण्याचा करार माझे पक्षकार यांनी केलेला आहे व लवकरच सदर मालमत्तेची खरेदी करुन घेणार आहे.

सबब वरील वर्णन केलेल्या मालमत्तेवर ए्यु स्मॉल फायनान्स बँक लि.अमरावती व्यतिरिक्त इतर कुणाचे कोणत्याही प्रकारचे कर्ज, बोजा, हितसंबंध, गहाण, वारसा,हक्क अथवा सरकारी निमसरकारी, सावकारी कर्ज अथवा अन्य कोणतेही हक्क, न्यायालयीन प्रकरण असतील तर ही जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ४ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रास हरकत घ्यावी. तसे न केल्यास माझे पक्षकार करारापमाणे पुढील व्यवहार पूर्ण करुन घेईल व नंतर उजर चालणार नाही. सबब कळावे.

अमरावती
दिनांक १८.११.२०२६ (**ॲड.राजेश एन.पट्टलवार**)
प्रभात कॉलनी, शिलांगण रोड,
पक्षकाराची सही **अमरावती, मो.९५७०४४७७०७**

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर,३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४६७/२०२६
अमोल अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.१६.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Shri Amol Rameshrao Pusatkar, Age 43 Yrs. Occu.: Business
2. Chi.Kashyap Amol Pusatkar, Age 11 Yrs. Occu.: Education
3. Ku.Waruni Amol Pusatkar, Age 09 Yrs. Occu.: Education
All Above R/o C/o Ashok Tayade, Akoli Railway Station Road, Teliphone Colony, Jaya Colony, Sai Nagar, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Swati Amol Pusatkar @ Ku.Swati Rameshrao Anjikar हे दिनांक 19.09.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shri Amol Rameshrao Pusatkar+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shri Amol Rameshrao Pusatkar+2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्रे देण्यात येईल.

आज दिनांक **१९.११.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३४१/२०२६
मिना अधिक चार -वि- निरंक
पुढील ता.०८.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. श्रीमती मीना दिगांबर उईके, वय ४२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. राज दिगांबर उईके, वय १६ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. सुरज दिगांबर उईके, वय १८ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
४. कु.कोमल दिगांबर उईके, वय १७ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
अ.नं.१ ते ४ रा.मलकापूर, पो.कवठा (बडनेरा) जि.अमरावती
५. शेजल रोशन टेंभूर्णे, वय २६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.सावरखेडा हातुर्णा, ता.भातकुली, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दिगांबर नारायण उईके** हे दिनांक 23.05.2026 रोजी **सावंगा मेघे, वर्धा** येथे मयत झाले. अर्जदार **श्रीमती मीना दिगांबर उईके अधिक चार** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती मीना दिगांबर उईके अधिक चार** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्रे देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ७८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती
आर.एम.जे.सी.क्र.५५१/२०२६ ने.ता.१८.१२.२०२६

अर्जदार : १. **गीता स्वप्नील टारपे**, वय २६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.नांदगाव पेठ, ता.व जि.अमरावती
२. **रुपेश सुनिल पाटील**, वय २३ वर्षे, व्यवसाय- मजूरी
रा.अकोट, ता.अकोट, जि.अकोला

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मृतक भारती सुनिल पाटील** यांचा **मृत्यू दि.१४/०४/२०२५** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.तसेच **मृतक सुनिल खुशाल पाटील** यांचा **मृत्यू दि.१०/११/२०२१** रोजी परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५५१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०२.११.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.३१३/२०२६ **ने.ता.१०.१२.२०२६**

१. देविदास बारकाजी मेश्राम
रा.वडगांव रोड, परोपटे ले आउट, यवतमाळ,ता.जि.यवतमाळ
२. दिलीप बारकाजी मेश्राम
रा.धानोरा शिक्रा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी **मयत बारकाजी किसन मेश्राम** यांचा **मृत्यू दि.२८.१०.२००२** मध्ये **धामक, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे पत्नी नामे **गयाबाई बारकाजी मेश्राम** यांचा मृत्यू दि.०३.११.२०१६ मध्ये **धामक, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला.मयताचे **अर्जदार क्र.१ व २ ही मुले आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस

माझी पक्षकार **सिमरन निकेश मतलानी, मोनिका रोहित राजपाल, प्रिया उमेश धनकानी**,यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आम जनतेस जाहीर नोटीस प्रेषित करतो ती येणेप्रमाणे :-

माझे पक्षकाराने दुर्गाबाई तारासिंह रघुवंशी यांच्याकडून त्यांच्या मालकी व ताब्यातील खालील वर्णन केलेला प्लॉट विक्री करण्याचा सौदा केला आहे, त्या **मालमत्तेचे वर्णन**:- मौजे-शेगाव,प्र.नांदगाव पेठ, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे क्र.७ मधील ६ हे ३९ आर जमिनीतील मा सहायक संचालक नगर यांचे आदेश क्र.७२/१९९५-९६ दि.२७/६/१९९६ नुसार लेआउट मंजुर व वि.जिल्हाधिकारी साहेब अमरावती यांचे फाईल वरील रे.के.नं.एन.ए.पी.-३४/शेगांव/७३/१९९५-९६, नि.ता. १४.०५.१९९६ नुसार लेआउट मंजुर झालेल्या तिरुपती लेआऊट मधील प्लॉट क्र.२३-ए (क्षेत्रफळ १८२.५० चौ.मि.) १९६३.७० चौ.फुट.

वरील प्लॉटची खरेदी माझे पक्षकार शक्य तितक्या लवकरात लवकर करणार असल्याने ज्या कुणासही या बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत, कर्ज, हक्क, गहाण, बोजा, ताबा किंवा इतर हितसंबंध निर्माण केले असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या ७ दिवसाच्या आत कागदपत्रासह खालील पत्यावर संपर्क साधावा.खरेदी निष्पादित झाल्यानंतर कोणतीही उजर ऐकल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

करिता ही जाहिर सूचना.

दिनांक २०.११.२०२६
ॲड.निकेश अ मतलानी
रा.रामपुरी कॅम्प, अमरावती
मो.९४०३३१२८५४

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र.७३७/२०२६ कलम २२

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक	**श्री विठ्ठल रुखमाई संस्थान, ऋणमोचन, ता.भातकुली जि.अमरावती, ए-२१९०/अमरावती**
अर्जदार -	**श्री रामदास रामचंद्र मानकर,रा.सायत, ता.भातकुली, जि.अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप-आयुक्त अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :- मौजा- सायत, ता.भातकुली, जि.अमरावती येथील शेतजमीन-भुमापन क्र.३१२,क्षेत्रफळ २ हेक्टर,२४-आर, भोगवटदार वर्ग-१, आकार रुपये १३.८५ पैसे, याची चर्तुसिमा पुढीलप्रमाणे -

पुर्वेस - पंजाब रामकृष्ण पांडे यांचे शेत पश्चिमेस - माणिकराव हिवसे यांचे शेत
उत्तरेस- श्रीमती सुलोचनाबाई मानकर यांचे शेत दक्षिणेस- सायत-आसरा रस्ता,

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल तर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप-आयुक्त, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०३.११.२०२६ रोजी दिली.

शिक्का
सही/-
अधीक्षक, (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

जाहीरनामा/सायटेशन नोटीस

मा.विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात

इतर कि.फौ.अर्ज क्र.७३/२०२६ **ने.ता.०४.०१.२०२७**

अर्जदार : **अशोक नामदेवराव राणे,**
वय ७१ वर्षे, धंदा-सेवानिवृत्त
रा.तिरुपती नगर, आशियाना बिल्डींग, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार: **जन्म मृत्यू निबंधक तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत बैलमारखेडा, ता.भातकुली, जि.अमरावती**

ज्याअर्थी यातील अर्जदाराने न्यायातयामध्ये जन्म व मृत्यूची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३ (३) अ प्रमाणे यातील अर्जदार अशोक नामदेवराव राणे, यांचा जन्म दि.०४.०१.१९५५ रोजी झाला आहे. अशी नोंद करणेचा हुकुम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसाच्या आत आपण आपल्या वकिलामार्फत अगर स्वतः मा.न्यायालय यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ०४.०१.२०२७ रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास मा.न्यायालय योग्य तो हुकुम काढतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २०/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

दि.२०.११.२०२६

शिक्का
आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर), भातकुली

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.मोहम्मद झकीर अब्दुल गफार,** पत्ता हिरापूरा अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/32055 जुना मालमत्ता क्र. 24000 नझुल शिट क्र.२६ प्लॉट नं.०३ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री अब्दुल रज्जाक हाजी अहमद अधिक दोन** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **मोहम्मद झकीर अब्दुल गफार** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१९.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस - प्लॉट नं.७८
पश्चिमेस - प्लॉट नं.७९
उत्तरेस - सरकारी रस्ता
दक्षिणेस - प्लॉट नं.०५

शिक्का
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.अंकुश प्रभाकर गावंडे,** पत्ता सावळी, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२१ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/15519 जुना मालमत्ता क्र. 21000590 नझुल शिट क्र.२४-सी प्लॉट नं.७ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री मुरारीलाल बद्रीलाल जोशी** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या श्री.अंकुश प्रभाकर गावंडे नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१३.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस - सरकारी गल्ली
पश्चिमेस - सरकारी गल्ली
उत्तरेस - सरकारी गल्ली
दक्षिणेस - महादेव टेकचंद परिवाले यांचे प्लॉट

शिक्का
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.मोहम्मद झकीर अब्दुल गफार,** पत्ता हिरापूरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/32054 जुना मालमत्ता क्र. 24000 नझुल शिट क्र.२६ प्लॉट नं.०३ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री अब्दुल रज्जाक हाजी अहमद अधिक दोन** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **मोहम्मद झकीर अब्दुल गफार** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **१९.११.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

पुर्वेस - प्लॉट नं.७९
पश्चिमेस - प्लॉट नं.८१
उत्तरेस - सरकारी रस्ता
दक्षिणेस - प्लॉट नं.०५

शिक्का
मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.मोहम्मद झकीर अब्दुल गफार,** पत्ता हिरापूरा अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२४ संगणक मालमत्ता क्र.ACHA000/32056 जुना मालमत्ता क्र. 24000 नझुल शिट क्र.२६ प्लॉट नं.०३ ही कर आकारणी नोंदवहीनुसार **श्री अब्दुल रज्जाक हाजी अहमद अधिक दोन** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **मोहम्मद झकीर अब्दुल गफार** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

खोपडा-बोडणा प्रकल्पग्रस्तांचा टॉवरवरून एल्गार; १५ लाखांच्या अनुदानासाठी आंदोलन

मोर्शी/वार्ताहर

येथील तालुक्यातील खोपडा -बोडणा येथील प्रकल्पग्रस्त नागरिकांचा संयम अखेर सुटला असून, आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवार, १९ नोव्हेंबर रोजी ग्रामस्थांनी थेट बीएसएनएलच्या टॉवरवर चढून आंदोलन सुरू सुरुकल केले. या अनोख्या आंदोलनामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

चारगड लघु पाटबंधारे प्रकल्पामुळे खोपडा-बोडणा येथील अनेक कुटुंबे बाधित झाली आहेत. प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे पुनर्वसन करण्यात आले असले, तरी पुनर्वसनस्थळी





प्रकल्पासाठी जमिनी आणि घरे बाधित झाल्यानंतरही नागरिकांच्या समस्या सुटलेल्या नाहीत. पुनर्वसनाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा मिळाव्यात आणि प्रत्येक बाधित कुटुंबाला न्याय मिळावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे. आता तरी प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन प्रकल्पग्रस्तांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. प्रकल्पग्रस्तांच्या या आंदोलनामुळे खोपडा-बोडणा परिसरातील प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासन यावर काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मूलभूत सुविधांचा अभाव असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून सातत्याने केली जात आहे. अनेक मागण्या शासनदरबारी मांडूनही त्यावर ठोस निर्णय झालेला नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रत्येक कुटुंबाला १५ लाख रुपयांचे विशेष अनुदान देण्यात यावे, ही आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. या मागणीसाठी यापूर्वी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणही करण्यात आले होते. मात्र, अद्याप शासनाकडून अपेक्षित सकारात्मक निर्णय न झाल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाचा आक्रमक मार्ग स्वीकारला. गुरुवारी नागरिकांनी बीएसएनएलच्या टॉवरवर चढून शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. आंदोलनस्थळी बाधित कुटुंबातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिस्थिती लक्षात घेता शिरखेड पोलिसांनी घटनास्थळी बंदोबस्त तैनात केला.

पदोन्नती नसलेल्या मुख्याध्यापकांना अर्जित रजा द्या

शिक्षक समितीची मागणी
शासन निर्णय अपूर्ण,
८० टक्के मुख्याध्यापक वंचितच

अमरावती/का.प्र.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पदोन्नती प्राप्त मुख्याध्यापकांना दीर्घ सुट्टीत कराव्या लागणाऱ्या कामाबद्दल दरवर्षी १५ दिवस अर्जित रजा देण्याचा शासन निर्णय नुकताच निघाला आहे. मात्र हा नर्णिय अपूर्ण आणि अन्यायकारक असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने केला आहे. पदोन्नती नसलेल्या मुख्याध्यापकांना, केंद्र समन्वयकांना अर्जित रजा व रजा रोखीकरणाचा लाभ द्यावा, अशी मागणी समितीने शासनाकडे केली आहे.

राज्याध्यक्ष विजय कोंबे व सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी ग्राम विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व उप सचिव वैशाली डिगे यांना निवेदन दिले. २९ ऑक्टोबर २०२६ च्या शासन निर्णयातील अटींमुळे ही रजा मृगजळ ठरणार आहे, असे समितीचे म्हणणे आहे.राज्यात पदोन्नती नसलेल्या मुख्याध्यापकांची संख्या ८० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. आरटीई २००९ च्या अंमलबजावणीत अन्याय्य धोरणामुळे हजारो पदे व्यापगत झाली. वर्धा जिल्ह्यात २०१४ पर्यंत २१९ पदोन्नत मुख्याध्यापकांची पदे होती. आरटीईनंतर सुमारे ८५ टक्के पदे व्यापगत झाली, फक्त ५६ पदे राहिली. वर्धा जिल्हा परिषदेच्या ९०२ शाळांपैकी केवळ ५३ शाळांत उच्चश्रेणी मुख्याध्यापक पद मान्य आहे.

राज्यात १९९५ पासून केंद्र प्रमुख योजना सुरू आहे. सरासरी १० शाळांसाठी एक केंद्र प्रमुख असतो. खाजगी शाळांच्या पर्यवेक्षणासह अन्य जबाबदारीही त्यांच्यावर आहे. राज्यात सुमारे ४८६० केंद्र समन्वयक आहेत. त्यांनाही फक्त १० अर्जित रजा आहेत. प्रत्यक्षात त्यांना कोणतीही दीर्घ सुट्टी लागू नसते. त्यामुळे इतर पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांप्रमाणे स्वतंत्र अर्जित रजा द्यावी, अशी मागणी आहे.

इतर सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांना ३० दिवस अर्जित रजा व रोखीकरणाचा लाभ आहे. मात्र शिक्षकांना तो दिला जात नाही.

जिल्हा परिषद शाळांत शिक्षकेतर कर्मचारीच नाही. लिपिकापासून शिपायापर्यंतची सर्व कामे शिक्षक-मुख्याध्यापक करतात. त्यामुळे त्यांना अन्य कर्मचाऱ्यांप्रमाणे रजा रोखीकरण देणे न्यायसंगत असल्याचे समितीने म्हटले आहे.

संक्षिप्त

सोमवारपासून ६५व्या राज्य नाट्यस्पर्धेच्या प्राथमिक फेरीला प्रारंभ

अमरावती - सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेच्या अमरावती येथील केंद्रावरील प्राथमिक फेरीला सोमवार, २३ नोव्हेंबर पासून सुरवात होणार आहे. पंचवटी चौकातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात या स्पर्धा होणार आहे. दररोज सायंकाळी ७ वाजता नाटकांचे प्रयोग सादर करण्यात येणार आहेत. अमरावती भागांतील एकूण २२ नाट्यसंस्था या केंद्रावरील प्राथमिक फेरीत सहभागी होणार आहेत. यंदाच्या स्पर्धेत विविध विषयांवरील नाटके सादर होणार असल्याने प्रेक्षकांना वेगवेगळ्या आशयांचे आणि नाट्यशैलींचे दर्शन घडणार आहे. या स्पर्धेतील नाट्यप्रयोगांना नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयात इंदिरा गांधी पुण्यतिथी व राष्ट्रीय संकल्प दिन साजरा

अमरावती - विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे भारताच्या माजी प्रधानमंत्री स्व. इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच राष्ट्रीय संकल्प दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या हस्ते स्व. इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय संकल्प दिनानिमित्त उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली.कार्यक्रमाला विभागीय आयुक्त कार्यालयातील अपर आयुक्त (विकास) शालिनी कडू, अपर आयुक्त (साप्र) वासंती माळी, सहायक आयुक्त वैशाली पाथरे तहसीलदार अनिता झाडे, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय एकात्मता, बंधुता आणि देशाच्या अखंडतेप्रती आपली बांधिलकी जपण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

पंचफुलाबाई वडे यांचे निधन

आसेगाव पूर्णा - येथील रहिवासी पंचफुलाबाई सुखदेवराव वडे (वय ८०) यांचे गुरुवार, १९ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सायंकाळी ५ वाजता हिंदू रीतीरिवाजानुसार अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील नागरिकांसह नातेवाईक व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



थकीत मालमत्ता करापोटी राजमहल लॉन व मंगल कार्यालय सील

अमरावती - अमरावती महानगरपालिकेच्या पूर्व झोन क्रमांक ३ अंतर्गत दस्तूरनगर येथील वॉर्ड क्रमांक C8 मधील मालमत्ता क्रमांक ९४८, राजमहल लॉन व मंगल कार्यालय, गणपती नगर, MIDC रोड, अमरावती यांच्याकडे मालमत्ता कराची तब्बल १३ लाख ९५ हजार ४५८ रुपये इतकी थकबाकी असल्याने महानगर पालिका प्रशासनाने आज दिनांक १९ नोव्हेंबर २०२६ रोजी जप्तीनाम्यानुसार सदर मालमत्ता सील केली. महानगरपालिकेच्या थकीत कर वसुली मोहिमेंतर्गत ही कारवाई करण्यात आली. वारंवार थकीत कर भरण्याबाबत सूचना देऊनही रक्कम जमा न झाल्याने महानगरपालिका प्रशासनाने जप्तीची कारवाई करत राजमहल लॉन व मंगल कार्यालयाला सील करण्यात आले. ही कारवाई मा. सहायक आयुक्त नितीन बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.यावेळी सहायक क्षेत्र अधिकारी प्रवीण ठाकरे, दीपक सरसे, आकाश चौधरी तसेच महानगरपालिकेचे इतर कर्मचारी उपस्थित होते.थकीत कराचा तातडीने भरणा करण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.



क्रांतिसूर्य बिरसा मुंडा जयंती उत्साहात

शिराळा - आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी तसेच जल, जंगल आणि जमीन यांच्या संरक्षणासाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणारे महान क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती ब्राह्मणवाडा गो. येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजित समता रॅलीत आदिवासी बांधव, भगिनी आणि समविचारी सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले.कार्यक्रमाला प्रकाश पाटील, , अविनाश ठाकरे,अर्जुन युवनाते, सुरेश उईके, अशोक खंडाते, नीलेश भलावी,रोहित झाकरडे,शाम बहाडे, जगदेव इवने,भीमराव गोंडाणे,साधना भोयर यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन

अमरावती/का.प्र.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' संकल्पनेवर आधारीत जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२६-२७ चे २६ नोव्हेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे.

विकसित भारत २०४७ च्या दृष्टिकोनाशी जोडलेल्या या महोत्सवात १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाकडून ऱ्झ्-ञ्श्ष्ठ २०२७ चे आयोजन केले जाणार आहे. जानेवारी २०२७ मध्ये दिल्ली येथे सांस्कृतिक ट्रॅक, विकसित भारत चॅलेंज ट्रॅक, इनोव्हेशन ट्रॅक आणि युवा संसद या चार विभागांमध्ये राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा होणार आहेत.

२६ नोव्हेंबरला लोकगीत, लोकनृत्य व पथनाट्य स्पर्धा

त्यानुसार सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून विकसित भारत यंग लिडर्स डॉयलॉग २०२७ चॅलेंज ट्रॅक अंतर्गत निबंध लेखन टप्प्यातून पात्र ठरलेल्या स्पर्धकांची जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा होईल.

यासाठी 'नावीण्यपूर्ण अर्थव्यवस्था, पर्यटन आणि सर्जनशील उद्योग' हा विषय आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत चित्रकला व कविता लेखन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धा विभागीय क्रीडा संकुलातील कॉन्फरन्स हॉल येथे होतील. तसेच गुरूवार, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत लोकगीत, लोकनृत्य व पथनाट्य स्पर्धा या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृह, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे होतील.

या स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी दि. १७ ऑगस्ट रोजी वय १५ ते २९ वर्षे दरम्यान असलेले युवक-युवती सहभागी होऊ शकतील.

जन्मतारखेचा पुरावा म्हणून जन्माचा दाखला व ओळखपत्रासह आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. प्रत्येकस्तरावर यशस्वी ठरणाऱ्यांना शासनाकडून रोख पारितोषिक दिले जाईल.

जिल्हास्तर युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज व आवश्यक कागदपत्रे दि. २५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, तपोवन चौक, मार्डी रोड, अमरावती येथे प्रत्यक्ष किंवा amravatidso @gmail.com या ईमेलवर पाठवावेत.

याची एक प्रत जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयास सादर करावी. स्पर्धाबाबत अधिक माहितीसाठी तालुका क्रीडा अधिकारी अनिल इंगळे– ९९७००७११७२, शेख सलीम शेख हुसेन – ९६५७२७ ७४५७, क्रीडा अधिकारी वैशाली इंगळे - ७०३८०८२६९६ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जाधव यांनी केले आहे.

सावनेर-मोखड मार्गावरील पूल खचला

अपघाताचा गंभीर धोका अनेक दिवसांपासून पुलाची दुरवस्था

अमरावती/का.प्र.

तालुक्यातील सावनेर आणि मोखड मार्गावरील पुलाची गेल्या अनेक दिवसांपासून दुरवस्था झाली असून, हा पूल खचल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुलाची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून, विशेषतः सायंकाळच्या वेळी या पुलावरून प्रवास करणे जिकिरीचे ठरत आहे. संबंधित विभागाने अद्याप या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

अमरावतीहून या मार्गाने नियमित ये-जा करणाऱ्या अनेक नागरिकांना दररोज या पुलावरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे पुलाची खचलेली अवस्था



वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण करीत आहे. दिवसा पुलाची स्थिती काही प्रमाणात लक्षात येत असली, तरी सायंकाळच्या वेळी अंधारामुळे पुलावरील धोकादायक भागाचा अंदाज येणे कठीण होते.अशा परिस्थितीत दुचाका स्वार, चारचाकी वाहनचालक तसेच इतर प्रवाशांचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी पुलाच्या दुरवस्थेचे छायाचित्र समोर आणत लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.आपल्या परिसरातील लोकप्रतिनिधी, आमदार,खासदार तसेच त्यांच्या संपर्कातील पदाधिकाऱ्यांपर्यंत या पुलाची छायाचित्रे पोहोचवून तातडीने उपाययोजना करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन नागरिकांकडून करण्यात येत आहे.पुलाची डागडुजी किंवा आवश्यकतेनुसार कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यापूर्वी संभाव्य अपघात टाळण्यासाठी धोकादायक ठिकाणी तातडीने सूचना फलक, बॅरिकेड्स आणि रात्रीच्या वेळी दिसतील अशा प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.एखादी गंभीर दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाला जाग येण्यापेक्षा वेळीच उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे.

पुरामुळे खचलेल्या पुलाचे काम चार महिन्यांपासून रखडले

अंजनगाव बारी/वार्ताहर

वडगाव (जिरे) येथील रायघोळ नदीवरील वडगाव (जिरे)-मालखेड मार्गावरील पूल अतिवृष्टीमुळे खचून मोठे नुकसान झाले आहे. मात्र, या घटनेला चार महिने उलटूनही पुलाच्या दुरुस्तीचे काम अद्याप मार्गी लागलेले नाही. संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांना आजही धोकादायक परिस्थितीतून ये-जा करावी लागत असून जीव मुठीत धरून प्रवास करण्याची वेळ आली आहे.

या पुलावरून वडगाव (जिरे), मालखेड तसेच अंजनगाव बारी परिसरातील नागरिकांची नियमित वाहतूक होते. परिसरातील सुमारे १५० शेतकऱ्यांची शेती याच

प्रशासनाचे दुर्लक्ष कायम



मार्गावर असल्याने शेतमालाची वाहतूक, शेतमजुरांची ये-जा तसेच विद्यार्थ्यांच्या दैनंदिन प्रवासावर गंभीर परिणाम झाला आहे. स्मशानभूमीकडे जाणाराही हाच मार्ग असल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, दरवर्षी पावसाळ्यात या पुलाची समस्या निर्माण होत असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. चार महिन्यांपासून दुरुस्तीचे काम रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

संबंधित विभागाने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून पुलाची दुरुस्ती करावी आणि भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, यासाठी मजबूत व कायमस्वरूपी पुलाचे बांधकाम करावे, अशी जोरदार मागणी प्रशासक सरपंच धनश्याम ब्राह्मणे यांच्यासह परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

हुआवेईच्या अमेरिकन पेटंटमध्ये डॉ. विजय इंगोले यांच्या संशोधनाचा संदर्भ!

अमरावती/का.प्र.

जागतिक स्तरावरील अग्रगण्य दूरसंचार व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील कंपनी हुआवेई टेक्नॉलॉजी च्या अलीकडेच प्रकाशित झालेल्या अमेरिकन पेटंटमध्ये अमरावतीचे ज्येष्ठ संशोधक तथा 'पेटंट मॅन' म्हणून परिचित असलेले डॉ. विजय तुळशीराम इंगोले यांच्या 'त्रीमूल्य संगणन' विषयक संशोधनाचा संदर्भ देण्यात आला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, हुआवेईच्या या पेटंटमध्ये संदर्भासाठी नमूद करण्यात आलेल्या पाच पेटंटधारकांपैकी डॉ. विजय इंगोले यांचे पेटंट हे एकमेव भारतीय संशोधन आहे.

हुआवेईचे 'Ternary Logic Gate Circuit, Computing Circuit, Chip and Electronic

'त्रीमूल्य संगणन' क्षेत्रातील भारतीय संशोधनाची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल







Device' या शीर्षकाचे अमेरिकन पेटंट दि. २३ जुलै २०२६ रोजी प्रकाशित झाले आहे. या पेटंटच्या संदर्भसूचीमध्ये डॉ. विजय इंगोले यांच्या 'Ternary Arithmetic and Logic Unit (ALU) and Ternary Logic Circuit' या संशोधनाचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आला आहे. डॉ. विजय इंगोले यांच्या या संशोधनाची प्राधान्य ११ जून २०१५ असून, त्यांचे आंतरराष्ट्रीय पेटंट १५ डिसेंबर २०१६ रोजी प्रकाशित झाले होते.

विशेष म्हणजे, हुआवेईच्या संबंधित संशोधनाची प्राधान्य तारीख सप्टेंबर २०२३ असल्याने, त्यापूर्वी सुमारे आठ वर्षे आधीच डॉ. इंगोले यांनी या क्षेत्रात संशोधन केले होते. त्यामुळे त्यांच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय पेटंटच्या संदर्भसूचीत झालेली नोंद महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

डॉ. विजय इंगोले यांनी विकसित केलेल्या 'टर्नरी अर्थमॅटिक अँड लॉजिक युनिट' (TALU) मध्ये त्री-मूल्य लॉजिक गेट्स,बेरीज,कॅरी निर्मिती,तुलना तसेच विविध अंकगणितीय व तार्किक क्रिया करण्यासाठी आवश्यक इलेक्ट्रॉनिक परिपथांचा समावेश आहे. पारंपरिक द्विमूल्य संगणन पद्धतीला पर्याय ठरू शकणाऱ्या त्री-मूल्य संगणन तंत्रज्ञानाला भविष्यातील संगणकीय प्रणाली, चिप तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान मिळण्याची शक्यता आहे.

अमरावतीच्या संशोधकाच्या कार्याची जागतिक स्तरावरील नामांकित कंपनीच्या अमेरिकन पेटंटमध्ये संदर्भासह नोंद होणे ही शहरासाठी आणि भारतीय संशोधन क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे.या उल्लेखनीय संशोधनाबद्दल डॉ. विजय इंगोले यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. इंदिरा विजय इंगोले तसेच ग्रीन सर्कल ग्रुपचे सदस्य प्र. सु. हिरुरकर, पद्माकर लाड, विद्याधर इंगोले, डॉ. मनोहर खोडे आणि कुमार पाटील यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

बाळांच्या कथित खरेदी-विक्री प्रकरणाचे धागेदोरे तीन जिल्ह्यांत

अकोल्यातून चौथे बालक ताब्यात -बाळविक्री प्रकरणात १३ आरोपींना अटक

-आणखी दोन बालकांचा शोध सुरू

अमरावती/प्रतिनिधीः- फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आलेल्या बहुचर्चित बालविक्री प्रकरणाचा तपास आता वेगवेगळ्या जिल्ह्यांत पोहोचला आहे. या प्रकरणात शुक्रवारी २० नोव्हेंबर रोजी पोलिसांनी अकोला जिल्ह्यातून चौथ्या बालकाला सुरक्षित ताब्यात घेतले. यासोबतच बालकाच्या पालक दाम्पत्यालाही अटक करण्यात आली आहे. आतापर्यंत या प्रकरणात चार बालकांची सुटका करण्यात आली असून, एकूण १३



जणांना अटक झाली आहे. आणखी काही जणांचा सहभाग उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी डॉ. वैशाली प्रफुल्ल भोजने (४९) आणि तिचा पती प्रफुल्ल वसंतराव भोजने (५६, रा. बूटी प्लॉट, राजापेठ) यांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे. पोलीस कोठडीदरम्यान डॉ. वैशाली भोजने हिने दिलेल्या जबाबात, कोणतीही कायदेशीर प्रक्रिया न करता पालकांच्या परस्पर संमतीने ☞(पान २ वर)

मेळघाटातील लाडक्या बहिणींना लखपती दिदी बनवणार- राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

चुरणीगावात साधला महिलांशी संवाद -काटकुंभ आणि चुरणी आरोग्य केंद्राची पाहणी

जारीदा वीज उपकेंद्रालाही दिली भेट



अमरावती/प्रतिनिधीः- एकही मुलगी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, यासाठी



पालकांनी मुलींना आग्रहाने शिकवावे, बालविवाहाला कृतीतून आळा घालावा. शिक्षणासोबतच आर्थिक प्रगती करून मेळघाटातील लाडक्या बहिणींना लखपती दिदी करण्यात येईल, असा विश्वास महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण व ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज (दि.२०) महिला संवाद कार्यक्रमात व्यक्त केला.

राज्यमंत्री बोर्डीकर यांच्या उपस्थितीत चुरणी येथील आदिवासी सांस्कृतिक भवनात महिला संवाद कार्यक्रम पार पडला. यावेळी आमदार केवलराम काळे, अचलपूरच्या नगराध्यक्ष रुपाली माथने, प्रभुदास भिलावेकर, ☞(पान २ वर)

नवविवाहितेवर अनैसर्गिक कृत्याचा प्रयत्न

-पतीसह चौघांवर गुन्हा



अमरावती/प्रतिनिधीः- खासगी नोकरी करून घरखर्चासाठी तसेच विविध वस्तू खरेदी करण्यासाठी माहेरून पैसे आणण्याचा तगादा लावत एका २८ वर्षीय नवविवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. पतीने अनैसर्गिक कृत्य करण्याचा प्रयत्न केल्याचा, तसेच विरोध केल्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप विवाहितेने केला आहे. या छळामुळे गर्भातील बाळाची वाढ थांबल्याने वैद्यकीय सल्ल्यानुसार गर्भपात करावा लागल्याचेही तिने तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी पती, सासू, सासरे आणि मामासह चौघांविरुद्ध १९ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल केला आहे. अमरावती शहरातील २८ वर्षीय ☞(पान २ वर)

समृद्धी महामार्गावर लुटमारीच्या अफवेने खळबळ

संशयित चौघांची चौकशी, नंतर सुटका



वर्धा/प्रतिनिधीः- समृद्धी महामार्गावर रस्त्यावर लोखंडी खिळे टाकून वाहने पंक्चर करायची आणि त्यानंतर वाहनचालकांना लुटायचे, अशी माहिती मिळाल्याने पोलिस यंत्रणा सतर्क झाली. या माहितीच्या आधारे येळाकेळी परिसरात एका ओमनी कारला अडवून चार तरुणांना ताब्यात घेण्यात आले. मात्र, पोलिसांनी केलेल्या चौकशीत या तरुणांचा कोणत्याही गुन्हेगारी कृत्याशी संबंध आढळून आला नाही. अखेर चौकशीअंती त्यांना सोडून देण्यात आले.

संभाजीनगर येथील नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर कॉरिडॉरवरील चेंज क्रमांक २०९ जवळ एका ब्रेझा कारखाली लोखंडी खिळे फेकण्यात आल्याची तक्रार करण्यात आली होती. या माहितीवरून सावंगी पोलिसांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. एएसआय ☞(पान २ वर)

ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शन २७ नोव्हेंबरपासून

दुष्काळावर मात हे ध्येय; पीक नियोजनावर भर

नागपूर/प्रतिनिधीः- ॲग्रोव्हिजन राष्ट्रीय कृषी प्रदर्शन, कार्यशाळा व परिषदेचे २७ ते ३० नोव्हेंबर दरम्यान अमरावती मार्गावरील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ प्रशासकीय परिसरात आयोजित करण्यात आले असून हे १७ वे वर्ष आहे.

शेतकऱ्यांना आधुनिक शेती, नवीन तंत्रज्ञान व कृषी क्षेत्रातील बदलांची माहिती एकाच व्यासपीठावर देण्यासाठी दरवर्षी ॲग्रोव्हिजनचे आयोजन केले जाते. शेतकऱ्यांना कमी पाण्यात अधिक उत्पादन घेण्यासाठी सक्षम



वातावरणाचा, जलव्यवस्थापन, पीक नियोजनावर यंदाच्या प्रदर्शनात विशेष भर देण्यात येणार आहे, अशी माहिती ॲग्रोव्हिजनचे प्रवर्तक व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रपरिषदेत दिली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ॲड. सुलेखा कुंभारे, आ. कृपाल तुमाने, आ. चरणसिंह ठाकूर, डॉ. राजू पोतदार, डॉ. सी. डी. मायी, रवि बोरटकर, सुधीर दिवे, दयाशंकर तिवारी, रमेश मानकर, कॅप्टन एल. बी. कलंत्री आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

राष्ट्रीय कृषी प्रदर्शनासाठी यंदाही तीन मोठे हँगर उभारण्यात येणार असून, मोठ्या कृषी यंत्रसामग्री व उपकरणांच्या प्रदर्शनासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यंदाच्या प्रदर्शनात ☞(पान २ वर)

दर्यापूर तालुक्यातील ७४ ग्रामपंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

-अनुसूचित जाती १७, अनुसूचित जमाती ४, नागरिकांचा मागासप्रवर्ग १६, सर्वसाधारण प्रवर्ग ३७

खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर तालुक्यातील ७४ ग्रामपंचायच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत आज (दि.२०)तहसिल कार्यालयात पार पडली. अनुसूचित जातीसाठी १७, अनुसूचित जमातीसाठी ४, नागरिकांचा मागासप्रवर्ग १६, तर सर्वसाधारण प्रवर्गासाठी ३७ असे २०२६ ते २०३० पर्यंत सरपंचपदाचे आरक्षण जाहीर झाले.

वडनेर गंगाई, उमरी इतबारपूर, वडाळगव्हान, सासन, रामापूर, येवदा, दारापूर, शिंगणापूर, नालवाडा, या ग्रामपंचायत मागासप्रवर्ग महिलांसाठी राखीव झाल्या असून माहुली धांडे, अडूळा बाजार, सुकळी, वडूरा, भामोद, आमला, नांदरुन, शिरजदा, या ग्रामपंचायत मागासप्रवर्गासाठी आरक्षित आहेत.

सामदा, इटकी, नरदोडा, उपराई, वरुड बु, धामोडी, घोडचंदी, चांडोळा, रुस्तमपूर, गोळेगाव, हिंगणी मिर्झापूर, मार्कंडा, खैरी, नायगाव, महीमापूर, कळाशी, बेलोरा, सांगवा बु, जैनपूर, या ग्रामपंचायत सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव आहेत. खल्लार, ☞(पान २ वर)

अंजनगाव तालुक्यातील ४९ ग्रामपंचायतींचे सरपंच आरक्षण जाहीर



अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- अंजनगाव सुर्जी तालुक्यातील गाव पुढाऱ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून उत्सुकता लागलेल्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत अखेर जाहीर झाली आहे. सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी अंजनगाव तालुक्यातील एकूण ४९ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. हे आरक्षण जाहीर होताच तालुक्यातील राजकीय वातावरण तापले ☞(पान २ वर)



ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची ३३ केव्ही जरीदा उपकेंद्राला भेट



अमरावती/प्रतिनिधीः- महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण व ऊर्जा राज्यमंत्री मेघना दिपक साकोरे-बोर्डीकर यांनी मेळघाट दौऱ्यादरम्यान महावितरणच्या ३३ केव्ही जरीदा उपकेंद्राची पाहणी केली. उपकेंद्राची क्षमता ५ एमव्हीएने

-मेळघाटात सौर योजनांचा लाभ देण्याचे ऊर्जा राज्यमंत्र्यांचे निर्देश

वाढवून ती १० एमव्हीए करण्यात आल्याने परिसरातील वीज ग्राहकांना योग्य दाबाने वीज पुरवठा ☞(पान २ वर)

एकाच रात्री चार दुकाने फोडली; दीड लाखांची रोकड लंपास

चार आरोपी सीसीटीव्हीत कैद

अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील मध्यवर्ती भागात चोरट्यांनी एकाच रात्री चार दुकाने फोडून सुमारे दीड लाख रुपयांची रोकड लंपास केली. तहसील कार्यालयासमोरील रचना कमर्शियल मार्केट आणि मनपा मार्केटमधील दुकानांना लक्ष्य करत चार सदस्यीय चोरट्यांच्या टोळीने शटर उचकटून चोरी केली. चोरीची ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाली असून, चारही चोरटे चेहऱ्यावर मास्क बांधून वारदात करताना दिसत आहेत. सिटी कोतवाली पोलिसांसह गुन्हे शाखेचे पथक चोरट्यांचा शोध घेत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार, २० नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास चार चोरट्यांची टोळी तहसील कार्यालयासमोरील रचना कमर्शियल मार्केटमध्ये दाखल झाली. यातील दोघे जण दुकानांच्या बाहेर थांबून परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवत होते, तर अन्य दोघांनी दुकानांचे ☞(पान २ वर)

मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्पमध्ये २२ कोटी कर्जाचे वितरण

अमरावती/प्रतिनिधीः- सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अमरावती क्षेत्राच्या वतीने आज (दि.२०) वऱ्हाडे मांगल्य येथे मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कॅम्प पार पडला. या कॅम्पमध्ये जिल्ह्यातील विविध व्यावसायिक व उद्योजकांना एकूण २२ कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण करण्यात आले.

अभिनंदन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी देठे अध्यक्षस्थानी होते, प्रमुख पाहुणे म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, भातकुली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी



तृप्ती बिरुडकर, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक शोएब कादरी, सेंट्रल बँकेचे क्षेत्रिय प्रबंधक पन्नम कुमार, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेडाऊ उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी काकडे यांनी, जिल्ह्याची अग्रणी बँक असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडियाने जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. जिल्ह्यातील उद्योजक, व्यावसायिक व लघुउद्योजकांना आर्थिक पाठबळ देऊन त्यांच्या व्यवसाय ☞(पान २ वर)

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा आज विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा



अमरावती/प्रतिनिधीः- मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत अमरावती विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा, सन २०२६-२७ च्या अभियानासंदर्भातील विभागस्तरीय कार्यशाळा तसेच 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन शनिवार, दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता पी. आर. पोटे पाटील आभियांत्रिकी महाविद्यालयात करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी आज (दि.२०) पत्रकार परिषदेत दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे. ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आयुष मंत्रालय, आरोग्य ☞(पान २ वर)

मालमत्ता कराचे नव्याने मूल्यांकन होणार

आमसभेचा निर्णय जनहिताचा,राजकारण करू नये : अविनाश मार्डीकर

अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती महानगरपालिकेत प्रशासकीय राजवट असतांना राज्य शासनाने वाढीव दराने मालमत्ता कर आकारण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय अन्यायकारक असल्याने महायुतीच्या आमदार सुलभा खोडके आणि आमदार संजय खोडके यांनी या करवाढीवर स्थगनादेश आणला होता. मात्र, जानेवारी माहिन्यामध्ये महानगरपालिकेचे सभागृह आस्तित्वात आल्यानंतर प्रशासनाने शासनाकडे पाठपुरावा केल्यानंतर, शासनाने हा स्थगनादेश उठवल्याचे पत्र महापालिकेला प्राप्त झाले आहे. असे असले तरी, यंदाची दुष्काळी परिस्थिती आणि नागरिकांची आर्थिक स्थिती लक्षात घेता गुरुवारी १९ नोव्हेंबर रोजी झालेल्या आमसभेने मालमत्ता कराचे नव्याने मूल्यांकन (असेसमेंट) करण्याचा निर्णय एकमताने घेतला आहे. हा निर्णय जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी असून, यात



कोणीही राजकारण करू नये, असे आवाहन महापालिका स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी केले आहे.

शासनाने स्थगनादेश उठवल्यानंतर नागरिकांवर पुन्हा वाढीव कराचा बोजा पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर आमसभेत सविस्तर चर्चा होऊन नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत नव्याने कर आकारणीचे मूल्यांकन करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. आमसभेने घेतलेला हा निर्णय अत्यंत सर्वांगीण असून सर्वसामान्य अमरावतीकरांना दिलासा देणारा असल्याचे मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी स्पष्ट केले आहे.

दुष्काळी उपाययोजनांवर काम करतांना सर्व यंत्रणांनी समन्वय राखा - आ.सुलभा खोडके

जलस्रोतांचे संवर्धन, विहिरी दुरुस्ती व जल पुनर्भरण कामांना गती देण्याची सुचना



अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शहरी भागातील संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच प्रभावी उपाययोजनांची अंमलबजावणी करावी. शहरातील नैसर्गिक व कृत्रिम जलस्रोतांचे संवर्धन, नादुरुस्त विहिरींची दुरुस्ती, व जलपुनर्भरणाच्या कामांना प्राधान्य देऊन गती द्यावी, दुष्काळ परिस्थितीत शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचणे आवश्यक असून, प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, अशा सुचना अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी दिल्यात.

तालुका प्रशासकीय कार्यालय अमरावती येथे आज दिनांक २० नोव्हेंबर रोजी आयोजित टंचाई आढावा बैठक व समन्वय समितीच्या सभेमध्ये अमरावती विधानसभा सभा क्षेत्रातील दुष्काळ सदृशस्थिती तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा ☞(पान २